१९६८

म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र. ४५५

REFBK-0017212

REFBK-0017212

# एक भटकंती

मधुकर केचे

REFBK-0017212
REFBK-0017212

नागविदर्भ प्रकाशन
अमरावती

नाग-विदर्भ
प्रकाशन
अमरावती

मूल्य चार रुपये

पहिली आवृत्ती
श्रीशिवराज्याभिषेक शके २९५
१ ऑक्टोबर १९६८

प्रकाशक
पुं. ना. देशमुख
नागविदर्भ प्रकाशन
अमरावती

मुद्रक
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणे २

सर्वाधिकार सुरक्षित

मूल्य चार रुपये

# मा वं दे

सुमारे दीड वर्षापूर्वी केलेल्या भटकंतीचे हे वर्णन. आज ते पुस्तक-रूपाने प्रकाशित होत आहे. नुकताच त्यातला काही भाग किर्लोस्कर मासिकातून क्रमशः आला. तो वाचल्यानंतर पुष्कळ मित्रांनी तो संपूर्ण वाचण्याची इच्छा प्रगट केली.

किर्लोस्कर मासिकाच्या वाचकांनी माझी पाठ थोपटली. त्या कौतुकासोबतच त्यांनी काही सूचनाही केल्या. त्याबद्दल मी अतिशय आभारी आहे. 'बुल-ढाणा' या नावाची व्युत्पत्ती एका विद्वान मित्राने सुचविली. वास्तविक मी ती स्वीकारणे उचित झाले असते; पण प्रवासवर्णन व इतिहास या दोहोत थोडासा फरक करणे मला आवश्यक वाटले.

म्हणूनच सांगतो की हे प्रवास-वर्णन म्हणजे प्रवासाचेच वर्णन आहे. वऱ्हाडचा इतिहास, संस्कृती, निसर्ग, व्यक्तिचित्रे त्यात हेतुपूर्वक आणली नाहीत. आलीत त्याला इलाज नाही. पण त्यात काटेकोरपणाने पाहू नये ही विनंती.

या प्रवासानंतर पुन्हा काही ठिकाणी जाऊन आलो. विदर्भाचा अधिक परिचय करून देण्याच्या दृष्टीने तोही मजकूर यात टाकता आला असता. मी तेही टाळले. कारण विदर्भदर्शन हा हेतू नसून परिणाम आहे. हा सात दिवसांचा प्रवास हे एक अनुभव-विश्व आहे. विदर्भाबाबत राहून गेलेल्या अनेक गोष्टी त्या विश्वाच्या बाहेर आहेत. त्या भटकंतीच्या भागांचे हवामान त्या उर्वरित गोष्टींना मानवले नसते. फार तर पुन्हा दुसरे लेख लिहून त्या गोष्टी समोर आणता येतील. पण त्यांची गोडी या भटकंतीच्या अनुभव-प्रवाहाशी जुळली नसती.

विदर्भाचा इतिहास किंवा विदर्भाचा भूगोल या दृष्टीने या प्रवासाकडे पाहू नये ही पुन्हा प्रेमाची विनंती.

हे पुस्तक लिहिताना मित्रांच्या उत्तेजनाची खूप मदत झाली. थोडे लिहून झाले की, श्री. दिलीप कोल्हटे यांना ते दाखवी. ते इंग्रजी वाङ्मयाचे विद्यार्थी

जर खुष दिसले तर पुढचा मजकूर लिहून होई. कै. डॉ. पंजाबरावांनी वेळात वेळ काढून हे संपूर्ण हस्तलिखित ऐकले. त्या तीन तासांच्या वाचन–कालाचा विसर मला कधीच पडणार नाही. आज ते असते तर...पण त्यांचा आत्मा स्वर्गातून मला आशीर्वाद देत आहे.

राठीनगर
पोस्ट–विदर्भ महाविद्यालय
अमरावती.

मधुकर केचे

‘ माय ’ ला

# असे निघालो

आजवर जमेल तेवढे भटकून घेतले आहे. माझे ते सारे प्रवास काही सुखासुखी झाले नाहीत. नव्या गावाला जाणार म्हणजे नक्की काय नवे पाहणार हे मलाही माहीत नसते. पुष्कळदा तर काही न पाहताच मी परत येतो. लहानपणी एवढा आटा-पिटा करून पंढरपुराला पायी गेलो. आणि तेथे पुरते नऊ दहा दिवस राहूनही राउळात मात्र गेलोच नाही. तीन चार आठवड्यांच्या वखवखत्या वाटचालीमुळे त्या मुक्कामाच्या दिवसांमध्ये नवे काही पाहण्याचे त्राणच उरले नव्हते. म्हणून एवढ्या लांब गावी जाऊन तेथले जनाईचे जाते वगैरे अपरूप गोष्टी पाहण्याऐवजी सारे दिवस चक्क सिनेमा पाहण्यात घालवले. म्हणजे काय की ज्या रोजच्या जीवनक्रमामध्ये बदल घडावा म्हणून मी ती यात्रा आरंभली तिचा शेवट नेमका रोजच्या जीवनाकडे झुकला ! प्रवासात पंडितमैत्री वगैरे होते म्हणतात. मला तो लाभ झाला नाही. हां, भांडणेबिंडणे मात्र भरपूर झाली. दादाजी तर नेहमी म्हणायचे की, शाळा सोडून असे भटकण्यामध्ये हाती काहीच लागत नाही. ‘ कोठेही गेलास तरी गोटापाणी संगेच राहील.’ या त्यांच्या वाक्याचा प्रत्यय मला नेहमी आला आहे. कोठेही झाडे, घरे, धोंडे, नदी तेच ते राहणार. उगीच भटकंती कशाला ? भागवतदादाने तर केवळ माझ्यासाठी म्हणून एक म्हण

तोंडात ठेवली होती, " अवे सौ घाट अन् ओसरीचा काठ ! " देशोदेशीचे शंभर घाट पाहिले, तरी आपल्या ओसरीचा काठ हा स्वभावाने जास्त प्रेमळ राहणारच.

तरीही मी फिरलो. मनमाने – वेळ, पैसा, परवानगी मिळेल तसा आणि न मिळाली तरीही ! दर भटकंतीत शेवटी घराकडे ओढ राहिली. तरीही भटकलो. घर बरे वाटावे म्हणूनच भटकलो म्हणाना. दादा जसा नेहमी ओसरीची भलाई गायचा तसेच एक दिवस ॲड. अकर्ते म्हणाले, " तू पन्हाळा पाहलास; पण आपला हा गाविलगढ किंवा नरनाळा हे किल्ले तेवढयाच योग्यतेचे आहेत हे तुला माहीत नसेल. " मी तेव्हा चूप राहिलो. दादाच्या ओसरीचाच हा सुधारलेला प्रकार. आपल्या वऱ्हाडची ओसरी इतर नामांकित प्रदेशांपेक्षा साजरी आहे तर ! इतका प्रवास झाला; मग आपल्याच प्रदेशाकडे असे दुर्लक्ष का व्हावे ? जग पाहायला जाण्याआधी देश पाहा असा सल्ला एके ठिकाणी आचार्य कृपलानी यांनीही दिल्याचे स्मरते. अकर्ते साहेबांच्या त्या बोलण्यापासून माझे वऱ्हाडकडे जास्त लक्ष लागले. येथल्या दंतकथा, नेहमीच्या वार्ता इत्यादी जरा उत्सुकतेने ऐकू लागलो. तसतसा मग वऱ्हाड एकदा बघायचाच हा विचार पक्का होऊ लागला.

वेरुळच्या दगडी उठावाचा साक्षात्कार मी घेतला. अजंतामधली रंगाची जादू अनुभवली. दिल्लीमधल्या स्वातंत्र्याचा धुमाऱ्यांपासून हस्तिनापूरच्या वैभववृक्षाखालच्या पाचोळ्यापर्यंत सारे पाहिले. आग्र्याचे अमर शिल्प आणि असेच ठिकठिकाणचे उभे, आडवे कौतुक डोळ्यात साठवले. पण आता ती ओढ स्वतःचा प्रदेश पाहण्याकडे जाऊ लागली. ताजमहाल, इंद्रप्रस्थ, वेरुळ अशासारखी कितीतरी स्थळे या वऱ्हाडी मातीच्या पांघरुणात दडली असतील. हा प्रदेश जुन्या संस्कृतीचा. कितीक राजवाडे, देखणी शिल्पे कालाच्या व भुईच्या पोटात गडप झाली. एखादे उत्खनन मध्येच काहीतरी त्याबद्दल सांगून जाते. सारे दचकतात, " बापरे, या आपल्या वऱ्हाडात रुक्मिणी झाली ! आणि काय म्हणता, अगदी कालपरवा एक बालांध बृहस्पती माकानला झाला ! " असा दरवेळी उमाळा वाढत गेला. म्हटले, पाहूच आपला वऱ्हाड. समजा काहीच नाही दिसले त्यात तर निदान सोबतची माणसे तर दिसतील.

प्रवासाचा हा सर्वांत मोठा फायदा. कोणी नवे माणूस दिसले नाही तरी

सोबतची – नेहमीची माणसे दिसतात व ती एकदम वेगळी वाटतात. प्रवासाने त्यांना एक वेगळेपणा दिलेला असतो.

चौसष्ट साली हवी असलेली संधी चालून आली. तसे ते साल सर्वांना वाईटच. मला तर फारच वाईट. नेहरू-निधनाच्या वज्राप्रमाणेच घरगुती दुःखांच्या सुयाही अस्वस्थ करीत होत्या. पण त्या वर्षाचा शेवट माझ्यापुरता तरी गोड झाला. मामा एक दिवस म्हणाले, " चल, जरा आसपास फिरून येऊ. "

म्हणजे ते असे झाले. कुठली कोण चार पाच माणसे एक दिवस अचानक परस्परांच्या ओळखीची झाली. वेगवेगळ्या उद्देशांनी पण एकच प्रदेश बघावा असे त्यांचे ध्येय जुळले. मुंबईच्या महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्राचे श्री. माधव गडकरी जन्मतःच पायाला चाके बांधून आलेले. दिल्लीसारखी शहरे भटकलेला हा माणूस. पुढे तर परदेशाची वारीही त्यांनी केली. त्यांना कसा कोणास ठाऊक; पण एक दिवस वऱ्हाड पाहावासा वाटला. त्या ठाण्याला जन्मलेल्या माणसाची व माझी सुतराम ओळख नव्हती. त्यांच्या प्रवासाचे व नवे पाहण्याचे वेड दाखवणारी ती ' असा हा महाराष्ट्र ' नावाची चौकट मात्र मी अधूनमधून बघायचा. पण त्यामुळे ओळख होणे वगैरेचे कारण नव्हते. मामा तसे जगभर फिरलेले. शिवाय वऱ्हाडही त्यांनी या ना त्या निमित्ताने डझनभर फेऱ्यांनी पालथा घातलेला. कोणत्याही प्रवासात त्यांनी मला सोबत नेले नव्हते. नेण्याचे कारणही नव्हते. याच वेळी त्यांना ते कारण दिसले. ध्यानीमनी नसताना ते एक दिवस म्हणाले,

" डॉ. पंजाबरावांनी विद्येचा एवढा विस्तार केला; पण त्याचे कौतुक कोणीही केलेले नाही. "

" कोणी म्हणजे ? "

" अरे, आजकाल मुंबईच्या वृत्तपत्रातून काही आले तर त्याला वजन चढते... "

" मग ? "

" तू असं कर, तिकडे तुझ्या ओळखी आहेत. एखादा संपादक बोलाव. त्याला त्या संस्था दाखवू. "

" ठीक आहे. "

" मग असं बघ, त्या करंजियांनाच एक पत्र टाक. "

बाप रे ! ' हे बघा मामा, करंजियांची माझी मुळीच ओळख नाही. आणि त्यांना लिहायचे तर इंग्रजीतून लिहावे लागेल. तेवढे इंग्रजी मला जमणार नाही. आणि त्या पत्रापुरती सोय तुम्ही कोणाकडून केली तरी आठ दिवस तो गृहस्थ आपल्या सोबत फिरणार. तशावेळी त्यांच्याशी इंग्रजीतून बोलणे माझ्या बापालाच काय; तुम्हांलाही जमणार नाही. "

" तू मला काय समजतोस ? "

" काहीही नाही. मी तुमच्या इंग्रजीबद्दल नव्हतो म्हणत. मुद्दा आहे करंजियांच्या इंग्रजीचा. शिवाय साऱ्या जगातली छिद्रे हुडकणारे त्यांचे पत्र. ते तुम्हांला तुमच्या संस्थेच्या प्रचारासाठी कसे काय परवडणार ? "

" आम्ही त्यांना खोटी तारीफ करायला लावणार नाही. "

" आणि तेही खरे तेच मांडतील. ते सर्वच तुम्हांला परवडणार नाही. "

अर्थात हे सारे बोलणे गमतीचे होते. पण खरोखरच तसे घडले तर कोणालाच परवडणारे नव्हते. पुन्हा असे की या नियोजित प्रवासात माझ्या सोबत करंजिया असले काय आणि सॉमरसेट मॉम असले काय मला त्या मंडळींशी कर्तव्य नव्हते. मुद्दा होता वऱ्हाडचा प्रवास करण्याचा. मामांच्या दृष्टीने संस्थेचा प्रचार महत्त्वाचा. माझ्या दृष्टीने केवळ प्रवास ! मात्र माझा हा हेतू इतका उघडा करणे एकंदर व्यवहारात बसले नसते; म्हणून संस्थाप्रेमाचा बुरखा पांघरून मी त्याच्या गुप्त छिद्रातून आपल्या जागा टेहळण्याचा कट केला. संस्था बघायला वृत्तपत्राचा माणूस शोधण्यासाठी मी उत्सुक आहे असे दाखवले तर मला अनायासेच माझाही हेतू पुरवता आला असता. म्हणूनच प्रचार नसला तरी निदान त्या शिवाजी संस्थेबद्दल दोन शब्द चांगले सांगणारा वृत्तपत्रकार मी शोधू लागलो. एक दिवस मामांजवळ श्री. कर्णिकांसाठी परिचयपत्र दिले. ते घेऊन ते तडक मुंबईस गेले. कर्णिक माझ्या गद्याचे कौतुक करतात असे मला कर्णोपकर्णी कळले होते. त्याचा फायदा घेऊन मी त्यांना पत्र लिहिले; त्यांनीही भटकंतीची रुची असलेले आपल्या स्टाफमधले गडकरी नेमके हुडकून काढले. म्हणजे अशी तीन उद्देशांची तीन माणसे एकत्र आली.

कुठलाही नवा प्रदेश बघण्याची आवड म्हणून ही विदर्भ-यात्रेची संधी गडकऱ्यांनी साधली. शिवाजी संस्थेच्या शाळा वऱ्हाडभरच पसरलेल्या. त्या पाहायला जायचे तर नको म्हटले तरी वऱ्हाडची इतरही स्थळे दिसणार हे

ओघाने आलेच. अनायासे शैक्षणिक संस्थेचा अभ्यासही होईल. या सर्व कारणांची पुरचुंडी घेऊन गडकरी एका मध्यरात्री अमरावतीस आले.

मामांनी दौऱ्याचा कार्यक्रम निश्चित केला. त्यात प्राधान्य होते शाळा बघण्यावर. ती कार्यक्रमपत्रिका बघून मी बराच निराश झालो. नुसत्या शाळा बघणे मलाच काय; पण त्या मुंबईकर पाव्हण्यासही परवडणारे नव्हते. शाळा बघणे बवणे म्हणजे काय ? आम्ही काय शाळातपासणीस होतो ? ते हेड-मास्तरांचे हँ हँ स्वागत व रुंद तोंडाने गायलेली ती स्वागतगीते ! ज्यांचा सारांश म्हणजे 'आपण या संस्थेला भेट दिली हा सुवर्ण दिन होय !' काही ठिकाणी फार तर बदल म्हणून 'सुवर्णदिना' ऐवजी 'अजि हा भाग्याचा' दिन. बाकी मजकूर तोच. आणि नंतरचे ते चहापाणी, हेडमास्तरांच्या मते तेथे झालेल्या सुधारणा. आणि काही खरीखोटी गाऱ्हाणी ! या सर्वांचा कंटाळा प्रत्यक्ष मामांनाही आला असता. शिवाय नुसत्या शिवाजी संस्थेच्या शाळा बघणे हा पक्षपातच. मुंबईचा पाव्हणा हा काही संस्थेची तारीफ करणारा पगारदार नोकर नव्हता. म्हणून शाळा-कॉलेजेसच बघायची तर ती जरा व्यापक प्रमाणात बघून मुंबईच्या जनतेसमोर शैक्षणिक विदर्भ ठेवणे अधिक अगत्याचे होते.

हा प्रदेश शिक्षणाच्या बाबतीत अखिल भारतात दुसऱ्या क्रमांकाचा. त्याचे प्रमुख श्रेय डॉ. पंजाबरावांना हे उघडच. पण त्यांच्याच सोबत इतरांनीही त्या मोठ्या कार्यात भर घातलेली आहे. ब्राह्मणांपासून माळीमहारांपर्यंत सर्वांनी शाळा महाशाळा येथे चालवल्या आहेत. त्यांच्या आपसी स्पर्धेशी मुंबईकरांना व मला काहीही कर्तव्य नव्हते. म्हणूनच मी आग्रह धरला की शिवाजी संस्थेसोबतच इतर लोकांच्या संस्थाही त्या कार्यक्रम-पत्रिकेत सामील कराव्या. शिवाय येथला निसर्ग, इतिहास, संस्कृती हे सर्व सिद्ध करणाऱ्या चारदोन तरी व्यक्ती व स्थळे त्यात पाव्हण्यांना दाखवावी. यात पाव्हण्यांपेक्षा जास्त सोय माझी होती. विशेषतः इतर शाळांचा समावेश झाल्याने ती सहल मामांच्या संस्थेपुरती मर्यादित न राहता मी जेथे काम करतो त्या राठी संस्थेशीही निगडित होणार होती. 'तुझा पसा माझी मूठ' असे करीत ही सहल सजायला त्यामुळे मदत होणार होती. त्या प्रवासासाठी मोटर, शिदोरी, नोकर इ. जसे हवे होते तसेच मला रजा मिळणेही आवश्यक होते. मामांच्या गरजेचा फायदा घेऊन मी त्या प्रवासात सामील झालो; आणि सर्व शिक्षणसंस्था पाव्हण्यांना दाखवण्याचे निमित्त करून

स्वतःच्या रजेचेही जुळवून घेतले.

माझी ही युक्ती आमच्या संस्थेच्या सचिवांना माहीत नव्हती असे नाही. तरीही ते म्हणाले, " पाव्हण्यांना आपलीही संस्था दाखवण्याचा तुमचा उपक्रम ठीकच आहे; पण त्याही आधी तुम्ही या सहलीचा उपयोग तुमच्या विरंगुळ्यासाठी करून घ्या. रजा मंजूर. "

मामांनाही हे सर्व माहीत होते. खरे म्हणजे आम्ही दोघेही एकमेकांना ओळखून होतो. ही वेळ मोठीच अनुकूल. कारण या दौऱ्यातले आमचे परस्परभिन्न उद्देश सहल घडवण्याच्या आड नव्हते. शिवाय खोल विचार केला तर सहज भटकणे हा माझा उद्देश थोडाफार मामांशीही जुळत होताच. त्यांनाही असे अधूनमधून भटकण्याचा रोग आहे. त्याच सवयीमुळे ते सारे जग दोनदा भटकून आले. गडकऱ्यांइतकी त्यांना माझी गरज नसेलही; पण येवीतेवी खर्च होतोच आहे तर कारमध्ये सामावेल. तेवढी लोकसंख्या का भरू नये ? म्हणून माझी वर्णी लागली होती. आणि शिक्षणसंस्था पाहण्याच्या मुख्य उद्देशासोबत नवी गावे पाहण्याचा उद्देश जर साधला तर मामांचा आक्षेप नव्हता. म्हणूनच कार्यक्रम पुन्हा ठरवताना त्यांनी माझी मदत ( ! ) स्वीकारली.

ती कार्यक्रम-पत्रिका ठरवणारी बैठक माझ्या अजून स्मरणात आहे. वास्तविक हा एवढासा प्रदेश बघताना त्याची ठरवणूक, योजना इ. ची गरजच काय ? सरळ निघायचे, गाव दिसला की थांबायचे. चहा प्यावासा वाटला तर शाळेला भेट देण्याचे निमित्त करायचे. भूक लागली असेल तर हेडमास्तरांना म्हणायचे, " इतक्या शाळा पाहल्या; पण तुमची शाळा औरच. काय त्या दिव्य सुधारणा ! अहाहा ! केवळ तुमच्यामुळे हे घडले. " किंवा जेवणाची व्यवस्था जर त्या शाळेच्या वसतिगृहाने आखली असेल तर सरळ त्या वॉर्डनला सांगायचे, " तुमच्यासारखा माणूस भारत सरकारच्या माहितीतला नाही याचे वाईट वाटते. उगीचच अन्नखाते त्या रफी अहमदाकडे दिले... " मेजवानी वगैरे देऊ करणारा एखादा माणूस एखाद्या गावी भेटणेही अशक्य नाहीच. हा विदर्भ अशा कर्णांनी भरलेला आहे. त्या कर्णांचे ते करणे कर्णिकांच्या कर्णी टाकून त्यांच्याबद्दलची एखादी वार्ता महाराष्ट्र टाइम्सात ' छापून ' आणण्याचे आमिष देण्याची माझी योजना. एवंच, कार्यक्रम-पत्रिकांची गरज नाही.

मामा हे सर्व करण्याच्या मूडमध्ये नव्हते. उलट मला जे योग्य वाटेल तेच

नेमके न करण्याच्या पवित्र्याने ते खेकसले, " तू चूप बस. "

मग समोर विदर्भाचा नकाशा ठेवून ते एखाद्या सेनापतीसारखे डोके चोळू लागले. अधूनमधून मला वेठीला धरून त्यांनी तारखा, रस्ते, जेवणाची ठिकाणे, निघण्या-पोचण्याच्या वेळा इ. चा आराखडा तयार केला. व्यवस्थित माणसांचा राग मला कधीचाच. त्यावेळी तो फारच वाढला. ही व्यवस्थित माणसे साऱ्या प्रवासाला मिलटरीछाप करून टाकतात.

कार्यक्रम-पत्रिकेच्या शे-दीडशे प्रती तयार झाल्या. त्या ठिकठिकाणी पोस्टाने व काही अर्जंट म्हणून माणसांकरवी पाठविण्यात आल्या. अमरावतीतल्या अमरावतीतही त्या संबंधितांना दिल्या गेल्या. साधी दोनतीन मिनिटांची धावती भेट ठरली असेल तरी त्या भटकंतीच्या जाहीरनाम्यात तिचा उल्लेख होता. योजना-आखणीमुळे मी तर अक्षरशः दिपून गेलो. आता उरले त्या पत्रिकेत उल्लेखले गेलेले भेटीयोग्य लोक. त्यांच्यावर त्या पत्रिकेचा काय परिणाम होईल याची कल्पनाच करवेना. ते बिचारे ! नेमके त्याच वेळी त्यांना घरी राहावे लागणार.

प्रश्न अमरावतीकरांचाही फारसा नव्हता. मला जास्त फिकीर होती माधव गडकरींची. तो भटकंतीप्रिय माणूस मुंबईच्या वक्तशीरपणामुळे आधीच जेरीस आलेला असणार. त्या मर्ढेकरांच्या ' दहा दहा ' च्या लोकलवर रांग धरणाऱ्या मुंग्यांना कंटाळूनच पाहुणा वऱ्हाडात उतरणार. येथे चार दिवस मनसोक्त भटकावे, मन चाहेल त्याला भेटावे किंवा न भेटावे हा त्याचा हेतू. पण ही ' योजनावळी ' पाहून विदर्भही मुंबईसारखा वक्तशीर अतएव देखायला निरुप-योगी व तेणेकरून या स्थळी मुद्दाम दौरा काढण्याचे काहीच कारण नाही ' असे त्यांना वाटते की काय, अशीही शक्यता निर्माण होण्याची मला भीती वाटत होती ! " पण या पत्रिकेवरून तुम्ही आमच्या प्राचीन परंपरांची कल्पना करून घेऊ नका " असे मी पाहुण्यांना सांगण्याचे ठरवले. प्रवासात ते त्यांना अनेकदा सांगितलेही.

प्रवासाची शेवटची तयारी म्हणून मामासाहेबांनी मला तीन गोष्टी दिल्या— एक परदेशातून आणलेला पण अनेक दिवसांपासून पडून असलेला कॅमेरा, प्रवासात त्यांच्यासमोर सिगारेट पिण्याची परवानगी व पाहुण्यांसमोर फार वटवट न करण्याची ताकीद. दुर्दैवाने या तिन्ही देणग्यांचा उपयोग मी फार प्रमाणात

करू शकलो नाही.

शुक्रवारी म्हणजे ११ डिसेंबरला मी फारच थोडा झोपू शकलो. १२ तारखेपासून प्रवास सुरू होणार होता. पण पहिल्या दिवसाचा प्रवास हा अमरावतीतच होणार होता. अमरावती मी इतक्यांदा पाहिलेली; पण मामांसोबत ती कशी दिसणार याचा फार मोठा प्रश्न होता. सकाळी नित्याप्रमाणे कॉलेजात गेलो. ॲड. राठींनी मला प्रवासास जाण्याची संमती दिल्याचे प्राचार्यांनी सांगितले. म्हणून तसाच मामांकडे गेलो.

' शनिवार व मी ' या विषयावर बोलण्यासारखे बरेच आहे. माझे अत्यंत वाईट व अत्यंत चांगले याच दिवशी घडते.

आजकाल ते नेहमीच घडतही नसेल; पण तसे मानण्याची मनाला इतकी सवय झाली आहे की केव्हाही शुभाशुभ घडले तरी ते खूप अवाढव्य वाटते. तर अशा त्या शनिवारी मुंबईचे पाहुणे माधवराव मला सकाळी भेटले. सकाळी ३.५० वाजता ते बडनेऱ्यास आलेले. तेव्हा त्यांना झोप मिळणे आवश्यक. पण पत्रकात छापलेले कार्यक्रम व त्यांच्या वेळा यात फरक पडू द्यायचा नाही. अशा निर्धाराने मामांनी आम्हाला फर्मावले, " हं, चला कारमध्ये बसा. "

## पहिला दिवस

त्या दौऱ्यातले अमरावतीचे पहिले दर्शन म्हणजे कॅम्पावरचे सर्किट हाऊस. हे मी पूर्वी दुरून पाहिले होते. आता आत गेलो. तेथे अर्थातच बाहेरच्या पाहुण्याचे दर्शन घडणार. ते तसे घडलेही ! आज तेथे भारदे उतरले होते. गडकरी हे वृत्तपत्राचे. त्यांचे व भारदेसाहेबांचे एकदमच जमले. गावातल्या मंडळींनी आणलेले हारतुरे, बंगल्यातला चहा व गप्पा यामुळे मी रमून जायला हवे; पण नागपूरच्या सेशनमुळे उगीचच खर्च वाढला व त्याचा फायदा मात्र काही काही व कोणालाही होत नाही असा राजकीय सूर त्या गप्पांना आल्यामुळे मी बाहेरच्या अंगणात येऊन उन्हाशी खेळू लागलो.

यानंतर माधवरावांनी देवीदर्शन घेतले. ही देवी बाहेरगाववाल्यांचे श्रद्धास्थान आहे हे मला निश्चितपणे ठाऊक होते. आज त्या श्रद्धेमागचे कारण कळले. माधवराव अत्यंत भक्तिभावाने अंगारा, प्रसाद, कुंकू वगैरे पुड्यापुड्यांनी जवळ

साठवू लागले. सौ. घरी गेल्यावर या वस्तू नक्कीच मागणार, नाही मिळाल्या तर नेहमीसारखे वेंधळे ठरण्याची पाळी आहेच. पाहुणा उत्तम संसारी आहे व संसाराचे मानसशास्त्र त्याला पूर्णतया अवगत आहे याची खात्री झाली. देवीला त्यांनी खणनारळही दिले. अंबादेवीला मी इतके प्लीज न केल्यामुळे ती माझ्यावर आजवर कितीदा तरी रागावली असेल.

देवीदर्शन आटोपल्यानंतर तेथलाच हनुमान आखाडा ( हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे मध्यवर्ती कार्यालय ), बघता आला असता. पण छापील पत्रकावर भारदेभेटीमुळे गदा आली होती. एखाद्याकडे भेटायला गेल्यानंतर तो आमचे कार्यक्रमपत्रक आपल्या हाती घेणार हे योजक मामासाहेबांच्या लक्षातच आले नव्हते. आखणी करताना मुंबईकडचा पद्धतशीरपणा आणणे सोपे गेले. पण त्या सर्व दौऱ्यात ज्यांच्याबद्दलची आखणी झाली त्या व्यक्ती व ती स्थळे ही विदर्भाची आहेत; आणि मुंबईची नव्हेत हे आमच्या फार उशिरा ( व तेही कार्यक्रमांना उशीर झाला त्यामुळेच ) लक्षात आले. आपली पूर्वापार सुस्ती, ऐसपैसपणा ( थोडक्यात म्हणजे संस्कृती ) सोडून दिली तर हा पाहुणा विदर्भाचे दर्शन घेऊच शकणार नाही, या प्रामाणिक जाणिवेनेच बहुतेक लोक सदरहू दौऱ्यात वागले हे येथे ऊर भरून नमूद करावेसे वाटते.

छापील वेळापत्रकाला पकडण्याची मामासाहेबांची शर्यत, त्यांना साथ देणारा ‘ कार ’चा वेग व घड्याळे बंद करून ठेवून आमचे हसतमुखाने स्वागत करणारे त्या छापील पत्रकातले वास्तव चेहरे यांचा ताळमेळ कोठेच बसू न शकल्याने, ‘ विदर्भाची अस्मिता ’ कायम राहिली. संस्था पाहताना अर्थातच व्यक्तींची भेट होत होती. भेट म्हणजे चहाफराळ आलाच. तरीही ‘ घरी चहाला या ’ हे निमंत्रण येई. मग छापील कार्यक्रमांना हिरमुसलेपणाने बाजूस व्हावे लागे. रस्तेही विदर्भाला साजेसे. पाच मिनिटांत जाता यावे असा प्रवास, लोकांच्या अपघातात मरण्याच्या अनावर इच्छेमुळे व ती इच्छा अजूनही पूर्ण झाली नाही म्हणून वाहनांना अडथळे करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमुळे, दहा दहा मिनिटांनी वाढत होता. हा मोसम कापसाचा. वऱ्हाडची श्रीमंती कापसाच्या गाड्या-गाड्यांच्या रूपाने खेड्यापाड्यातून येऊन आपल्या फेनधवल हास्याने आमचे रंजन ( व अण्णासाहेबांच्या कारला अडथळा करीत ) होती, ती वाढत्या सकाळची गुलाबी थंडीला हळूच हटवत. उन्हाचे सोने पसरवणारी ( काय सगळ्या लोकांना

आजच या रस्त्यांवर मरायचे आहे — इति कार ड्रायव्हर) सुरम्य किंवा मनोहर वेळ !

आम्ही शिवाजी शिक्षण संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात पोचलो. एके काळी सरकारने चुकीने व त्यातही घाईघाईने व दारिद्र्यात बांधलेल्या लष्करी बराकीची ती इमारत. गोणपाट पांघरलेल्या माणसाने आपण मुख्य मंत्र्याचा बाप असल्याचे सांगावे असा त्या इमारतीचा रुबाब ! काही बांबू, वाया गेलेले टिनपत्रे, ताज-महालाच्या सावत्र भावाने फेकून दिलेल्या कुरूप विटा यांना अस्ताव्यस्त अशा स्थितीत एकत्र येण्याची परवानगी दिली व गवंड्याच्या झोपेचा फायदा घेऊन ती सामग्री जर खरोखरच जीव फुटल्यासारखी एकत्र आली तर जे खोपटे नावाचे प्रकरण तयार होईल ते म्हणे संस्थेचे मध्यवर्ती कार्यालय ! माधवराव चेहऱ्यावर काहीही न दाखवता त्या विटा, टिनाच्या जंगलाकडे पाहात होते. मुंबईचे गोठे देखील यापेक्षा चांगले असतील.

आम्ही आत गेल्यावर ठाकरे गुरुजींनी स्वागत केले. त्यांच्या पोषाखाकडे पाहिल्यानंतर पाहुण्यांना विशेष आश्चर्य वाटण्याचे कारणच नव्हते. श्री. गुरुजी हे कीर्तनकार आहेत हे मी त्यांना सांगितले. कीर्तनकारांची साधी राहणी व समाजाने त्यांना ते व्रत निर्विघ्नपणे आचरता यावे म्हणून दिलेले दारिद्र्य यांचा संबंध साऱ्या मराठी जगालाच माहीत आहे. सारांश हा की, त्या मध्यवर्तींच्या इमारतीला गुरुजी शोभून दिसत होते. मा. भारदे या कीर्तनकार स्पीकरला पाहून आल्यानंतर गुरुजींच्या रूपाने हे कीर्तनकाराचे दुसरे पण सर्वमान्य दर्शन. या इमारतीत हा गुरुजी नावाचा माणूस दर वर्षी एक कोटी बावीस लाख रुपयांचा हिशेब लिहितो ही वार्ता पाहुण्यांनी कोण्या मनःस्थितीत ऐकली असेल ते देवच जाणे. एज्युकेशन सोसायटीची एक टप फाटलेली मोटर यावेळी येथे नव्हती ही फार मोठी उणीव त्या दृश्यात होती. पूर्वजन्मी बैलगाडी असलेली ती मोटर मला अनेकदा फिरत्या झोपडीसारखी किंवा कंडक्टरने गॅरेजमधून हाकलून दिलेल्या नाठाळ ट्रकसारखी वाटली होती. ती धावायला लागली म्हणजे मात्र अफाट धावते. नळराजाने जलद चालीसाठी गोमाशा घोंगावणारे किडकिडीत घोडे निवडले होते म्हणतात. त्यातल्याच एखाद्या घोड्याने सूत्र-चालक पंजाबरावांची सेवा करण्यासाठी त्या मोटारीचा अवतार घेतला असावा.

ब्रिटिशांनी जाता जाता हिंदुस्थानला स्वराज्य, नेहरूंना मंत्रिपद इ. देत असताना पंजाबरावांसाठी या मिलिटरीच्या भिकार बराकी राखून ठेवल्या असाव्या. लढाईत पराभव खाऊन आलेल्या व दोनेक महिने स्नान व जेवण नसलेल्या शिपायांच्या उदासबाणेपणाने उभ्या असणाऱ्या त्या इमारतींमधल्या काही, आता सोसायटीची ' उच्च माध्यमिक विद्यालय ' झाल्या आहेत. त्याही मी पाहुण्यांच्या सोबत पाहून पुनःप्रत्ययाचा आनंद घेतला. तेथे श्री. वढे यांच्यासोबत तिसेक लोकांची जनता आमची वाट पाहात होती. त्यातल्या एकेकाचा परिचय मात्र कडेलोट करणारा होता – हे अमूकतमूक, इंग्रजीत M.A., ते M. A. B. T., ते LL. B. Msc.,, बापरे ! त्या सर्व पदव्यांचे शेपूट असूनही हनुमान उडी न मारता या खोपटात सारेजण थांबले तरी कशाला ? त्यावर ढोरे गुरुजींनी उत्तर दिले, " या सर्व पदव्या आजच्या आहेत. भाऊसाहेबांमुळे मिळाल्या. त्यांच्याचसाठी आता त्यांचा उपयोग. " मग एकेकजण सांगू लागला, " एकेकाळी आम्हांला एकवेळच्या जेवणाचीही ददात होती. भाऊसाहेबांनी श्रद्धानंद बोर्डिंग काढले. हालअपेष्टा सोसून आम्ही ते चालवले. त्यातूनच सारे शिक्षण घेता आले. " एकेकजण सांगत होता; पाहुणे ऐकत होते. अमरावतीच्या या भागाचे हे दर्शन मलाही नवीन होते. बोर्डिंग काढायचे ठरले तेव्हा घरोघरी भांडी मागावी लागली होती. शाळा सुरू झाली तेव्हा पंजाबरावांना वकिली सांभाळून सायकल दवडवीत शाळेत मास्तरकी करण्यास यावे लागत होते. नवलकथेचा एकेक ग्रंथ तेथल्या टीचर्सरूममध्ये बसलेला होता.

या सर्व वातावरणातून मग आम्हांला मामांनी ' ट्रॅन्स्फर सीन ' मध्ये नेले. गाडी एका पाटीजवळ थांबली. " Shivaji College-Arts, science, Agriculture, Commerce and Law. " समोर टिनोपालच्या शुभ्रतेत एक भव्य इमारत विद्या हासत होती. तिला लागून कितीतरी इमारती त्याच तोऱ्याने उभ्या होत्या. कितीतरी इमारती विटांचे नवे थर नेसत तयार होत होत्या. आम्ही प्रमुख प्राचार्य श्री. नानासाहेब देशमुख यांच्या ऑफिसात पोहोचलो. तेथे ॲग्रिकल्चरचे प्राचार्य भार्गव पाहुण्यांना बजेटबद्दल सांगू लागले. बहुतेक आकडे लाखांचे होते. सरकारी कॉलेजांना मागे टाकणारी परीक्षाफले, पुढच्या योजना हे सारे थोडा वेळ चालले. आता पाहुण्यांना त्या मधाच्या

मध्यवर्तीच्या इमारतीची आतली श्रीमंती कळायला सोपे जात होते. तिजोरीत करोडोंची हिरेमाणके सांभाळणारे फाटक्या कपड्यातले श्रीमंत या भागात अजूनही आहेत. त्यांची मला यावेळी खूप आठवण येत होती. कारंज्याला असाच एक मळकट फाटका माणूस कस्तुरीचा भाव काफलेवाल्यांना विचारू लागला. आणि त्याने टेशीटेशीत कस्तुरीने भरलेले साठ उंट खरेदी केले. ते घराच्या भिंतीच्या मातीत टाकले. ही कथा किंवा दंतकथा महाराष्ट्रात पुष्कळांना ठावी आहे. त्या कस्तुरीचा वास मला समोरच्या पंजाबरावांच्या चित्रातून येऊ लागला. थोड्या वेळाने नानासाहेब आले. त्यांच्याशी त्यांच्या परवाच्या परदेशयात्रेबद्दल बोलून आम्ही मार्गी लागलो. संस्थेने चालविलेले इतर ठिकाणचे कॉलेजेस, शाळा इ. ची माहिती ‘ कार ’ धनी देत असतानाच आम्ही उद्योगपती बनारशांच्या कारखान्यात शिरलो.

श्री. बनारसे यांचे आजचे वैभव व पूर्वीची गरिबी यांना उपमा द्यायची तर शिवाजी संस्थेच्याच आजच्या शिवाजी कॉलेजसची व पूर्वीच्या श्रद्धानंद वसतिगृहाची ! माझा त्यांच्यावरचा ‘ अमृत ’ मधला लेख पाहुण्यांनी वाचलाच असेल, असे गृहीत धरून मी ‘ वटवट ’ टाळली. घाईघाईने कारखाना पाहिला. तेवढ्याच घाईने सरबत घेतले. श्री. बनारसे भारतावर नितांत प्रेम करणारे; पण त्या भारताच्या सरकारी दिरंगाईचा एक फटका त्यांना दोनच तासांपूर्वी बसला होता. तरीही ते स्थितप्रज्ञासारखे चेहरा कायम ठेवून आमचे आतिथ्य करीत होते. मामांचे ते जुने स्नेही. आपले एक शेत विकून तरुण मामासाहेब एक दिवस बाहेर पडले व लंडनला बनारशांच्या समोर उभे राहिले. दर भेटीत मामा त्या आठवणी डोळयात आणतात.

परत येताना अनंतवाडीमध्ये गेलो. गुजरात्यांनाही गुजराती वाटणारे श्री. ठाकरे हे कर्तबगार व्यापारी म्हणून गाजताहेत. त्यांची म्हणजे वाणिज्याकडे झुकलेल्या मराठी मनाची ओळख पाव्हण्यांनी करून घेतली. नंतर शिवाजी संस्थेची कन्याशाळा पाहून लोहे गुरुजींच्या प्राथमिक शाळेत गेलो. ही येथली आदर्श शाळा. केवळ आपल्याच नव्हे तर इतरही लोकांच्या संस्था पाहुण्यांनी पाहाव्या असा आमचा अट्टाहास. माळी मंडळींची शाळा, वैद्यांचे भारतीय कॉलेज — — पण आम्हांला भूक लागलेली त्यांना जाणवली. पटलीही. मग

त्यांच्याकडे येऊन खूप खाल्ले. फार न खाण्याबद्दलची एकही सूचना त्यांनी मला दिलेली नव्हतीच.

भोजनोत्तर विश्रांती ? पण आराम हराम है । हे नेहरूजी केवळ आपल्याच कानात सांगून गेले असा मामांचा समज. तेव्हा पुन्हा कारमध्ये. आमच्या राज कॉलेजमध्ये ॲड. राठी, प्राचार्य कोतवाल वगैरे मंडळी छापील पत्रकानुसार वाट पाहात होती. गरिबीतून एवढे वैभव निर्माण करणे ही पंजाबरावांची कर्तबगारी, तर खूप श्रीमंतांचा धर्मशाळा, यज्ञ वगैरेकडे जाणारा पैसा विद्यादानाकडे वळवणे ही ॲड. नारायणदासांची तळमळ. त्यातूनच या शाळा, कॉलेजे, बालकमंदिर इ. दहाबारा संस्था त्यांनी निर्माण केल्या. आमचे एक चालक श्री. शंकरलालजी हे चित्रपटाच्या जगामुळे मुंबईकर पाहुण्यांना माहीत होतेच. इकडचा कुठल्याही धंद्यातला माणूस असो त्याचे एक प्रमुख कार्य असते शिक्षणप्रसाराचे ! ही खात्री पाहुण्यांना आली. या श्रीमंत राठी मंडळींनी येथे मेडिकल कॉलेज का चालवू नये ? असा सूचक प्रश्न मग माधवरावांनी विचारला. त्याचे उत्तर त्या कॉलेजच्याच रूपाने त्यांना मिळणार आहे अशी मी ' आतली माहिती ' त्यांना दिली. श्री. मामा व श्री. राठी हे विद्यापंढरीचे दोन बडे वारकरी मी एकत्र पाहात होतो. छान योग होता. मामा संपूर्ण दौऱ्यात आमच्या सोबत राहणार आहेत हे मी ॲड. राठींना सांगितल्यामुळे ते माझ्याबद्दल निश्चिंत झाले व मला शहाणपणाने वागण्याचा सल्ला देण्याची गरज त्यांना भासली नाही. ' मुंबईच्या पाव्हण्यांना शक्य तेवढी जास्त स्थळे दाखव ' हे मात्र त्यांनी त्याही घाईत सुचवले.

आता डॉ. कोलत्यांकडे जायचे होते. विदर्भ महाविद्यालय हे बडे प्रस्थ. ते पाहिले म्हणजे सर्व शिक्षणसंस्था पाहून होतात का असे पाहुण्यांनी विचारले. मी नम्रपणे म्हणालो, " माधवराव, आतापर्यंत ज्या संस्था पाहिल्या त्या केवळ निम्म्याच होत्या. अर्थात तुम्हांला एका दिवसात सर्व पाहणे अशक्य आहे. "

" मग आसपासच्या गावांतून येथे मुले येत असतील ? "

" येथे दर पाच मैलांवर एक किंवा दोन हायस्कूले आणि तालुका नसलेल्या ठिकाणीही कॉलेजे आहेत. "

शेवटी सूत्ररूपाने त्यांना सांगून टाकले, " हा अमरावती जिल्हा आहे. शिक्षणात पहिला केरळ. संपूर्ण भारतात दुसरा हा अमरावती जिल्हा. "

एवढे सांगून होईस्तो डॉ. कोलत्यांचा आतिथ्यशील 'यावे !' कानावर पडला. कारमधून उतरून कोलते साहेबांशी गप्पा सुरू झाल्या. नंतर विदर्भ-महाविद्यालयाच्या देवळासारख्या गंभीर व भव्य इमारती पाहात असतानाच रिद्धपूरच्या परवा होणाऱ्या दौऱ्यानिमित्त बोलणे सुरू झाले. रिद्धपूर ही महानुभवांची काशी. आणि त्या पंथाचे तत्त्वज्ञान हा भाऊसाहेब कोलत्यांचा Ph. D. चा विषय. या प्रदेशाची संस्कृती त्या पंथाने घडवली.

येथेही लौकर निरोप घेणे भाग होते. म्हणून माझ्या या Alma Matter मधला बगिचा व त्यातला माझा आवडता हिरवा गुलाब माधवरावांना दाखवण्याचे राहून गेले. रस्त्यातली गाडगेबाबांची समाधीही ओझरतीच पाहिली.

मग घाईघाईने शिवाजी संस्थेचे बगिचे, शेती इ. बघून इथली सुप्रसिद्ध मेंडसे गार्डन पाहायला गेलो. दाटून आलेल्या अंधारात आम्ही पाहुण्यांना अंदाजाने सांगू लागलो, "हे द्राक्ष भोकरी, ते परपल, ते माल्टा--" पाहुण्यांना त्या सर्व प्रकारात फक्त एकच कळले की पपईच्या फोडींवर चवीसाठी लिंबू पिळतात ही मला नवी गोष्ट आहे. बाकी तो लिंबू-पपई प्रकार चविष्ट होता यात शंका नाही.

दिवस असा मस्त धावपळीत गेला. कारमध्ये केव्हातरी मामांची मानसकन्या प्रभा सामील झाली होती. तिने ग्रामसेवक संस्थेच्या बगिच्यातून आणलेली शेवंतीची सुगंधी लूट आपल्या रंगात धुंद होऊन कारभर दर्वळत होती. व त्या गंधविलासात तल्लीन होऊन आम्ही एका वेगळ्या जगाकडे चाललो होतो. जीवनात रंग, गंध असतो याच्या फक्त अफवा ऐकणारे ते जग. काही रस व दर्वळ होता याच्या आठवणी अपंग देहात व व्याकुळ मनात साठवणारे ते जग. या आजच्या कार्यक्रमात त्या जगाचा समावेश मामांनी करायलाच हवा होता काय? त्यांनी पॅरिसचे वैभव पाहिले, हिमालयाचा पवित्र निसर्ग पाहिला, विद्याविलास फुलवला, मऊ गाद्यांच्या मोटारी पाहिल्या आणि – त्यांनी पळसमंडळचे कण्हणारे लोकही पाहिले होते. पळसमंडळ या दौऱ्यात नव्हते. म्हणून त्यांनी त्यांच्याच तळमळीने तसेच कार्य करणाऱ्या एका संस्थेकडे कार चालवली होती. सुगंधी जगातली मंडळी जीवनाच्या एका वेगळ्या दर्पाकडे ते घेऊन जात होते. ही विदर्भ-यात्रा !

अष्टमीचा चढता चंद्र एका कमानीवर पडला होता. तपोवन ! महारोग्यांना नवे जीवन देणाऱ्या डॉ. पटवर्धनांच्या तृणकुटीसमोर गाडी थांबली. दाजीसाहे-

यांना आम्ही सांगितले, ' केवळ पस्तीस मिनिटे आमच्या जवळ आहेत.' त्यांनी चौतीस मिनिटांत आम्हांला मोकळे केले. त्या अवधीत त्यांनी ते दारुण जग आम्हांला दाखवले. दरक्षणी हसणाऱ्या अमरावतीच्या खूप दूर ते दाजीसाहेबांचे जग तडफडत होते. अत्यवस्थ रोगी केवळ वेडे व्हायचे काय ते उरले होते. आपल्या म्हाताऱ्या हातांनी दाजीसाहेब त्या अफाट दुःखाशी झुंजत होते. स्वतः कसलाही रोग न पाहलेला हा व्यायामप्रिय माणूस सुखी जगात राहायचे सोडून या बरड रानात आला. आणि आर्त किंकाळ्या फोडणाऱ्या अपंगांना त्याने येथे आमंत्रण दिले. अत्यवस्थ रोग्यांच्या विभागातून आमच्या जीवनावर थुंकणारी घाण येत होती. आमच्या आजवरच्या महत्त्वाकांक्षा, बढतीचढतीची स्पर्धा या सर्वांचा शेवटचा अर्थ येथे आम्ही खाटांखाटांवरून वाचत होतो. त्या दुर्दैवी लोकांनी आमच्या सभोवती गोळा होऊन प्रार्थना म्हटली. त्यांनी देवाला काहीही मागितले नाही. स्वतःसाठी हात पसरला नाही. ते जगाची शांतता मागत होते. आम्ही मोटारमध्ये चढत असताना काही सुधारलेले रोगी पाहून जरासा दिलासा आला. त्याच आशेने आम्ही डॉक्टरांना विचारले, " We hope, it is curable ! "

कोणी आसपास नसल्याची खात्री करून घेऊन दाजीसाहेब म्हणाले, " Yes. Yes. God is kind many times. पण हे पुन्हा पुन्हा मी अनुभवतो की Medical science is still in the dark. "

तपोवन पाहून आल्यानंतर आम्हांला काहीही पाहावेसे वाटले नाही. पण हनुमान व्यायाम शाळा हेही या विदर्भ जीवनाचे अंग आहे असे अण्णासाहेब म्हणाले. ही संस्था विशेषतः वेताच्या मल्लखांबामुळे जगभर प्रसिद्ध आहे. शिवाय गावात याच वेळी कुस्तीगीर परिषदेचे अधिवेशन चालू होते. त्यामुळे तपोवनाच्या उद्विग्न, दिव्रण आठवणींनीच आम्ही घाईघाईने तो आखाडा पाहला. तेथून ठाकरे गुरुजींच्या भक्तिमंदिरात जाऊन ज्ञानेश्वरीतील ओव्यांवर रचलेली चित्रे पाहात तपोवनातला भडका शमवू लागलो. गुरुजी आपला करोडो रुपयांचा शिवाजी शिक्षण संस्थेचा व्यवहार विसरून आमच्यावर त्या महाग्रंथाचे अमृत ओतू लागले.

दिवस असा संपला.

# दुसरा दिवस

आजवरच्या आयुष्यातल्या शनिवारच्या रात्री सुखासीन रविवारच्या स्वागताने भारावलेल्या असत. पण ही रात्र विलक्षण थकव्यातही झोप येऊ द्यायला तयार नव्हती. तपोवनाच्या किंकाळ्या अन् त्यातून उगवलेली ती विश्वकल्याण मागणारी उदात्त प्रार्थना, ठाकरे गुरुजींकडच्या ज्ञानेश्वरीमधल्या ओव्यांचे चित्रांकित दर्शन यांनी मन रोजच्यापेक्षा वेगळे वाटत होते. आणि त्या नव्या जगाला दूर सारण्याचा हतबल प्रयत्न करीत मी विद्येने तुडुंब भरलेल्या इथल्या शिक्षणसंस्था, अवाढव्य इमारती आणि प्रभाने मोटारीत उधळलेल्या सुगंधी ओंजळी यांनी हासणाऱ्या जगाकडे धडपडत पळत होतो. एक ग्लानी संपली व मामांचा सहकारी हाका मारू लागला. प्रवासाचा दुसरा दिवस सुरू झाला. पाहुण्यांनी रुरलची इमारत व तिचा श्री. लोंढ्यांच्या कल्पनेतून साकार झालेला आखीव परिसर तोपर्यंत पाहून घेतला होता. चालत्या गाडीमधून मी समोरच्या गाडगेबाबांच्या मूर्तीला हात जोडले. सारे सोहळे आमंत्रण दिल्यासारखे याच आठवड्यात अमरावतीस गोळा झाले होते. कुस्तीगीर परिषद, भाऊसाहेबांचा वाढदिवस, शाळा कॉलेजांची संमेलने आणि गाडगेबाबांची यात्रा—सारे सारे एकाच वेळी. सारे उदय, सारे अस्त एकाच पेल्यात.

गाडगेबाबांच्या पुतळ्याभवती घडवंच्या ठेवून कसली तरी सजावट व रोषणाई यांची तयारी चालली होती. या महाराष्ट्र सूर्याला रोषणाईची गरज? समोरच त्या परंपुरुषाचे पूर्वीचे सवंगडी गोळा झाले होते—भिकारी—अपंग. गाडगेबाबा त्यांना दरवर्षी यात्रोयात्री पुरणपोळीचे जेवण देत. त्या मिष्टान्नाची व सहानुभूतीची आठवण त्या देवळाच्या सध्या चाललेल्या पखवाजी भजनावर पाखर घालीत होती. आमची गाडी आमच्या नकळत वलगावच्या पेढी नदीजवळ उभी झाली. गाडगेमहाराजांचे निर्वाण झाले त्या ठिकाणी एक सुंदर पुतळा बसवला होता. अशाच गाडीतून भरधाव येत त्यांचा आत्मा परमात्म्यात लीन झाला होता. गतीचा सोस त्यांनी देह त्यागेपर्यंत सोडला नव्हता. त्या घटनेची आठवण देणारे स्थळ समोर उभे होते. आणि त्याहीपुढे—होय; इकडचा प्रसिद्ध पूल. हा सोळा कमानींचा भव्य पूल ओलांडून आम्ही कालचे मन व वातावरण मागे टाकले. सूर्य दुतर्फांच्या गंभीर शेतांवरून सोन्याच्या गोष्टी करीत होता.

आसेगाव आले. मामा या प्रदेशाच्या ठिकाणांना विसरत नाहीत; आणि मित्रांना तर मुळीच नाही. काल त्यांनी संस्था दाखवल्या. आज ते निसर्ग, इतिहास व माणसे दाखवणार होते. माणसे आम्हांला कालही दिसली होती. ती माणसे नसून संस्थाच होत्या. माणसांनी संस्था घडवल्या होत्या व संस्थांनी नकळत ती माणसे घडवली होती. व्यायामपटू दाजीसाहेबांनी महारोग-निवारण संस्था स्थापली व त्या संस्थने सरोगबंधू दाजीसाहेब घडवले होते. शिवाजी संस्थेने व श्री राठी संस्थेने घडवलेले तर कितीतरी चेहरे आम्ही पाहिले होते. मामांचा विविधता आलेला–सुख, दुःख, कर्तबगारी, सेवाभाव यांनी घडलेला एक चेहरा तर सोबतच होता. शिवाय या प्रदेशाचे राजकारण घडवलेला व राजकारणाने ज्यांना घडवले असा माजी मंत्री पी. के. देशमुखांचा चेहराही माधवरावांना आम्ही दाखवला होता. पुत्रनिधनाचा शोक पचवलेल्या त्यांच्या चेहऱ्याचे शब्दचित्र मी पाहुण्यांच्याच वृत्तपत्रात दिले होते. त्यामुळे व शंकरराव देवांची नागपूरच्या रागीट जमावातून सुटका करणाऱ्या व त्या प्रसंगी स्वतःचा जीव धोक्यात घालणाऱ्या पी. के. चा चेहरा त्यांनी मुद्दाम पाहिला होता. पण आजचे चेहरे वेगळे होते. राजकारण, समाजसेवा यांनी दिलेल्या रूपांपेक्षा निराळ्या कारणांनी घडलेली माणसे आज बघायची होती. येथला निसर्ग, धर्मप्रवाह, इतिहास यांच्या परंपरेतून पोसली गेलेली पूर्णामायची लेकरे ! आसेगाव येथे सडकेवर गाडी थांबवली.

या प्रदेशाची पुण्यसलीला, पूरितकामा पूर्णामाई दुथडी कौतुक पसरवीत शांतपणे वाहात होती. तिच्या एका अंगाला एक वऱ्हाडी वाडा उभा होता. वाड्याच्या पायऱ्यांशी उत्तमराव पाटलांचा माणूस हुरड्याची कणसे भाजीत आमची वाट पाहात होता. शेकोटीतून एक चवदार धूर आम्हांला हाका मारीत होता. इंग्रजी आमदानीत काळाची पावले ओळखून काही पाटलांनी आपल्या पोरांना सातासमुद्रापल्याड धाडले. तसे एक कर्तबगार यशवंतराव वाटाणे इथलेच. त्याच रक्तातले उत्तमराव पाटील. मामांचे मित्र. त्यांच्याकडे हुरडा व त्याची खारी-गोड विविध पक्वान्ने चापून आम्ही तृप्त झालो. हे दिवस हुरडा संपण्याचे. पण तशाही वेळी आपण मुंबईच्या पाहुण्यांना कोवळा हुरडा देऊ शकलो याचे समाधान पाटलांच्या चेहऱ्यावरून पूर्णामाईसारखे वाहात होते.

पाटलांना रामराम करून आम्ही परतवाड्याच्या दिशेला लागलो. मामा स्वतः गाडी चालवण्यात गुंतलेले पाहून मी त्यांचा पूर्व आदेश विसरलो व ते ज्याला ' वटवट ' म्हणतात ती करू लागलो. मघा वलगावला गाडगेबाबांची निर्वाणभूमी पाहून मन भरून आल्यामुळे, त्या गावाबद्दल पुष्कळ गोष्टी माधव-रावांना सांगायच्या राहून गेल्या होत्या. वलगावला मी इंग्रजी शिकण्याचा प्रारंभ केला इथपासून तर त्या खूप जुन्या शाळेचे हेडमास्तर इंदाणी कसे सुंदर शिकवीत इथवर सारे सारे मी सांगून टाकले. खरेच तो काळ किती अविस्मरणीय ! ऑल इंडिया फूटबॉल प्लेयर्स त्या गावाने घडवले. खेळात असा रस घेणारे शंकरलालजी रंगभूमीची सेवा तितक्याच निष्ठेने करीत होते. ' गोकुळचा चोर ' या नाटकाच्या आठवणी अजूनही मोहोळासारख्या वाटतात. आज ते गृहस्थ चित्रपटाच्या खारट सागरात हारवल्यागत झाले. पण तेव्हा...

परतवाडा आले तेव्हा अचलपूरला जाणे राहून गेल्याचे कळले. [ माझ्या वटवटीचा परिणाम ? ] अचलपुरात पूर्वीची इमादशाही नांदली होती. तिच्या नावाचे एक खंडारे पाहण्यात मला तरी रस नव्हता. त्यापेक्षा परतवाड्यात उसाचा रस शोधणे मला परवडणारे होते. पण मग तेथेही परतवाड्यालाही न थांबता आम्ही मुक्तागिरीकडे गेलो. त्यासाठी आम्हांला वऱ्हाड सोडून मध्य-प्रदेशामध्ये जावे लागले. अर्थात हा भूगोल काल-परवाचा. मुक्तागिरी अजूनही आम्ही आमचीच मानतो. शिवाय मध्यप्रदेशाच्या कुटुंबातला वऱ्हाड हा जुना मेंबरच की नाही ? मुक्तागिरी व इतरही धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळे यांच्याबद्दल मी पाहुण्यांना माहिती द्यावी अशी माझ्याकडून सर्वांना अपेक्षा होती. केवळ तेवढ्यासाठी या सहलीत माझा अंतर्भाव झाला होता. इतरही लोकांचे समावेश असेच या ना त्या कारणाने झालेले होते. उदा. मामा. गडकऱ्यांना शिवाजी संस्थेच्या वऱ्हाडभरच्या शाळा दाखवण्यासाठी त्यांनी स्वतःला आपल्यासोबत घेतले होते. ते स्वतः कार चालवीत. पण कधीमधी थकण्याची सवय त्यांना असल्यामुळे त्यांचा मुलगा दादा याचाही समावेश झाला. या संपूर्ण प्रवासात तो दिवसाला पाच शब्दही बोलला नाही. आम्ही त्याला वेगाने गाडी हाकण्यास ( व मामा जपून चालवण्यास ) सांगत होतो. त्याच्या सोयीप्रमाणे तो वागत होता. मामांनी एक नोकर मधुकर गव्हाणे सोबत घेतला होता. त्याच्याकडून पाहुण्यांना बरेचदा स्थळांच्या इतिहासाचे ज्ञान होई. छापील

इतिहासापेक्षा त्या त्या गावचे तांगेवाले, भाजीवाले वगैरेंकडून जी माहिती मिळते ती लालित्याच्या दृष्टीने फार आवश्यक असते असे अनंत काणेकरांचे मत मी परवा ऐकले होते. म्हणून मधुकर गव्हाणे हा गृहस्थ महत्त्वाचा. दोन दिवस रजा म्हणून नागपुरेही सोबत होते. आणि आजच्यासाठी रात्री जागून खाण्याचे पदार्थ तयार केले या आधारावर प्रभाही सामील झाली होती. तिच्या ताब्यात चवदार उसळ, खमंग समोसे वगैरेचा डबा असल्यामुळे, तिचे महत्त्व अर्थातच वाढले होते. काट्याने काटा काढावा या न्यायानुसार मामांनी माझ्या वटवटीवर उपाय म्हणून ही व्यक्ती निवडली होती. आमचा हा सारा प्रपंच मुक्तागिरीच्या पायथ्याशी थोडा वेळ उभा राहिला. पहाडावर जाऊन देवळे बघायची होती. त्याआधी पाहुण्यांना मुक्तागिरीची माहिती देणे आवश्यक होते. मी हळूच पायथ्याच्या वाड्यांमध्ये एक दोघांना गाठून मुक्तागिरी वर्णनाचे पुस्तक मागितले. पण ते संपलेले होते. मला त्या स्थळाची एवढीच माहिती होती की हा भाग पूर्वी दादासाहेब खापर्ड्यांच्या मालकीचा होता. व जैनांच्या भावना जाणून बाबासाहेबांनी तो नथ्थूसा पासूसा यांना विकला होता. 'येथली फळे व रानधन चांगले असते हे फक्त आम्ही कानांनी ऐकत होतो. जनतेने आमच्या डोळ्यांना ते पाहण्याची संधी केव्हाच दिली नाही', असे काहीसे विनोदाने बाबासाहेब एकदा सांगत होते. त्याही उद्वेगाने त्यांनी आपली शेती विकली असावी अर्थात माझी ही माहिती गेल्या दहावीस वर्षांबद्दलची. तेव्हा ती ऐतिहासिक नव्हे. तरीही मी डगमगलो नाही. चेहरा बृहस्पतीसारखा करून व जेथे तेथे ऑब्जेक्शन घेणारी प्रभा तेथे नाही याची खात्री करून मी माधवरावांना गंभीर आवाजात सांगितले, "असं आहे मिस्टर गडकरी, या स्थळाचं जैनांना अतिशय महत्त्व आहे. म्हणून त्याला अतिशय 'क्षेत्र' म्हणतात. काही चमत्कार जर घडले तर त्यालाही अतिशय क्षेत्र म्हणण्याची चाल आहे म्हणतात."

अतिशय क्षेत्र भातकुली ( भोजकोट ) या स्थळाच्या चमत्कार आख्यानाची मी त्यांना माहिती देऊ लागलो. पण मुक्तागिरी बघायची व भातकुलीबद्दल ऐकायचे हे समीकरण पाहुण्यांना मान्य नसावे. तेवढ्यात 'पहाडावरून लवकर परत या' असा हुकूम कानी पडला. याचा अर्थ मामा तेथे येणार नव्हते. प्रभा, नागपुरे, दादा वगैरे बघता बघता दिसेनासे झाले. मला तिथल्या माणसाने अडवले. मुक्तागिरीच्या भव्य पहाडावर कोठेही चामडी जोडे न्यायची मनाई आहे.

सारा पहाडच देवळाचे महत्त्व घेऊन उभा. त्या माणसाशी काही गरम शब्दांची देवाणघेवाण झाल्यावर जोडे, कॅमेऱ्याचे कातडी घर इ. काढून ठेवले व मी-ही पहाडाकडे धूम पळालो. माझ्या हाती फोटो काढण्याचे काम असल्यामुळे मला तिकडे जाणे भाग होते. न पेक्षा दिगंबर पद्मनाभाची पवित्र नम्रता त्या मधाच्या माणसाच्या स्वभावात विकृत होऊन उतरल्यामुळे वेगळे काही पाहण्याची इच्छाच उरली नव्हती. देऊळवाल्यांचा तो कोणी लागत होता म्हणे. मंग्यांपासून कुत्र्यांपर्यंत सर्वांच्याच भाच्या-पुतण्यांना मी अतिशय घाबरतो.

मुक्तागिरी चढायला कठीण; पण अतिशय समणीय आहे. त्या अतिशय क्षेत्रात चढण, मंदिरांचे बांधकाम, धबधबा, नदी, वृक्षल्वली इ. ची शोभा अतिशय आहे. इतके खरे की सातपुडा व सह्याद्री हे निसर्गशोभेबाबत सारख्याच तोंडावळ्याचे. त्यामुळे परशुराम, माहूर किंवा आणखी काही पाहिलेला माणूस या स्थळी आनंदाने भारावला तरी विस्मयाने नव्हे. अमरावतीकरांना हे ठिकाण Week end सहलीसाठी खूप आवडते याला कारण इथली नितांत शांतता.

आज शाळा-कॉलेजांची पोरे आकोट, अमरावती वगैरे ठिकाणांहून येथे आली होती. गळेपडू रेडिओ, कॅमेरे, बाजे, थर्मास इ. सह त्यांचे गिर्यारोहण सुरू होते. फोटो मीही घेणार होतो. पण ते स्थळांचे. त्यात माणसे येणार नव्हती. ती आली तरी माझा फोटो मुळीच येणार नव्हता. कारण या कॅमेऱ्यास self ची व्यवस्था आहे हेच मला माहीत नव्हते. ते दोन तीन तासांनी कळले तेव्हा पुष्कळसे ' मी ' च त्यात स्नॅप झाले असे फिल्म-परीट सांगत होता. असो.

खूप धाप लागल्यानंतर फोटो घेण्याइतपत चांगला कोन मिळाला. दृश्य सुंदर होते. खाली प्रचंड उतरण. हिरव्या करड्या झाडीने मढविलेली, मध्ये शुभ्र देवळे. शांतिदूत कबुतरांसारखी ! आणि वरून गाणारा धबधबा. पण हे सर्व व्यवस्थित-पणे फोटोत येईल अशी जागाच गवसेना. इतर लोक भक्तिभावाने देवदर्शन करीत असताना मी मात्र फोटोयोग्य ठिकाणासाठी चढत आणि उतरत होतो. शेवटी दोन-तीन प्रसंग साधले. एका पोराने सर म्हणून आदर दाखवला त्याचा फायदा घेऊन त्याच्याही कॅमेऱ्यात माझी छबी शिरली. नंतर मंडळीसोबत डोळे भरून सर्व दृश्य पुन्हा एकदा पाहिले. या पवित्र, शांत निसर्गात आणखी थोडा वेळ राहणे चुकीचे नव्हते; पण खाली मामा होते.

हा पहाड बघण्यास तिकीट आहे. ते चुकते केले तेव्हा तिकीटावरच त्या मघाच्या माणसाने ' माफ करा ' हा शब्द लिहिला. त्यामुळे पुन्हा एकदा मघाच्या भांडणाची आठवण झाली. संसाराला कंटाळलेली व बायकोशी भांडलेली माणसे जर तेथे शांततेला शरण येण्यासाठी आली तर तो गृहस्थ त्यांना यापेक्षा संसार बरा असे वाटायला लावल्यावाचून राहणार नाही. मघाच्या भांडणात माझी बाजू घेणारे मामा थोड्या वेळाने मला म्हणाले, " हे बघ तिऱ्हाईत माणसाशी भांडायचे नाही. तुला काय वादविवाद, चर्चा, मतभेद म्हणजेच भांडणाचे सर्व प्रकार-उपप्रकार करायचे असतील ते आमच्याशी कर. तेवढ्याचसाठी हे नागपुरे, ही प्रभा यांना सोबत घेतले आहे. "

आणि यामागचा उद्देश काय ? तर दादाला ड्रायव्हिंग करताना झोप येऊ नये ! गाडीमधली मंडळी एकदम शांत दिसली तर मामा अस्वस्थ होत. विशेषतः रात्री, दादा गाडी चालवीत असला म्हणजे तर मंडळींपैकी कोणाला तरी माझ्याशी मुद्दाम काही तरी उकरून काढायला सांगत.

मुक्तागिरी आम्ही सोडले. काही तरी नवे व आयुष्यात पहिल्यांदा पाहले हे समाधान माधवरावांना व मला होते. नवी गोष्ट सुंदर नसेल फारशी; पण नवी होती.

कच्चा रस्ता व मध्यप्रदेश सोडून आम्ही पुन्हा सडकेवर आलो. शिरजगाव कसबा येथली शाळा पाहायची होती. गावकऱ्यांनी नुकतीच नवी इमारत बांधली होती. तिचा पहिला फोटो घेण्याचा मान मला ॲड. राठींनी दिला होता. या दौऱ्यात शाळा आम्ही पुष्कळ बघणार होतो. पण त्या बहुतेक सर्व शिवाजीच्या. आमच्या संस्थेची शाळा ही एकच पाहायची होती. आम्ही तेथे पोहोचलो तेव्हा गावकरी मंडळी छापील पत्रकातल्या वेळेपर्यंत वाट पाहून दमून परत गेली होती. हेडमास्तरांनी पुन्हा सर्व लोक गोळा केले. ते सारे होण्यात तीन तास खर्च झाले. फराळ ठरला होता तेथे जेवणाची वेळ झाली. पण जेवणामुळे फार उशीर होत असतो या वऱ्हाडी अनुभवामुळे, आम्ही त्यांना पूर्वीच आवर्जून पत्र टाकले होते की जेवणाच्या भानगडीत पडू नका. आम्ही घाई करीत होतो; पण लोक येणे, स्वागत, सभा, भक्कम फराळ इ. नी आमचे छापील कार्यक्रम पुन्हा सरकावले. मी येथे होस्ट होतो. पुन्हा ती संधी मला मिळणार नव्हती. गडकरींनी या सर्व उशिराचा फायदा करून घेतला. महाविदर्भ, महाराष्ट्र इ. बद्दलची मते

व माहिती त्यांनी गावकऱ्यांना विचारली. आतिथ्याखातर मग महाविदर्भवादी मंडळींनीही पाहुण्यांना फारशी कटू माहिती दिली नाही. महाराष्ट्रात कामे कशी रेंगाळतात त्याबद्दल काही बोलण्याची मंडळींची इच्छा होती. माझा एक जुना विद्यार्थी तेथे भेटला. लष्करातून सुट्टीवर आला होता. तो तावातावाने या नव्या राजवटीवर बोलणार होता. पण त्याला गप्प करून एका सभ्य माणसाने सांगितले, "गडकरीसाहेब, सरकारच काय; पण जनतेचे खरे प्रतिनिधी असे तुम्ही वृत्तपत्राचे लोकही आमच्या वऱ्हाडचे किती प्रश्न जिव्हाळ्याने मांडता ? आता तुम्ही आपणहून आमच्या गावापर्यंत आला तेव्हा तुमचा एकट्याचा जिव्हाळा सिद्ध झाला. येऱ्हवी पश्चिम महाराष्ट्रातल्या गल्लीबोळाच्या वार्तेइतकेही महत्त्व या प्रदेशाच्या घटनांना मिळत नाही. त्यापेक्षा आमची नागपूर राजवट आम्हांला जवळची वाटे. आता आम्ही तक्रारी, तक्रारी तरी तोंडाने किती सांगणार ? त्यापेक्षा तुम्ही जरा सोबत चला व प्रत्यक्षच पाहा.

मघाचा माझा विद्यार्थी जे सांगणार होता तेच प्रत्यक्ष पाहण्यासाठी आम्ही त्या मंडळींसोबत गेलो. नदीला दगडांची रास नावाचे काही बांध घातले होते. ते दरवर्षी फुटत होते. गावात पाणी शिरतच होते. सरकारी खर्च मात्र लाखाला टेकला होता. खर्चाप्रमाणे काम झाले नाही व जे झाले ते निम्म्या पैशात व सुंदर झाले असते. हे सरकारला इतक्या वर्षांतही उमगले नव्हते. आम्ही तो बांध पाहून परत आलो. गडकरीही विषण्ण झाले. पण काही न बोलता या छोट्याशा गावात दोन हायस्कुले कशी चालतात ? येथले शिक्षणविषयक प्रश्न कोणते, डॉ. ठाकुरदासांनी या शाळेला किती देणगी दिली वगैरेचा तपशील कागदावर उतरून घेत होते. जरा वेळाने सर्वांचा निरोप घेऊन आम्ही पुन्हा प्रवास सुरू केला.

इकडे बहिरमची यात्रा प्रसिद्ध. पुरती महिनाभर चालते. तमाशापासून बैलगाडीपर्यंत सारे विकत मिळते. ती पाहुण्यांना दाखवायचे छापील पत्रकाच्या मनात होते. ते पत्रक आज दोन तीन माणसांनी वापरल्यामुळे त्याला बिचाऱ्याला पुढचे काहीच सांगता-ठरवता येईना. तेव्हा मामांनीही बहिरम बेत रद्द केला. बहिरमच्या यात्रेच्या हाती जर का ते आमचे आखीव पत्रक गेले तर मग तेथून आठ दिवस निघण्याची गोष्टच नको ! हीहि भीती त्यात असेलच. आम्ही लोककला ऊर्फ तमाशा या विषयावर जरा लाळ सुटून बोलली होतो. ते मामांच्या

कानावर गेले होते की काय देव जाणे. हे किंवा इतर म्हणजे कार्यक्रमांना बेसुमार उशीर वगैरेमधलेही एखादे घट्ट कारण असेल. काय असेल ते असो पण त्यांनी गाडी चिखलदऱ्याला नेण्याची सक्त आज्ञा दादाला दिली. मग नुकसान-भरपाई म्हणून बहिरमच्या नुसत्या कथाच मी माधवरावांना सांगत राहलो.

चिखलदऱ्याची ओढ आम्हांला दोन कारणांनी होती. एकतर दिवस टळत आला होता व तरीही पोटात फराळाशिवाय काहीच नव्हते. आणि चिखलदरा बघितल्याशिवाय छापील पत्रकातले झोपण्याचे ठिकाण आम्हांला मामा दाखवणार नव्हते. वऱ्हाडी लोक व मामा यांचा हा सामना अवर्णनीय होता. बहिरम हे उशीरामुळे रद्द करावे लागले याचा पराभवही त्यांना बराच लागला होता. म्हणून निदान चिखलदरा तरी आटोपावा ही त्यांची जिद्द होती. चिखलदरा खऱ्या अर्थाने रस्त्यानेच दिसत होता. गाडी खूप चढत आणि उतरत होती. दादाचे कौशल्य पणाला लागत होते. रस्त्यात खंडोंशी ससे दिसत होते.

चिखलदऱ्याला पोचल्यानंतर कोणीही माणूस तेथल्या निसर्गाकडे थक्क होऊन पाहील. मी यापूर्वीच्या प्रवासामध्ये खरोखरच मंत्रमुग्धतेने त्या स्वच्छ सुंदर निसर्गाकडे पाहलेले आहे. आज मात्र तेथे गेल्याबरोबर पहिला कर्यक्रम आम्ही केला तो डबा सोडण्याचा. जेवतांना समोसे, पुऱ्या इ.मुळे प्रभाबद्दल सर्वांचे मत चिखलदऱ्याइतकेच चांगले झाले. जेवण संपले न संपले तोच आम्ही जरावेळ आराम करण्याची कल्पना काढली. बेट्या पत्रकात तर तिचा कुठेही उल्लेख नव्हता. तरीही आम्ही थोडेसे पहुडलो; इतक्यात तिथल्या सरकारी अधिकाऱ्याशी गप्पा करण्यात रमलेल्या मामासाहेबांचे आमच्या आरामाकडे लक्ष गेले. त्यांनी निर्वाणीचे सांगितले, "आता लवकरच अंधार होईल. त्याआधी शक्य तेवढी स्थळे पाहून या. आणि त्यांनी दादाला व मला तात्काळ उठण्याच्या स्पेशल आज्ञा केल्या. ते या वेळी सोबत नसणार याचा मात्र सर्वांना आनंद झाला. त्या ऑफिसरशी बोलण्यात ते पुन्हा गढून गेले. आम्ही आपले गाविलगढकडे निघालो. थांबणेच भाग होते अशा ठिकाणी गाडी थांबवून मी व माधवराव किल्ल्याकडे निघालो. प्रभा नुकतीच गोळा केलेली फुले सांभाळीत गाडीमध्येच थांबली. मुक्तागिरी चढताना तिने जरा अंगाबाहेरचा उत्साह दाखवला होता किंवा गाविलगढ तिने पूर्वी पाहला असणेही शक्य आहे.

जंगल तुडवीत आम्ही जरासे पुढे गेलो. निर्गुडीचे एक भले मोठे वेट सात्त्विक चेहरा करून उभे होते. कर्णफुलासारखी ठिपकेदार नक्षी असलेल्या फुलांची काही झुडपे त्याच्या आसपास बहरली होती व आरामशीर चेहऱ्याचे काही अगडबंड अंगाचे कातळ स्वस्थपणाने पहुडले होते. दिवसाचा सारा शीण ते दृश्य पाहून नाहीसा झाला. समोरच गाविलगडाचा पहिला दरवाजा दिसला. त्या दरवाज्यातून काजळनिळे आभाळ व दूरदूरचे महावृक्ष यांचे एक छानदार दृश्य मनात भरत होते. गडकरींच्या सूचनेवरून मी त्याचा एक फोटो घेतला. पावले न कळत पुढे सरली. दरवाजा व पहारेकऱ्यांची जागा हेच बांधकाम मुळी एखाद्या भव्य महालाएवढे ! तो ओलांडला व आत गेलो. समोर भले निबिड रान, दऱ्या पसरल्या होत्या. दारातून आत गेले म्हणजे आंगण पाहण्याची आम्हांला सवय. फार तर थोरामोठ्याचे घर म्हणून बगिचा दिसावा. हा गाविलगडचा राजा अजबच शौकिन असावा. पठ्याने आपल्या घराच्या आत महावृक्षांचे घनदाट जंगल, ओहोळ व दऱ्या लावल्या होत्या. आणि महाल वगैरेचा कोठेच काही पत्ता नव्हता. पाऊण—अर्धा मैल गेल्यानंतर पुन्हा दुसरा दरवाजा लागणार होता. तो पार केला की असेच रान, ओहोळ व दऱ्या ! दार ठोठावताच लोकवस्तीचा पत्ता लागायला ते काही आजच्या कारकुनाचे घर नव्हते. असे कितीक तट, कितीक राने ओलांडल्यानंतर एक तळे लागणार होते. मग त्यातल्या त्यात एक छोटा पहाड व मग किल्ला. दिवस तर संपत आलेला. किल्ले असे अवाढव्यच असतात. पण गाविलगडची रीतच न्यारी. येथे एक किंवा दोन दरवाजे ओलांडण्याने काम भागणार नव्हते. अठरा पुरचुंड्या खोलल्यावर मग कुठे पैसा हाती लागणार. हा किल्ला बांधणारा माणूस खूपच विनोदप्रिय असावा. दरवाजा हाती आलेला शत्रु जेत्याच्या आनंदात पुढे सरावा व त्याला किल्ला दिसूच नये. त्याची ती फजिती कल्पनेने अनुभवीत किल्ल्याचा मालक अनेक तटां-दारांआड मस्त हासत असेल ! एक किल्ला जिंकणे म्हणजे एक लढाई हे गणितच येथे चुकीचे आहे. [ प्रतापगडासारखे तीन गड यात बसतील असा विस्तीर्ण असा हा गड आहे ! असे ॲड. अकर्त्यांनी मला सांगितले होते. ] पूर्वी मी एकदोनदा प्रयत्न करूनही त्याचा पूर्ण विस्तार पायाखाली घालू शकलो नव्हतो. आज तर सांजडुबी केवळ तासावर आलेली. तेव्हा पाहुण्यांना नाइलाजाने दरवाज्याहून परत फिरणे भाग होते. शैक्षणिक संस्था, उद्योग, शेती, राज-

कारण, समाज, इतिहास, धर्म यांचे इतके विविध पोत या प्रदेशात आहेत की पक्ष्यासारखा सहज उडता फेरफटका मारणाऱ्या आम्हा लोकांना ते सर्व एका दमात पाहणे केवळ अशक्य होते. सहज साधी शिरजगावाची शाळा पाहतो म्हटले तरी ती लोकांची सभा, हारतुरे, पार्ट्या, फोटो व मग गप्पांची बैठक यासह पाहणे या प्रदेशात भाग पडते. नुसतीच शाळा पाहायची तर कोणाला न कळवता, रात्री पाहा. त्यामुळे शिक्षणसंस्था पाहायला बोलावलेल्या गडकरींच्या कार्यक्रमात त्यांचा स्वतःचा इतरही गोष्टी पाहण्याचा, माझा नुसता मजा लुटण्याचा किंवा मामांचा मित्रांना भेटण्याचा असे अनेक हेतू बसवणे खरोखरच कठीण जात होते.

पण इच्छा असली की मार्ग सापडतो असे सातवीचे आमचे मास्तर म्हणत असत. सातवीतल्या पोरांशी कोणी उगीच खोटे बोलणार नाही. विशेषतः एखादी गोष्ट न पाहण्याची इच्छा असली तर मार्ग काय हजार सापडतात. म्हणूनच पाहुणे व मी किल्ला टाळण्याच्या प्रश्नावर विचार करू लागलो तेव्हा प्रत्येकी दहाबारा मुद्दे गवसले. "हं ऽ ऽ किल्ला काय किल्ल्यासारखा असणार!" "किंवा इतर किल्ल्यांहून जरासा वेगळा असणार." "मोठा म्हणजे दुसऱ्या एखाद्या किल्ल्याला दोन किंवा तीनने गुणायचे असेच की नाही?" येथे तर चारनेही गुणायची तयारी! आमच्या अमरावतीस एक कोणी शंभर तास सायकल चालवणारा माणूस आला. त्याची महान कृती बघायला कोण गर्दी! माझे गणित सरळ होते. त्याने शंभर नाही हजारही तास चालवली तरी मी रस्त्यातून चालवतो तशीच ना ती सायकल? आणि चालवणेही तसेच की नाही? सर्कशीतल्या-सारख्या कोलांट्या उड्या तर नाही ना मारीत तो त्या सायकलवर? पायाऐवजी हाताने नाही पॅडल मारीत. जमिनीऐवजी तारेवरून नाही ना सायकल चालवीत? मग त्यात पाहण्यासारखे काय आहे? आपण तासभर सायकल चालवतो त्याच स्थितीला शंभरने गुणले म्हणजे झाले. त्यासाठी मुद्दाम बघायला कशासाठी जायचे? अगदी हाच हिशेब या किल्ल्याबद्दल करायचा. याच न्यायाने माणसाचा कितीतरी प्रवास वाचायला हरकत नाही. कोणी अमका मेला म्हणून चालले लोक दिल्लीला. त्यासाठी आगगाडीत मारामाऱ्या, गोंधळ. हवी कशाला एवढी यातायात? येथे आपल्या जन्मग्रामी माणसे मरत नाहीत? जाऊ द्या झाले. लोकांना शहाणपणा नाही हा काही आमचा दोष नव्हे. पण आता मामासाहेबां-

चेही जरा चुकलेच नाही का ? एक शाळा तशा हजार शाळा. शिरजगावाच्या शाळेत पोरे शिकतात अन मोर्शीच्या शाळेत काय कोंबड्या शिकतात ? पण निदान गाविलगढबद्दल हे विचार पक्केपणी करायला आम्ही समर्थ होतो. मामा सोबत नव्हते. मग रात्र पडण्याआधी चिखलदऱ्याच्या आणखी काही जागा पाहण्यासाठी पुन्हा मोटर चालू केली. गाडी एका तलावापाशी थांबवली. तलाव बापजन्मी पहिल्यांदाच पाहतो आहोत अशी कल्पना करून घेऊन तेथे बाहेर-गावचे अनेक लोक मोठ्या स्वर्गीय समाधानाने बसले होते. रविवार हा विचित्र वार आहे. आठवडाभर सर्व ऑफिसांमधून कोंडलेली कारकून नावाची जमात व शाळा-कॉलेजात डांबलेली पोरे त्या दिवशी सैराट सुटतात व एकान्त एकान्त करीत कुठल्यातरी निवांत जागी जत्रा भरवतात. रविवार या दिवशी या मंडळीस काय आवडेल त्याचाही नेम नाही. चिखलदऱ्याला पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. म्हणून येथल्या रहिवाशांनी फार तर बसावे येऊन त्या जलथलावर. त्यातल्याच एखाद्या बऱ्या शब्दवाल्याने चारदोन कविताही पाडाव्या. आपल्या पाणगोडीत त्यांनी डझन दोन डझन वाळवंटी पाहुणेही सामील करावे. पण जाऊ द्या. मी पाहुण्यांना चक्क सांगून टाकले, " हे बघा माधवराव, तुम्ही पाहिला आहे अरबी समुद्र. तेव्हा या तलावात काय पाहणार ? चला त्यापेक्षा पंचबोल पाहू."

" पंचबोल ही काय भानगड ? "

" अहो, एक आवाज करा, चक्क पाच आवाज परत येतात. "

पाहुणे खुश झाले; पण आता दिवस अगदीच घोटभर उरला होता. तेव्हा पुन्हा उदात्त विचार आला की पाच आवाज म्हणजे काय ? आपल्या पहिल्या आवाजासारखेच की नाही ? जर त्यात फरक नाही, शब्द तेच, वाक्य तेच तर मग नाविन्य ते काय ? तेवढ्यासाठी आजवर विजापूर पाहिले नाही त्याचाही खेद करणे मी त्याच मुहूर्तावर सोडून दिले. आणखी एक खाजगी कारण असे होते की पंचबोलावर फार मोठ्याने हाका माराव्या लागतात. काही वर्षांपूर्वी विजू व मी तेथे गेलो होतो. त्यावेळी हाकाच मारायच्या तर आपल्या प्रिय व्यक्तीला माराव्या; तिचे नाही तर निदान आपले तरी शब्द पुन्हा कानावर येतील, शिवाय ऊर भरून पुकारा फार वेळ करण्याचे श्रमही पाचपटीने कमी होतील. इ. हेतूंनी आम्ही खूपच मजा केली होती. यावेळी सोबत दादा, प्रभा वगैरे आमच्यापेक्षा लहान मंडळी होती. त्यांचा धाक नसला तरी थोडी शरम

होतीच. तेव्हा अशा धन्य ठिकाणी जाऊन या पोरांच्या शरमेने नुसतेच साधु-संतांना हाका मारण्याचा वेचवपणा करावा लागला असता. इतक्यात दिवस तांबुसला. निदान गार्डन तरी पदरी पाडावा म्हणून तिकडे गाडी दवडवली. पुन्हा मी माधवरावांना नम्रपणे विचारले, " संपादकसाहेब, तुम्ही मिरज-सांगलीचा बाग पाहिला असेलच. तेव्हा शपथेवर सांगतो की त्यापलीकडे या बागेत पाहण्यासारखे खरोखरच काही नाही. नुसती झाडे आहेत. काही फळांनी भरलेली. काही फुलांनी. फार तर काही वेली असतील. काय बघायचं आहे त्यांना ? "

बगिच्यात नुसतीच फुलझाडे व फळझाडे आहेत; हे ऐकून पाहुण्यांचीही निराशा झाली. फुले आहेत हे ऐकल्यावर प्रभा जराशी भाळली. पण तिचे बिलकुल ऐकायचे नाही हे मी ठरवले होते. ( तिच्या ताब्यात आता जेवणाचा केवळ रिकामा डबा होता. ) नागपुरे म्हणाले, " बगिचा नाही बघायचा तर निदान वैराटला तरी जाऊ. तेथला सूर्यास्त फार छान असतो. "

काय माणसे असतात एकेक. आता सूर्यास्त काय गावोगावचे अलग असतात ? हे तर निव्वळ सरदारजीसारखे झाले. आमच्या गावचा सूर्य तुमच्या गावाहून वेगळा ? तुमच्याकडे ऑगस्ट महिना तर आमच्या गावात जून ! आमच्या रेडिओवर सुंदर गाणी; तुमच्या रेडिओवर वाईट ! वंदे मातरम् या गीताचा कर्ताही वेडा. नागपुरे जरा देशभक्ती वगैरेतले आहेत. बंकिमबाबूंचे 'शुभ्र जोत्स्ना पुलकित यामिनीम्' त्यांना पटणारच. म्हणजे आमच्या देशातल्या रात्री पुलकित; का तर 'शुभ्र जोत्स्ना' म्हणून. आणि जपानच्या आभाळात काय हिरव्या चांदण्या लागतात. या देशभक्त कवींचे काहीतरीच खूळ ! सारांश असा की वैराटची संध्याकाळ म्हणजे काही मुद्दाम पाहण्यासारखी वस्तू नव्हे. परवा मी मुद्दाम पाहली होती. सूर्याचा तांबडा गोळा जरा जास्त उंचावरून पडल्यासारखा बराच वेळ खाली जात राहतो ते पाहून मनाला बरे वाटले होते. पण त्यावेळी व नंतर घटांगच्या डाक बंगल्यावर येऊन झोपण्यापलीकडे कार्यक्रम नव्हता. शिवाय विजूने खानसाम्याला स्पेशल मुर्गीची ऑर्डर दिली होती. आज ते वैराट सुंदर वाटण्याचे तसे एकही कारण नव्हते. तेव्हा तो प्रश्न आपोआपच निकालात निघाला. बागेच्या फाटकातून दिसणाऱ्या रंगीबेरंगी फुलझाडांकडे तुच्छतेने पाहात मी दादाला परत फिरायला सांगितले.

दादाला या स्थळाचे काहीही नवीन नव्हते, म्हणून व एखादी उत्सुकता बोलून दाखवण्याचा त्याचा स्वभावही नव्हता, म्हणून त्याने गाडी परतीसाठी वळवली. मिशनऱ्यांचे बंगले वगैरे पाहण्याची उत्सुकता त्याला आहे का म्हणून विचारले. त्याने उत्तर दिले नाही. तो दिवसभरातून बोलत असलेल्या पाच सहा शब्दांवर एखादी उत्सुकता वगैरे बोलून दाखविण्याची मोठी जबाबदारी टाकणे त्याला पसंत नव्हते. गाडी चालवताना तर तो फक्त गाडीच चालवी. सिझन्ड ड्रायव्हर! अर्थात त्याच्या या कमी बोलण्याच्या सद्‌गुणामुळेच आम्ही तो दीड हजार मैलांचा प्रवास व्यवस्थित करू शकलो, दादाने पाच दहा मिनिटांतच गाडी निघाल्या ठिकाणी आणून उभी केली.

मामा हॉलीडे कॅम्पात हिरवळीवर बसून त्या ऑफिसरशी जागतिक राजकारणावर गहन गप्पा करीत होते. आजूबाजूची इंद्रधनुष्यी फुलावळ पाहून प्रभाला पुन्हा उद्योग मिळाला. त्यावेळी त्या चर्चाकरूंचे क्रुश्चेव, केनेडी वगैरेवर लागलेले लक्ष तेथेच ठेवून त्यांच्या नकळत फुले तोडणे फारच सोपे होते.

मामासाहेबांचे आमच्याकडे लक्ष गेले.

" काय आलात पाहून सर्व ? काय काय पाहिले "

दुसरे कोणी विशेषतः प्रभा काही बोलण्याआधी मीच पुढे झालो,

" किल्ल्याला जाऊन आलो. तसेच गार्डन, तळे यांनाही गेलो होतो. "

इतर चेहरे पाहून मामांना शंका आली, " तू चूप बैस. तुम्ही सांगा मंडळी, काय काय पाहिले ? "

" हे म्हणतात ते खरे आहे. तितक्या ठिकाणी जाऊन आलो. "

" पहा मामासाहेब ! मीच खरा की नाही ? "

" ते नंतर ठरेल. मराठी मलाही कळते. जाऊन आलात म्हणजे काही पाहून येणे नव्हे. चल सांग, काय काय पाहिले ? "

सर्व चूप. अर्थात थोडा वेळ. मग सारा पत्ता त्यांना लागला. माझ्यावर जबाबदारी टाकण्यात केवढी चूक झाली त्याची त्यांना खात्री आली. शेवटी त्यांनी गाडी पुन्हा स्टार्ट करायला आज्ञागर्जन केले. त्या प्रवासात मात्र पाहुण्यांना थोडीफार उत्सुकता दाखवून बोलणे शक्य झाले. मंकी पॉईन्टबद्दल त्यांनी ऐकले होते. तो पाहू म्हणाले. मी नवलात पडलो, " येतानाच नाही का लागला तो ? अहो तो–जेथे वारा जरा जास्त फिरत होता. "

पाहुण्यांना ते पटणे भाग होते. त्याला मंकी पॉईन्ट का म्हणतात तेही त्यांना मग मी समजावून दिले. कोण्यातरी कवि हृदयाच्या ब्रिटिशाला तेथला वारा माकडासारखा वाटला होता. इंग्रजच ते; त्यांना काय वाटेल ते वाटेल ! त्यांच्या कवितेत माकडे चालतात. त्यांच्या देवता चक्क गाढवावर बसून मिरवतात. आमच्या मर्ढेकरांना मात्र साध्या उंदिराबद्दल ( व तेही पिपात मेलेल्या ) किती शिव्या बसल्या ! मामासाहेबांनी गाडी मंकी पॉइंटवर घेतली. मला या पॉईन्टपेक्षा राजमाची पॉइंट फार आवडतो. खंडाळयाला गेलो म्हणजे मी तेथे गेल्यावाचून राहात नाही. कारण तेथे कॉफी फारच छान मिळते.

आता रात्रीची कोवळी पावले पडू लागली होती. कोवळी काय अन् प्रौढ काय रात्र ती रात्रच ! एखादी बाई डोमडी न म्हणता सावळी म्हणावी इतकेच. तेव्हा बगिचा पुन्हा पाहण्याचा या फेरीतही प्रश्न उद्‌भवला नाही. मामासाहेबांनी यावेळी मला धारेवर धरले नाही. मंकी पॉइंटच्या नावामागचा मी सांगितलेला इतिहास खरा असल्यामुळे, त्यांनी माझे जरासे कौतुकही केले व पाहुण्यांसमोर माझी इज्जत वाढवली.

परत वळता वळता त्यांनी तिथल्या डाक बंगल्यात आम्हांला नेले. मोठ्या माणसांना देखील कधीतरी तारुण्य वगैरे असतेच. मामासाहेबांनाही ते होतेच. या सुंदर व सुखासीन बंगल्यात ते आपल्या ऐन उमेदीच्या काळात मुक्कामाला आले होते. त्याची आठवण त्यांनी आम्हांला खूप चवीने सांगितली. त्या मुक्कामात त्यांनी या स्वर्गतुल्य रंगीत वातावरणात एका बड्या माणसाशी भांडण केले होते. तो माणूस तेव्हापासून त्यांच्याशी धडकी भरल्यासारखे वागत होता. तारुण्य, बंगला, निसर्ग वगैरेंनी पूर्ण भरलेल्या आठवणीचा शेवट जरी राजकीय भांडणाचा असला तरी मला रसभंग वाटला नाही. उमेदीच्या दिवसांत व अशा वातावरणात शृंगार रसच पोसतो असे थोडेच आहे ? त्या वयात वीररसालाही प्राधान्य असतेच की नाही ? प्रेयसीशी हितगुज झालेली जागा दाखवावी तेवढ्या उत्साहाने ते आम्हांला राजकीय तणातणीची जागा दाखवीत होते.

मग आम्ही गावाकडे म्हणजे लोअर प्लॅटोकडे परत आलो. ब्रिटिशांच्या काळात गार्डन, डाक बंगला वगैरे हायर प्लॅटोच्या ठिकाणाकडे काळ्या लोकांना येण्याची मनाई, होती म्हणतात. तो काळ मामासाहेबांनी पाहलेला होता. पंधरा

ऑगस्टच्या एका रात्रीने असे कित्येक हायर प्लॅटो मुक्त झाले होते ! अर्थात मुंबईचे एक पोहण-तळे सोडून !

निसर्ग खूप पाहला म्हणजे माणूस भारावतो. भारावल्यामुळे अवाक् होतो. चिखलदरा न पाहण्याचाही तोच परिणाम मंडळीवर झाला होता. निसर्गाबरोबरच माणसे दाखवण्याचेही आजच्या कार्यक्रमात ठरले होते. म्हणून गाव सोडण्याआधी गाडी सर्वोदयी कार्यकर्ते बाबासाहेब वानखडे यांच्या बंगल्याकडे वळली. ते आमच्या गावाकडचे. माझे जवळचे नातलग. जगाचा खूप अनुभव घेऊन येथे येऊन स्थिर झाले. सरकारने ज्या स्कीम्ससाठी त्यांना येथे पाठवले त्या सर्व आता बंद झाल्या होत्या. पण इथल्या वनजनांनी त्यांना रोखून धरले. ते सध्या काही गिरिजनांसोबत बोलत बसले होते. त्यांना घेऊन नागपूरला मंत्र्यांकडे काही मागण्या करायला जाणार होते. त्या सर्व तक्रारी, त्यांनी आमच्या संपादक पाहुण्यांसमोरही मांडल्या. या उपेक्षित भागाच्या गरीब रान-लोकांना आपले वृत्तपत्र योग्य साहाय्य करील असे त्यांना आश्वासन मिळाले. त्या मंडळींचे चेहरे तेवढ्याने उजळले. बाबासाहेबांनी डॉ. पंजाबरावांच्या मागे लागून लागून इथल्या पहाडात भटकणाऱ्या पोरांसाठी एक शाळा उघडायला लावली होती. ती तोट्या-अडचणीत कशीबशी चालू होती. त्या हायस्कूलच्या पोरांची मजा होती.

हिल स्टेशन नसलेल्या जगाला मिळणारी उन्हाळ्याची सुट्टी त्यांनाही मिळत होती. शिवाय पावसाळ्यात निसर्ग त्यांना शाळेत जाणे अशक्य करून सोडत होताच. शाळा बुडवणाऱ्या पोराला या दोन आजीबाई कुरवाळत होत्या. पावसाळा व उन्हाळा ही प्रेमळ मंडळी या डिसेंबरात गैरहजर असल्यामुळे त्या बिचाऱ्या पोरांची थोडीफार गैरसोय होणे शक्य होते. पण महिनाभर चालणारी बहिरमची यात्रा त्यांना लाडवत होती. ही सुटी तशी काही मोठी नव्हे, पण आपली मायपेक्षा मावशी इतकी ! बाबासाहेब मात्र उन्हाळ्याची सुटी या पोरांना देऊ नका, त्याऐवजी ती पावसाळ्याची द्या असे बोर्डाला सांगणार आहेत. बिचाऱ्या पोरांचे सुख त्यांना पाहावत नाही हेच खरे. बाकी सध्याच्या स्थितीत आपणही येथले विद्यार्थी व्हावे असा मोह मला झाला. चहा संपवून आम्ही बाबासाहेबांचा निरोप घेतला. मामासाहेबांचा उन्हाळी मुक्कामाचा एक तंबू त्या बंगल्यात पडून असलेला आम्हांला दिसला. त्याचाही हेवा वाटला.

आता मात्र दादाने गाडी भरधाव सोडली. खूप दूर शिरजगाव बंड या ठिकाणी जाऊन झोपायचे होते. झोपायची खरी इच्छा तर शिरजगाव कसबा येथेच झाली होती. आता कसबा नाही तर निदान बंड तरी गाठणे भाग होते. माधवराव जरा जरा पेंगत होते. कदाचित चिंतन करीत असावे. मघा आम्ही सर्वांनी मिळून त्यांना कॉफीचे झाड दाखवले होते. मोटारचा वेग व इतर हजार झाडांमधले कोणते तरी एक असे ते कॉफीचे झाड यातून त्यांना नेमके काय दिसले ते देवच जाणे. त्या झाडाला दहाबारा तऱ्हेची पाने उगवत असावी, असाही त्यांनी अंदाज करणे अगदीच अशक्य नाही. तेव्हा त्या चिंतनात झोपेइतकेच महत्त्वाचे ते झाडही असेलच. आम्ही सर्वच झोपलो तर गाडी चालवणारा दादाही तेच करील ही शक्यता होती. झोपेत गाडी चालवणे मामासाहेबांना आवडत नाही. दादाला जागे ठेवण्यासाठी काय करावे याची त्यांना पंचाईत पडली. रस्त्यावरची नवले काळोखात डुबली होती. सशांच्या डोळ्यातले हिरे पाहण्याचाही लवकरच कंटाळा आला. शेवटी बैलांच्या डोळ्यांत मोटारीचा उजेड पडल्यानंतर होणारे दीपत्कारही फिक्के झाले. एकच उपाय उरला होता— त्यांनी प्रभाला गाणे म्हणायला सांगितले.

" कोणते म्हणू ? "

" छान छान असे असेल ते म्हण. "

माझ्या या उपाज्ञेवर ती पोर उसळून म्हणाली, " सारी गाणी छान छानच असतात. कोणते म्हणू असा प्रश्न होता. " मी चूप. गडकरी थोडेसे जागे झाले, " भावगीत म्हण. हिंदीही चालेल. "

" मग असं करते; तांब्यांचं म्हणते. " प्रभाला B. A. साठी तांबे नेमलेले असूनही त्यांच्याबद्दल तिचा आदर कायम होता ! आता M. A. ला तिला नेमलेल्या महदाईसेच्या धवळ्यातले तिने एखादे म्हणावे असे मी तिला गुंडम् राऊळच्या भूमिकेतून सांगणार होतो. पण वाग्युद्ध टाळण्याकडे माझा नेहमीच कल असतो. स्वतःच्या कविता ती नेहमीच गद्य पद्धतीने म्हणत असल्यामुळे तांबे सध्या वाईट नव्हते.

प्रभाने भावगीते म्हटली. आपल्या आवाजाने गाडीच्या घरघरीवर अन्याय होऊ नये इतकी खबरदारी तिने घेतली. नंतरच्या गीतांमध्ये मात्र तिचा गळा लागला. आवाजही स्पष्ट झाला. आणि परतवाडाही आले. खूप थकल्यानंतर या

गावातल्या कोठल्याही दुकानचे पानविडे चांगले वाटतात, ही भौगोलिक माहिती मी पाव्हण्यांना दिली.

पेट्रोल भरून घेऊन व मामासाहेबांच्या एकादोघा सुहृदांकडून पाव्हणे परत-येऊन आम्ही प्रवास दुप्पट जोमाने सुरू केला. पूल असलेल्या, पूल नसलेल्या अनेक छोट्यामोठ्या नद्या ओलांडत, कधी सडक असलेला तर कधी नसलेला रस्ता पार करीत आम्ही एका पटांगणात शिरलो. समोर एक लांब इमारत उभी होती. वेगळ्या ठिकाणची; पण चेहरा नेहमीचाच ! ती शिवाजी संस्थेची शाळा होती. हेडमास्तरांनी शय्या जय्यत तयार ठेवली होती. प्रभाचे हे गाव. आईकडे जाण्यासाठी तिने आमचा निरोप घेतला. आम्हीही हातपाय धुऊन जेवण केले. थकल्या देहाने थोड्याशा गप्पा करून अंथरुणावर पडलो.

झोपेने भारावलेल्या मला एक वाक्य ऐकून मोठाच दिलासा येत होता. प्रभा जाताना म्हणाली होती, " उद्या आई सर्वांना भरपूर चकल्या देईल. अगदी गरमागरम आणि पोटभर. " रात्र खरेच छान होती !

# तिसरा दिवस

मुक्तागिरी चढण्याचा थकवा पाय सांगू लागले. मुख्याध्यापकांच्या घरी मुख-मार्जन, चहा वगैरे आटोपला तोच प्रभाकडचे बोलावणे आले. तिचे खूप पिढ्या नांदलेले घर पाहून पाहुण्यांना विदर्भातले एक खरे वऱ्हाडी घर पाहण्याचे समाधान मिळाले. एकाच घरात इतकी नांदणूक झाली म्हणजे त्या वास्तूला दगडविटांच्या रचनेपेक्षा किती वेगळा अर्थ येतो त्याची मलाही पहिल्यांदाच जाणीव झाली. व त्या माणसांइतकी म्हातारी माणसे घर सोडायला व सुंदर बंगल्यात जायला तयार नसतात हे मी तोवर कथावाङ्मयात वाचले होते, त्याचा खरा अर्थ आज कळला. त्या वास्तूच्या कोपऱ्या–कोपऱ्यात आपल्याला जग दाखवणाऱ्या लोकांची उतरंडच्या उतरंड स्मृतीस्मृतींनी पक्की बसलेली असते. आपले वडील, वडलांचे वडील, त्यांचे...' मी एका कोरीव जुन्या खांबाकडे पाहात होतो. तिच्या कोणातरी पूर्वजाने नव्या उत्साहाने तो बसवला असेल. त्याला त्याचे, त्याच्या मुलाचे व प्रभाच्या वडलांपर्यंत सर्वांचे हात लागले असतील. विश्रांतीसाठी, सहज गप्पां-सांठी पाठी टेकल्या असतील. पण अशा आठवणी काढून त्या सुरकत्या पडलेल्या

वास्तूकडे पाहणे हा वेडेपणाच ना ? मग गांधीजींचा चष्मा लोकांनी का जपावा ? सहचारी भावाचे केवढे भक्कम प्राबल्य आम्हा मूर्तिपूजक हिंदूंवर आहे ! आणि मूर्तिपूजक नसलेल्यांवर तो पगडा नाही का ? हे घर जपण्याची प्रभाच्या वडलांची श्रद्धा व आम्ही आता जाणार त्या रिद्धपूरच्या महंत-भक्त यांची संबंधी पाषाण जपणारी श्रद्धा यात काही फरक आहे का ? काळ बदलतो; माणसे बदलतात. प्रभाचे वडीलही आधुनिक जगाला पारखे नाहीत. उलट या गावाच्या एक पाऊल पुढेच आहेत. स्वतःचे डोके वाटेल तेथे चालवतात. घरच्या घरी त्यांनी यंत्रांशी खेळ केले. गॅसची चूल बनवली. गॅसही शेणातून काढतात. ते असे या काळातले म्हणून वास्तूतही काही आधुनिकता आली. तरीही जुन्या जागा, जुने लाकडी, विटेरी आधार कायम आहेत. थकलेल्या वडलांच्या आशीर्वादासारखे. चक्रधर या गोष्ट्यावरून गेले होते या नुसत्या कल्पनेने त्या मामुली वस्तूस देवपणा येतो. चक्रधर संबंधाचा म्हणून तो 'संबंधी पाषाण' देव्हाऱ्यातली मूर्ती होतो. जे या देशातल्या तीर्थक्षेत्रात तेच अजूनही अशा काही घरांत चालते. अशाच काही ठिकाणी प्रदेशाचे प्रदेशपण व घरांचे घरपण कायम राहील. बाकी मग आहेतच मास्टरप्लॅनमधले रस्ते व सुबक आधुनिक घरे ! त्यातून हिंदुस्थान नावाचे इंग्लंड घडणार आहे. यातून मात्र हिंदुस्थान नावाचेच हिंदुस्थान थोडा वेळ आणखी जगण्याचा प्रयत्न करणार आहे. हे घर पाहून मलाही माझे खेड्यातले घर आठवले. घरच का ? घरातले सारे जीवन---दादाजी, काकाजी, दादीमायसारे आठवले. ही सर्व मंडळी एक दिवस होती. अगदी या सर्व मंडळीइतकी जिवंत, तितकीच समोर बसलेली, बोलणारी, हासणारी.

मला सोमवार असल्याचा मी बहाणा केला. खूप भारावलो होतो. काही खाववेचना. प्रभा म्हणाली, "वस्तू केल्या गडकरींसाठी; पण जास्त प्रमाणात केल्या तुमच्यासाठी." तिने या वाक्याने माझे आतले वातावरणच बदलून टाकले. खाद्यपदार्थांकडचा आदर व त्याबद्दलचा माझा आवाका हा सर्वांच्याच परिचयाचा विषय. मीही मग गरम चकल्या मनसोक्त खाऊ लागलो. प्रभा तेथेच राहली. आम्ही पुढे गेलो. गाडीमधला एक सदस्य कमी झाला तेव्हा कुठे गाडी म्हणजे काय ते कळले. केवळ दोन दिवस या नव्या प्रवासात आम्ही एका घरात जन्माला आल्यासारखे झालो होतो. अमरावतीत आपापली वेगळी जीवने जगताना कधीमधीच भेटणारे आम्ही ! आणि माधवराव तर उघड-

उघड मुंबईचेच. परवापर्यंत एकमेकांचे तोंडही न पाहलेले. नावे फार तर ऐकली असतील; पण ही दोन छापील नावे सदेह सोबतीने प्रवास करतील असे कधीच वाटले नव्हते. मामासाहेब व गडकरी यांची तर आम्हा दोघांपेक्षाही सोबती-बद्दल कमी शक्यता होती. पण नवल हे घडले की छापील जगाशी व मुंबईच्या लेखकांशी सुतराम संबंध नसलेल्या या शिवाजी संस्थेच्या मामांनीच दोन गावांच्या दोघा वाङ्मयोपासकांना जवळ आणले होते. प्रभा, नागपुरे त्यातच सामील झाले होते. ही आठवण अधिक घट्ट व्हावी म्हणून डॉ. पंजाबरावांवर एक अभि-नंदन ग्रंथ काढण्याची कल्पना त्यांच्या मनात आल्यामुळे आम्ही चारही लोक आता एका ग्रंथात ओवले गेलो होतो. प्रभा, गडकरी व मी यांनी महाराष्ट्र टाइम्समध्ये अथवा सत्यकथेत एकत्र येणे वेगळे व या भागाच्या महान माणसा-वरच्या पुस्तकात येणे वेगळे! त्या एकत्र येण्याने एका ध्येयवेड्याची अल्पशी सेवा साधली जात होती. घड्याळ टिकटिक करीत असताना त्याचे अस्तित्व जाणवत नाही; ते बंद पडले तर मात्र आपले दचकून लक्ष जाते असे मानसशास्त्राचे एक विद्यार्थी मला नेहमी म्हणायचे. प्रभाबद्दल तेच झाले.

पण या प्रवासात एक अजब ताकद होती. गाडी व तिच्यातले हे अमृत-योगाने घडलेले कुटुंब ही मधूनच कधी तरी जाणवणारी गोष्ट होती. खरे जाणवत होते या प्रदेशाला—माझ्या नेहमीच्या जगाला हे नव्या डोळ्यांनी भेटणे. म्हणूनच मधून मधून आमच्यातून गळलेले व नव्याने त्यात शिरलेले असे दोन्ही तऱ्हेचे लोक आम्हांला जाण्याशिरण्यापुरतेच जाणवले. या प्रवासापुरते तरी हे खरे होते की, आम्ही सर्व लाकडांची ओंडकी या प्रवाहात यदृच्छेने जवळ जवळ आलो व कधी तरी एकमेकांना सोडत गेलो. त्या सर्वांत एकमेव खरे होते या विदर्भाचे दर्शन. वेगळे – पूर्वी न घेतलेले.

शिरजगावाहून हाका मारल्या तर चांदूरच्या माणसाने ' ओ ' द्यावा अशी दोन्ही गावे. त्यांना दोन का म्हणावे हाच प्रश्न. चांदूर म्हणजे घाटावरच्या रवेदार गुळाची जंगी पेठ. तेवढे सोडले तर मात्र ते आपले गावासारखे गाव पण तेथेही दोन हायस्कुले. शिरजगावाला इकडचे सर्वांत जुने हायस्कूल. चांदू-रला शिवाजीची शाळा नाही याची आमच्या प्रवासाची गती वाढायला फार मोठी मदत झाली. आज प्रवास कालपेक्षाही मोठा असल्यामुळे, चांदूरला शाळा काढण्याची बुद्धी शिवाजी संस्थेला न दिल्याबद्दल मी त्या विघ्नहर्त्या व त्याच

वेळी बुद्धिदात्या गणपतीचे, त्याच्या पत्नीचे व बाप, आई सर्वच कैलास-वासीयांचे मनोमन अभार मानले. आम्ही चांदूरला मुळीच न थांबता रिद्धपूरला जायला आता काहीही हरकत नव्हती.

पण थांबण्याचा आग्रह व अडथळा केवळ शाळाच करीत नव्हत्या. आमचा कॅमेराही त्याच जातीतला दिसला. बेटा शिरजगावपर्यंत फारच बरा वागला होता. नंतर काय तब्येत बिघडली कोणास ठाऊक; पण काही केल्या सुरळीत वागेना. त्याची माझी नवीन ओळख म्हणून त्याच्या साऱ्या अंगांची माहिती मी मुद्दाम एका स्टुडिओवाल्याकडून करून घेतली होती. ती विसरल्याचा संशय आला म्हणून मुद्दाम बाबासाहेब सबनीसांकडे जाऊन उजळणी केली होती. शिवाय सिन्हांच्या मुन्ही कॅमेऱ्याच्याही आसपास आपण वावरतो याचाही अहंकार कायम ठेवला होता. आजवर काढलेले फोटो त्यांच्या धुलाई छपाईसह माझ्या प्रगतीचे पुरावे देत होते. पण हे सर्व त्या बिचाऱ्या कॅमेऱ्यास कधीच पटले नाही. त्याच्याइतके हट्टीपणाने माझ्याशी या प्रवासात कोणीही वागले नाही. अकरा वर्षे नुसतेच पडून राहल्यामुळे, एकटेपणाची विकृती त्याच्या काही अंगांमध्ये आली होती. बटन काही केल्या दबेना. तेव्हा उपाय थकून चांदुरात पाच मिनिटे थांबणे भाग पडले. डॉ. गंगाधर यांच्या कॅमेराविषयक ज्ञानावर आमचा विश्वास होता; पण ते आम्हांला लवकर सोडतील यावर मात्र नव्हता. तेव्हा कॅमेरा त्यांनी दुरुस्त करीपर्यंत आमच्या प्रवासाची त्यांना कल्पना द्याय-चीच नाही असे ठरले. त्यांनी तो केवळ एका मिनिटात दुरुस्त केला. कॅमे-ऱ्याने त्यांच्याशी थट्टा करायची नाही असेही कदाचित मनात आणले असेल. मग डॉक्टरांकडे उरलेल्या वेळात चहा घेणे भाग पडले. 'मी कॅमेरा दुरुस्त करायला उशीर लावला असता तर तेवढ्या वेळात तुम्ही चहा घेतलाच असता की नाही?' यावर काय उत्तर? फक्त चहा घेणे!

मोडलेला वेळ आमचा दादा रस्त्याने भरून काढत असे. रिद्धपूरला अगदी कोवळ्या उन्हातच त्याने पोचवले.

पांढऱ्या शुभ्र देवळावर ऊबदार सकाळ खेळत होती. देवळात मासानाम् मार्गशीर्ष असा विदर्भाचा लाडका जावई कृष्ण महंताची पूजा घेत होता व बाहेर मार्गशीर्ष महिन्याचे गोड नाते लेकुरवाळ्या धरतीला सांगत ऊन्ह पांघर-लेला वारा हिंडत होता.

कोणत्याही खेड्यात इकडे चालतात तसे नित्याचे व्यवहार रिद्धपूरला चालले होते. बाया पाण्याचे भरले घडे घेऊन येत-जात होत्या. माणसे शेतावर जाण्याची तयारी करीत होती. कौलारू घरांतून न्याहारी बोलत धूर उंचावत होता. माथनीतून दह्याचे चुरूकमुरूक ऐकू येत होते. सारे नेहमीचे. कोठेही आढळणारे. लेकरे रस्त्यातल्या धुळीत मस्त खेळत होती. आमची मोटार पाहून ती आमच्याकडे धावली. आम्ही येणारची त्या गाववाल्यांना कल्पना होती. महानुभाव मासिकाच्या निंभोरकरांनी महंतांना मुद्दाम पत्र पाठवले होते. लेकरांना पत्र जाण्याची गरजच नव्हती. बाप्यांनी महंतांकडून व पोरांनी वरच्या थोरांकडून ती बातमी पकडली होती. व आता तर प्रत्यक्ष आम्हांलाच त्यांनी पाहिले होते ! ' आले ! आले ! ' असा गिल्ला करीत पोरे धावली. आणि त्यांच्या आनंदात मी कुठल्या कुठे हरवलो—

" आले ! आले ! " बाराव्या शतकातून याच गावात आवाज घुमत होता. गुंडम् राऊळांची गावफेरी आली होती. तो महान अवतार काटसुऱ्याहून एक दिवस या गावात आला. मांगाने ब्राह्मण असल्याची बतावणी केल्यास चुन्याच्या आळ्यात बसवून वर पाणी सोडून जीवंत पोळण्याची शिक्षा जेव्हा देत, त्या सोवळ्या काळात हा वेडा अवतार सरळ अस्पृश्यांच्या घरी जाई. ' तेल्याची भाकरी का खाता ? ' असे कोणी विचारले तर भगवद्गीता त्याच्या जिभेतून विनोद करी, " अरे ही तर लाखाची भाकरी आहे, ही तर ज्वारीची भाकरी आहे. तेल्याची कशी ? " त्या माणसाने सारा जन्म या गावात घालवला. जरा कुठे काही दिवस पाच दहा कोस फिरून आला होता म्हणतात. तेवढे सोडले तर मात्र कधीच कोठेच गेला नाही. देशभर पाठवले चक्रधरांना. पण गुंडम् राऊळ मात्र येथेच. या गावाचा अणूरेणू त्याच्या आठवणींनी, त्याच्या पदस्पर्शाने भरला आहे. मराठीचे पहिले गद्य वाङ्मय येथे त्याच्या डोळ्यांखाली लिहिले गेले. आद्य कवयित्री महदंबा ! एक भोळीभाबडी बाई. त्या सामान्य बाईला त्याने एक दिवस सांगितले, " महदाइसे, श्रीकृष्ण प्रभूचा लग्नोत्सव करतोय. तू करवली हो. आणि रच बरं काही धवळी. " मग त्या सामान्य बाईची सरस्वती झाली. ' या कुंदेंदुतुषारहारधवला ' सरस्वतीने तिच्या तोंडातून लग्नाची सुंदर धवलगीते म्हटली. याच गावाने ती पहिल्यांदा ऐकली. तो गोविंद प्रभू याच गावात स्त्रीवेषाने वावरला. मधुरा भक्तीची उपासना करणाऱ्या

माधानच्या बालंध गुलाबराव महाराजांसाठी—या विसाव्या शतकामधल्या आश्चर्यासाठी स्त्रीवेषाची भूमिका त्याच राऊळाने तयार करून ठेवली. कोणी माणूस आपल्या बायकोला माहेर नाही म्हणून हिणावतो. दिवाळीचा जावईमान मिळत नाही म्हणून चिडतो असे त्या राऊळाने ऐकले व तो तिचा मायबाप झाला. तिच्या नवऱ्याचे त्याने जावयासारखे सन्मान केले. तो परेशात लीन झाला तेव्हा या गावात लोक रडले. ते अश्रू येथेच पडले. आणि माझी माय मेली म्हणून ती पोरगी आपल्या नवऱ्यासह धावत आली. तिने आपला हंबरडाही याच गावात फोडला.

त्या सर्वांची आठवण जपणारे ते शुभ्र देऊळ मी पाहात होतो. त्याच आवाराचे एक अंग सध्या मशीद झाले आहे. कोणा बादशहाला येथे साक्षात्कार झाला आणि त्याने येथे मशीद बांधली. महानुभाव व मुसलमान यांचे सख्य इतिहासात भिन्न भिन्न डोळ्यांनी पाहले गेले. ती मशीद व ते देऊळ कॅमेऱ्यात एकत्र आणण्यासाठी मी शेजारच्या टेकाडावर चढलो.

विदर्भातली पांढरी देवळे पाहून माधवरावांना मोठे नवल वाटत होते. येथली मशीद व देऊळ ही दोन्ही पाहून सर्व देवळांनी हा रंग मशिदीपासून घेतला की काय अशी त्यांना शंका आली. कोणी सांगावे ! पण विदर्भाचा रंगच पांढरा आहे. सेवाग्रामची जगभर गाजलेली व दिल्लीत ‘ हे राम ’ म्हणत राम झालेली खादी पांढरीच. येथे ढिगाढिगांनी हासणारा श्रीमंत कापूस पांढरा व या देवळांसारखीच शांततेची द्योतक कबुतरे – तीही पांढरी ! घनदाट काळ्या मातीची एकमेव प्रतिक्रिया असा हा हिमगौर रंग.

येथे देऊळ, हस्तलिखित संग्रह व मुद्रित वाङ्मयाचे वाचनालय इ. पाहणे लवकरच संपले. एका उपासकाच्या कचाट्यात सापडून उशीर झाला असता. माधवरावांनी त्याला काही तरी जुनी माहिती विचारण्याची चूक केली व मग त्याने त्यांना ताब्यात घेऊन गीतेचे श्लोक, त्यांचे अर्थ इ. चा त्यांच्यावर अभिषेक सुरू केला. महंतांकडून तेवढ्यात चहाचा निरोप आल्यामुळे सारे थोडक्यात निभावले. एक गंभीर उशीर टळला. चहाचे पुष्कळ फायदे जाहिरातीत वाचले होते. हा एक भरीला.

आता जायचे होते नेरपिंगळाईला. म्हणजे पुन्हा शाळा ! शिक्षणाचे ते वातावरण सुरू होण्यापूर्वी पुन्हा एकदा सकाळपासून पाहलेल्या प्रदेशांच्या माहा-

त्याची उजळणी झाली. शिरजगावला पाहुण्यांना एक गोष्ट दाखवायची राहून गेली होती. वऱ्हाडच्या ग्रामीण जीवनावरची पहिली कादंबरी तेथल्या एका घरात लिहिली गेली होती. दांडेकर त्यासाठी मुद्दाम तेथे आले होते. त्या ' पूर्णामायची लेकरं 'चे पहिले वाचन तेथे शाळेत झाले होते. विदर्भाच्या जावयाचे कौतुक रिद्धपूरला झाले. रोज देवळात पूजेअर्चेने होतच आहे. लेकीचे कौतुक कौंडण्यपूरला, तिथे आम्ही उद्या जाणारच होतो. आणि लेकरांचे कौतुक — सावकाराला दंडा दाखवणाऱ्या गाडगेबाबांच्यावरून निवडलेल्या दांडेकरांच्या मानसपुत्राचे कौतुक शिरजगावला झाले होते. पवित्रतेने ओथंबलेले या देशाचे पहिले प्रेमपत्र कौंडण्यपूरला लिहिले गेले. मराठीचे पहिले वाङ्मय रिद्धपूरला आणि रूढीला झुगारून पाशमुक्त होणाऱ्या क्रांतिकारक गाडगेबाबांचे ललित दर्शन शिरजगावला. पूर्णा व वर्धा यांच्या मिठीत रमलेल्या या भूभागात आणखीही कितीतरी झाले. इंग्रजांच्या अचाट शक्तीला नमवणारा सेवाग्रामचा महर्षी, भूदान मागणारा बटू वामन विनोबा, मधुरा भक्तीचा उपासक गुलाबराव महाराज — अंतच नाही. आणि परवा देशासाठी गोळ्या खाणारे आष्टी, यावलीचे शहीद! पण पाहुण्यांना हे सर्व एका दमात दाखवणे शक्य नव्हते. गाडी भरधाव चालली होती. लेहेगावहून नेरला गेली. लेहेगावकरांनी परिश्रमाने बांधलेल्या व स्वातंत्र्योत्तर काळाचा गौरव ठरलेल्या सडकेवरूनच आम्ही आतापर्यंतचा प्रवास केला.

नेरला पुन्हा दृश्य पालट. ती शाळा, हारतुरे, सभा, फराळ आणि डॉ. पंजाबरावांनी औतांहून अंबारीत पोचवलेले सुशिक्षित जग. मुख्याध्यापकांनी शाळेची प्रगती सांगितली. अमरावती फक्त नकाशातच पाहलेली मुले व मुली त्यांनी कालपरवा क्रीडास्पर्धेत तेथे नेल्या होत्या. पोरांनी अमरावतीतून जत्रेतल्या सारख्या आठवणी आणल्या होत्या. सिनेमा, भव्य इमारती आणि सोबतच त्या स्पर्धेतली क्रीडेपासून नृत्यगायनापर्यंतची पहिली बक्षिसेही! या शाळेच्या प्रगतीची तुलना फक्त मोर्शीच्याच शाळेशी होऊ शकत होती. हेडमास्तर श्री. मोहोड मोर्शीलाच श्री. कानफाडे यांच्या सोबत होते. छोटे भाई, बडे भाईसे सवाई! श्री. मोहोड स्वतः अबोल. त्या अबोलपणातच त्यांनी चूपचाप M. A. पर्यंतचा अभ्यास उरकला. B. T. ही झाले. अनेकांना व्हायला लावले. अबोल खरे. पण आम्हा सर्वांनाच त्यांनी बोलके केले. शाळा दाखवता दाखवता पोरेही

दाखवली – शाळेच्या मागच्या आंगणात रांगेने बसलेली. त्या पोरांना त्यांनी थोडक्यात सांगितले, " पाहुणे तुमच्याशी दोन शब्द बोलणार आहेत. " पाहुणे बरेच विस्मयले, " अहो तुम्ही मला हे मंत्र्यांसारखे काय वागवीत आहात? हे हारतुरे, हे स्वागत कशाला? " मग एकदम त्यांचे या प्रदेशाशी नाते स्थापले गेले. आपुलकीने ते खूप वेळपर्यंत बोलत राहिले. अण्णासाहेबांनीही पोरे, मास्तर यांची पाठ थोपटली व आदर्श विद्यार्थी म्हणून माझा व श्री. नागपुरे यांचाही उल्लेख करण्यात आला. आम्ही दोघेही मोहोडांचे जुने विद्यार्थी पण आदर्श वगैरे बिलकूल झूट. नागपुऱ्यांचे सोडा. पण मी हा विपर्यास सहन करणे शक्य नव्हते. पोरांना मी म्हटले, " मी यांना आदर्श का वाटतो कोणास ठाऊक. कदाचित देशाच्या आजच्या गरजेमुळे आदर्शांच्या कल्पना बदलल्या असतील. तुम्हीही मोठे व्हा. कोणीही व्हा. लुच्चे, लफंगे, मवाली कोणीही. देशात सभ्य फार झाले. आता जरा याही प्रकारचे लोक हवेत. पतिव्रता फार झाल्या. आता हेरगिरी करून, देहाचे विघाड पत्करून देश राखणाऱ्या बाया, शत्रूची नरडी फोडणारे देशभक्त गुंड हवेत. "

लगेच मोर्शीकडे निघालो. तेथे कानफाडे सरांची शाळेतच भेट झाली. त्यांनी घरी नेले. तीन दिवसांच्या प्रवासाने तोंडे आरशात बघवत नव्हती. गरमागरम पाण्याने स्नाने, दाढ्या आटोपल्या. माझा पूर्वार्ध याच गावातला. ब्राह्मणेतर चळवळीची ही काशी. सत्यशोधक समाजाचे जलसे, मारामाऱ्या, श्री. अमृतकर, श्री. श्यामराव गुंड आणि आताचे पंजाबराव अदातपुरे यांच्या आठवणींची उजळणी होईतो मी स्वयंपाकघरात डोकावून पाहले. सरांची आई त्या गर्दीत नव्हती. तिच्या फोटोखाली मृत्यूची तिथी लिहिलेली होती. तिचा माझा सहवास चार वर्षांचा. आपल्या पोराने शाळेसाठी आजन्म ब्रह्मचारी राहायचे ठरवले तेव्हा नातवंडांची वाट पाहून थकलेली ती बाई आम्हा विद्यार्थ्यांचीच आजी झाली होती. मला आवडणारी बासुंदी व शिरा ती आजही त्या बायांकडून करवून घेत होती.

जेवणे आटोपून आम्ही पुन्हा शाळेत गेलो. गडकरी ती नवी भव्य इमारत व पोरांची गर्दी पाहून थक्क झाले. पोरींनी मनोहर नृत्य केले. मुलांनी देश-भक्तीची गाणी म्हटली. पाहुणे भारावले. मला हे सहन होणे शक्य नव्हते.

आम्ही पाहात होतो ती इमारत भव्य व शाळा नावाजलेली होती यात

संशय नव्हता; पण मी मनात आजवर जपलेली माझी शाळा ती नव्हती. रामजी बुवाच्या मठाजवळच्या लहानशा जागेत चापा, कौले, टिन मिळेल तसे लावून एक शाळा उभारली. त्या शाळेतले सोन्याचे दिवस मी अजून जपून आहे. हजार अडचणींशी झुंजत ती शाळा चालली होती. दोन वेळ जेमतेम जेवणा-इतकाही पगार त्यावेळी हेडमास्तरांनादेखील मिळत नव्हता. हुशार मुले सरकारी विद्यालयात नाव दाखल करीत. आम्हांला मुले मिळवण्यासाठी दारोदारी भटकावे लागे. कोणाचीही सहानुभूती नसे. आमच्या शाळेतला कोणी मुलगा एकटा दिसला रे दिसला की त्याला इतर लोक बदडून काढत. हेडमास्तर गावोगाव हिंडून बोर्डिंगसाठी ज्वारी गोळा करीत. कधीतरी ही शाळा बांधू म्हणून स्वप्ने रचत. एक दिवस डॉ. पंजाबरावांनी ती शाळा ताब्यात घेतली. कानफाडेसरांच्या कर्तृत्वाला वाव मिळाला. बोर्डात पहिला नंबर तिने मिळवला. पण हे सर्व नंतरचे. मी होतो त्यावेळी दारिद्र्य होते. आमची शाळा गुंड जाळतील अशी धास्ती होती. तरीही आम्ही नेटाने तेथे शिकत होतो. गणपतीचे उत्सव साजरे करीत होतो. मुसलमानांजवळूनदेखील त्या उत्सवांसाठी वर्गणी आणीत होतो. नाटके, नकला करीत होतो. आमची पालक मंडळी त्यासाठी दहा दहा कोसांवरून येत होती. सालबर्डीच्या जत्रेत आमच्या शाळेच्या पोरांना स्वतः पोलिस ऑफिसर हाका मारीत. तेथली व्यवस्था, तेथले दंगे वगैरे आमच्या साह्याने आटोक्यात येत. वरूडकडे जाताना ती जुनी शाळा रस्त्यावरूनच मी पाव्हण्यांना दाखवली. हजार आठवणी भरून आल्या.

मोर्शीला आमचे सत्कार, भाषणे इ. मुळे वरूडला जाईस्तो दिवस मावळला. कानफाडे सर या गोष्टीला जबाबदार. पण त्यांचेही खरे होते. त्यांनी आम्हांला लेकरांसारखे इतकी वर्षे वागवले होते. त्यांचे मन मोडवले नाही. त्यांचा स्वभाव तापट. पण सारा तापटपणा शाळेसाठी त्यांनी वापरला. चालढकल्या मास्तरांना ते कर्दनकाळ वाटतात. मी बोर्डिंग सांभाळत होतो तेव्हा एका आण्याच्या चुकी-साठी ते गरम होत. कोणाला कधी छडीने फोडून काढीत त्याचा नेम नसे. पण कोणी महारपुऱ्यातला पोरगा आजारी पडला हे कळू द्या—मग आईसारखी धावपळ करीत. घरचे तांदूळ, साखर, गहू पोरांसाठी लावून ठेवीत. साधे अमरावतीहून आले तरी आमच्यासाठी खाऊ आणीत. खूप पुस्तके वाचायला देत. बहुजन समाज कसा पुढे जात आहे त्याच्या गोष्टी सांगत. ‘ काही झाले तरी मी ही

शाळा बांधणार ' अशी प्रतिज्ञा करीत. एखाद्या दिवशी त्यांना कोणीतरी प्रतिष्ठित माणूस दुखवी. ते दोन दोन दिवस अस्वस्थ राहात. आम्हांला बोलवीत. ' शाळेला विसरणार नाही. ' अशा शपथा आमच्याकडून पुन्हा पुन्हा घेववीत. शाळेचा कोणी माजी विद्यार्थी मोठा झाल्याचे कळले म्हणजे एकेक महिनाभर त्याच्या गोष्टी सांगत. त्याचे कौतुक करीत.

मोर्शी सोडली तरी तिच्या आठवणी सुटत नव्हत्या. सातपुड्याचा डोंगर एका हाकेवर ठेवीत सडक धावत होती. हिवरखेड गेले. शेषराव अंधारेचे गाव दुरून दिसले. एका वर्षात दोन वर्ग करणारा शेषराव ! दोन दिवसांच्या तापाचे निमित्त झाले. त्याच्या वडलांशी हेडमास्तरांनी स्पर्धा केली. पुरते आठ दिवस ते ढोरासारखे हंबरडा फोडीत होते. सारा तालुकाभर आमच्या सरांच्या आठवणी दर्वळत आहेत. मघाचा तो नेहरूगीत गाणारा पोरगा अंबाड्याचा. त्याचा बाप आमच्याच शाळेत शिकला. मला त्यावेळी एका इंग्रजी सिनेमाची आठवण झाली. मोर्शीच्या दिशेने धावत्या गाडीमधून पाहात मी मनात म्हणालो, गुडबाय मिस्टर चिप्स !

वरूडला दिवस शाळा पाहण्याइतका टिकला. हेडमास्तर गावात नव्हते म्हणून काही चहा-फराळातून आमची सुटका झाली नाही. ते करून आम्ही म. फुले कॉलेजात गेलो. हेही शिवाजी संस्थेचेच. येवढ्या आडगावी निघालेले पहिले कॉलेज. वरुड हा तालुका देखील नाही. कॉलेज निघाले तेव्हा कविवर्य या. मु. पाठक नागपूरहून तेथे आले. त्या प्राचार्यांना इंग्रजीचा प्राध्यापकही या खेड्यात सापडेना. काही दिवस स्वतःच त्यांनी इंग्रजी शिकवलं. कॉलेज चालवायचे व सुटीच्या दिवशी वर्गणी करायची. आता श्री. काळे प्राचार्य. उद्यापरवापासून सुरू होणाऱ्या स्नेहसंमेलनाची तयारी चालू होती. नदीच्या इकडच्या अंगाला कॉलेजची इमारत उभी आहे. आंगणात मंडप उभारणे सुरू होते. येथे कॉलेज चालवणे हा एक खरोखरच मोठा प्रयोग आहे. संस्कृती कितीतरी मागे. कॉलेजात शिकणाऱ्या मुली ! ही येथे अलौकिक बाब आहे. कोणी तुळसी, जनी, अलोकी, विठी—ऐकायलाच नवखे वाटते. आमच्या लहानपणी आशा, उषा, हेमलता वगैरे नावे नुकतीच ठेवायला प्रारंभ झाला होता. त्यावेळी हेमलता किंवा संध्या नावाची म्हातारी असू शकेल अशी कल्पनाही करणे अशक्य होते. पोरांची नावे सुधारलेली तर बापाची जीची तीच. त्यामुळे

शशिशेखर डोमाजी वानखडे किंवा भालचंद्र नागोराव उदखेडे अशी संपूर्ण नावे दोन पिढ्यांचा मिलाफ दाखवीत. आणि वरूडला तर त्याहूनही गंमत होती. विठाबाई येथे बी. ए. पास होत होत्या आणि तुळसाबाई एफ. वाय. ला होत्या. झक्क पाचवारी साडीत, लेडीज सायकलवर येणाऱ्या पोरीने आपले नाव जनाबाई सांगावे हे ऐकायला भयंकरच ! उद्या एखादा सुटाबुटातला जॉन जोसेफ रस्त्यावर अडवून आम्हांला सत्यनारायणाचे आमंत्रण देऊ शकेल व विचारले तर टायची गाठ सैल करीत सांगेलही, मारोतराव किंवा अवधूतराव !

वरूडच्या कॉलेजने या संस्कृतीला शेक्सपियर, बायरन इ. च्या वातावरणाचा वाङ्मयाचा स्पर्श केला. मर्ढेकर, केळकर ही कधी न ऐकलेली नावे ऐकवली. शहरात फारच अडवणाऱ्या गरजा येथे सुतासारख्या सरळ वागतात. पुरती चार वर्षे झाली; पण पोरींसाठी युरिनल्स नाहीत. काही अडले नाही. युरिनल्सचा आग्रह धरणारे कॉलेज हे आताआताचे. त्यापूर्वी वरूडच्या स्त्री समाजाचे काही अडत नव्हतेच ना ?

प्राचार्य काळे आम्हांला पाहून खुष झाले. अमरावती त्यांनी यंदा सोडली. त्या गावाचे आम्ही म्हणून अधाशीपणाने मला अमरावतीबद्दल विचारू लागले. मी त्यांना पाहुण्यांची ओळख करून दिली. या वरुड विभागात संत्र्यांची लागवड फार. यशवंतरावांनी तर त्याला कॅलिफोर्निया असे म्हटले आहे. संत्र्यांचा एखादा बाग पाव्हण्यांना दाखवणे आवश्यक होते. श्री काळे म्हणाले, 'त्यात काय अवघड ? अहो माझ्या चपराशाजवळ आहे की एक बागीचा. चपराशाजवळ बाग ! काही नवल नाही. परवा कोणा खालसा संस्थानात म्हणे एका चपराशाने साहेबावर चिडून राजीनामा दिला. तो राजीनामा द्यायला तो हत्तीवर बसून आला होता म्हणतात. संत्र्यांचा बगिचा म्हणजे काही लहानसहान गंमत नव्हे. शे-पन्नास झाडे असू द्या—दरवर्षी पंधरा वीस हजार रुपयांना मरण नाही. पूर्वी इकडे संत्री फार नव्हती तेव्हा या बाजूला मुली देणे कमीपणाचे समजत. आज तुम्ही इकडची मुलगी करताना दहा हजार रुपये हुंडा मागा. 'तुम्ही आमच्या संत्र्याची टरफलेही मागितली नाहीत' असे म्हणून सोयरा हासेल. लाख दीड लाख असेच आकडे एकेक बागाईतदार दरवर्षी मोजतो.

श्री. भडके तेवढ्यात कॉलेजात आले. 'ओळखले का मला ?' त्यांनी विचारले. हे गृहस्थ पुसदला शेदीडशे रुपयांची नोकरी करीत होते. "आता

वडील वारले म्हणून इस्टेट सांभाळायला आलो. " मला नवल वाटले. सालाना पंचवीसतीस हजारांचे उत्पन्न घरच्या बागेत मिळत असताना हा माणूस खुशाल शेदीडशेच्या खर्डेघाशीवर आजपर्यंत खुष होता. डॉ. पंजाबरावांनी शिक्षणाच्या दृष्टीने या जिल्ह्याचा भारतात दुसरा क्रमांक आणण्याची किमया केली. पण हे चांगले झाले की वाईट ? दहा हजारांचा कापूस अथवा पन्नास हजारांचा संत्रा पिकवणाऱ्या कास्तकाराचा पोरगा त्यांनी शंभर रुपये किमतीचा मास्तर नाही तर दीडशे रुपयांचा कारकून बनवला. जरा कुठे येसफ्येस करायला लागलेली ही पोरे वडिलार्जित शेतीवर जायला नाराज असतात. त्यांना हवे असते शहरात राहणे. आता कूळ-कायद्याने दिली आपत्ती करून. शहराची मजा लुटावी तर तिकडे इस्टेट जाते कुळाच्या घशात. वऱ्हाडात पाचदहा एकरवाले हजारो आहेत. शेती की शहरची नोकरी हा त्यांच्यापुढे प्रश्न आहे. उत्तम किसानांच्या बीजातून आजकाल निकृष्ट दर्जाचे B. A. M. A. तयार होत आहेत. ते धड सुशिक्षितही नसतात आणि धड कास्तकारही नाहीत. श्री. भडके मात्र आपल्या बागेत रमले होते. त्यांनी आम्हांला बगिचा दाखवायला नेले.

चांदण्यात संत्र्यांच्या झाडांवर फळे हासत होती. आम्ही एकेका मधुर फळाची लज्जत घेत भडक्यांना माहिती विचारत होतो. आंबिया बहर, मृग बहर अशी नावे उच्चारली जात होती. आमच्या तोंडात व खिशात मावली नाहीत म्हणून शेवटी आमच्या मोटारीत डझनोंनी संत्री ठेवून दिली. तेवढयात सौ. काळेकडून फराळाचे बोलावणे आले. श्री माधवराव ठाण्याचे– म्हणजे बाईंच्या माहेरचे. येथे होस्ट माधवराव ! या आडगावात येण्याची संस्थेची आज्ञा झाली. म्हणून काळेसाहेब येथे आले. साहेब आले म्हणून बाई आल्या. बंगल्यात सामान रचणे सुरूच होते.संस्थेची शिस्त आहेच; पण त्यापेक्षा या खेडयाच्या कॉलेजला आपली गरज आहे याचीच जाणीव काळेसाहेबांनी ठेवली. नाइलाजाने अमरावती सोडली. बाई परवा भेटल्या तेव्हा इतकी वर्षे राहलेले घर सोडण्याचे दुःख त्यांच्या डोळयांत दिसले होते. नुकताच त्यांनी अमरावतीला बंगला बांधला पण या उपेक्षित गावाची हाक अधिक महत्त्वाची.

माहेरचा माणूस गडकरी ! त्याच्या निमित्ताने आमचाही पाहुणचार झक्क झाला. आता पुढच्या मुक्कामावर जायचे; पण मुलींची शाळा, निदान त्या शाळेची हेडमास्तरीण, त्यांचे प्रश्न हा एक कार्यक्रम उरकणे भाग होते. नाहीतर

मामासाहेबांना आमचा विसर पडला असा बोल लागला असताच. तेही मग आटोपले. गाडीमध्ये पाय ठेवतो तोच श्री. यावलकर आले. त्यांचा धाकटा भाऊ शेतकी अध्ययनासाठी अमेरिकेत गेला होता. आणि डॉक्टरेटसची बाराखडी नावामागे लावून परत आला होता. श्री. यावलकरांचा बगिचा आदर्श. पण तो बघण्यासाठी उद्याचाही पूर्ण दिवस पुरला नसता. तेव्हा निरोप घेतला. गाडी साऱ्या आमंत्रकांना नाराज करून वरुड सोडू लागली. तोच चिडलेल्या पठाण घरधन्याने अतिथ्य न स्वीकारणाऱ्या पाहुण्यांस चपराक मारावी तसा ताडकन आवाज आला. मी दचकून पाहिले. मोटारची बाजूची काच फुटली होती.

वरूडच्या चिडलेल्या यजमानांनी नव्हे — मोटारच्या वेगवान चाकांनी उडव-लेल्या एका धोंड्याने आमच्या गाडीत डोकावून पाहिले होते. काचेचे असंख्य तुकडे आमच्या कपड्यांमध्ये शिरून लगट करू लागले. त्यांच्यापैकी एखाद्याने जर आमच्या डोळ्याबिळ्यात उडी घेतली असती तर? पण काच फुटण्या-खेरीज काही झाले नाही. कपडे झटकून व काचा साफ करून आम्ही पुन्हा प्रवास सुरू केला. रस्त्याने अर्थातच काही वेळ सरकार व रस्तेदुरुस्ती हा विषय पुरला. विदर्भाच्या सडकांकडे अजूनही सावत्र डोळाच आहे. हिटलरने देश-सुधारणेच्या कार्यात रस्तेबांधणीला किती प्राधान्य दिले होते त्याचीही मग आठवण काही फर्लांग पुरली.

रात्री बाराच्या वर वाजले तेव्हा रात्रीचा मुक्काम आला. श्री. तुकडोजींचा मोझरी आश्रम आला होता. महाद्वारावर पहारेकरी आमची वाट पाहात होता. महाराजांना मी परवाच त्याबद्दल माहिती देऊन ठेवली होती व केरळकडे जाण्याच्या घाईतही त्यांनी सारी व्यवस्था केली होती. काहीशा रागानेच ते म्हणाले होते, "येवढा दूरचा पाहुणा घेऊन येणार आहेस तर मला जरा आधी कळवायचे की नाही? आता तू आहेस अन तो आश्रम आहे. जरा काही उणे पडले तर स्वतः सारे करून घे. तू काही तेथे नवा नाहीस."

घरधन्याच्या गैरहजेरीत आम्ही त्या वास्तूत शिरत होतो. आमच्यासाठी महाराजांच्या आवडत्या झोपडीत आंथरुणे टाकून ठेवली होती. स्वच्छ, उबदार पांघरुणेही. तेथेच टेलिफोनही होता. जेवायचे नव्हतेच. व्यवस्थेसाठी आलेल्या माणसाला मी म्हटले, "बालकवी जागे असतील तर त्यांना हाक मारा."

बालकवी येईस्तो आम्ही कपडे वगैरे बदलून जरासे तेवढ्यातल्या तेवढ्यात

पाय मोकळे केले. चंद्र बुडला होता. आश्रमात काही काही ठिकाणी विजेचे दिवे प्रकाशत होते. त्या उजेडात रस्त्यांच्या कमानीवर रंगवलेली काही वाक्ये दिसत होती. प्रार्थनामंदिराकडे जाणाऱ्या कमानीवर लिहिले होते, " सबके लिये खुला है । मंदिर यह हमारा । " माझ्या तोंडून नकळत ओळी निघाल्या " आवो कोईभी पंथी । आवो कोईभी धर्मी, सब देवता समाना । मंदिर यह हमारा ।। "

महाराजांच्या रचना गेय व सोप्या. आमच्याकडच्या अनेकांना त्या सहज पाठ झाल्या आहेत. एक ओळ ऐकली वाचली की दुसरी ओळ सहजगत्या तोंडातून बाहेर पडते. काही ओळी तेथे ' ग्रामगीते ' मधल्या होत्या. महाराजांचा हा ग्रंथराज समजला जातो. त्यांच्या भजनांची पुस्तके पाऊणशेला टेकली आहेत. पण आदर्श समाजव्यवस्थेवरचे हे काव्य सर्वांचा कळस आहे. त्याचा काही भाग अनुवाद करून इस्रायलच्या लोकांना देण्यात आला. त्यांना आपली ग्रामरचना व समाजव्यवस्था यांचा व ग्रामगीतेचा फारच घरोबा वाटला. त्यांनी संपूर्ण ग्रंथ अनुवाद करण्यासाठी निकड लावली. अजून ते झाले नसेल. ग्रामगीतेसोबतच जगातले इतर महान संत, कवी व तत्त्वज्ञ यांची वचने त्या आश्रमभर लिहिली आहेत. ती वाचल्यानंतर खेडूत लोक गावात जातात. आपल्या खेड्यात घरांच्या भिंतीवर मग तशीच वाक्ये लिहितात. सारवलेल्या व ती शुभ वाक्ये लिहिलेल्या त्या भिंती मग स्नान केलेल्या भक्ताने कपाळी चंदन लावावे तशा शोभतात.

लवकरच बालकवी आले. बालकवी ! गुडघ्यावरची एक लुंगी, छाती कशीबशी झाकणारा दुपट्टा, डोईचा गोटा व चष्मा. मला कसेसेच वाटले. हा माणूस माझा पुरता दीड तपापासूनचा मित्र. इकडच्या नावाजलेल्या देशमुख घराण्यातला एक उमदा तरुण. मी अमरावतीस शिकत होतो तेव्हा आमच्या भेटी होत. त्यावेळी देशमुखांचा निमगौर व निरोगी चेहरा, शरीराची प्रमाणबद्ध ठेवण व त्यावर स्वच्छ धुऊन इस्त्री केलेला पायजमा व नेहरू सदरा, कधी कधी खादीचे जॅकेट अशा सुंदरपणाने त्यांचे दर्शन होई. मासिकाच्या संपादकीय खुर्चीवरूनच फौन्टनपेनने ते झराझरा लिहीत राहात. कधीमधी आम्ही रात्री फिरायला जात असू. तेव्हा आपल्या गोड गळ्याने एखादी कविता ते गात. बालकवी हे शीघ्रकवी. धर्म, तत्त्वज्ञान, इतिहास व भाषा यांचा व्यासंग दांडगा. विशेषतः हिंदीवर त्यांचे अप्रतिम प्रभुत्व. हा माणूस नेहमीच्या मार्गाने गेला असता तर

वेगळा चमकला असता. पण आश्रम, गोवा चळवळ, भूदान आणि काय वाटेल ते इत्यादीच्या वेडात तो असा किडकिडीत, थकलेला व लुंगी उपरण्यात येथे दिसत होता. असलेली जमीन भूदानात देऊन तो निर्धास्त झाला होता. मजुराइतक्या वेतनावर आश्रमाचे मुखपत्र ' गुरुदेव मासिक ' तो चालवतो आणि कोणत्याही गावाच्या हाकेला ओ देऊन भजने गायला जातो. एखादी देशव्यापी चळवळ झाली तर हा येथे राहीलच याची कोणाला खात्री नाही. सर्वांनीच या माणसाची चिंता सोडली. लेकराबाळांचा व्याप नाही. बायकोला बिचारीला या जगावेगळ्या नवऱ्याची सवय झाली आहे. प्रतिष्ठित घराण्यातली ती माहेरवाशीण. या वेड्याला ती सावलीसारखी चिकटून आहे.

" जयगुरू ! जयगुरू ! " हा येथला नमस्कार. तो ' जयजगत ' तिकडे पवनारला. इथला हा ' जय गुरू '. बालकवींना आमच्या भेटीमुळे खूप आनंद झाला होता. त्यांच्या एका हिंदी गीताचा मी कधीतरी अनुवाद केला होता. मी विसरलोही होतो. बालकवींनी मात्र पहिल्याच बैठकीत पाहुण्यांना तो म्हणून दाखवला. बालकवी संगीतज्ञ आहेत. चाल फारच छान लावली होती. तेथल्या गहनगूढ अंधारात चिंतन करीत पहुडलेल्या शांत वातावरणावर आमच्या झोपडी-तून गीताचे स्वर फिरत होते.

> गाव माझ्या सख्याचे दुरी राहिले !
> तेज त्याचेच साऱ्या जगी व्यापले !

खूप वेळपर्यंत बालकवी गात होते. परवा कालडीच्या भूदान संमेलनात त्यांनी एक हिंदी गीत म्हटले. सारा समुदाय नागासारखा डोलला होता. ' हुवा शांतीका जंग भूमीदान हमारा ' अशा ओळीवर ध्रुपद येते. पाहुणे मस्त रंगले. पण मग आम्हीच त्यांना झोपायचा आग्रह केला. मी मामासाहेबांची नजर चुकवून बालकवीसोबत सटकलो.

मुख्य आश्रमाच्या समोरच्या बाजूस आश्रमाच्याच काही इतर संस्था-शाळा, दवाखाना इ. आहेत. त्याला लागूनच एक लहानसे गाव वसले आहे. त्या गावात बालकवी एका खोपटात भाड्याने राहतात. बाईंनी या दोन वेड्या मित्रांसाठी तेवढ्या रात्री चहा केला. दूध मांजराने सांडवले म्हणून चहा वाईट झाला असेल अशी ती माउली पुन्हा पुन्हा खेद करीत होती. नवऱ्याला दुरुस्त कर हे तिला सांगण्यातही अर्थ नव्हता. आमची चाल थोडी गोघाची. त्यामुळे बाईपेक्षा

बालकवींशीच पेटत राहलो. मला त्यांचे हे जीवन बिल्कुल पसंत नव्हते. महाराज वेगळे; बालकवी वेगळे. हा आश्रम व ही सेवा. दोन दिवसांसाठी हौसेने आलेल्या पाहुण्यांना व पाच मिनिटांच्या भाषणात स्तुती करणाऱ्या पुढाऱ्यांना हे ठीक होते. नेहमी राहणारांची ही अवस्था होती. हा प्रयोग वगैरे थांबवायलाच हवा होता. आश्रमाच्या बाहेरही एक जग होते. तेही आश्रमाइतकेच भले किंवा बुरे होते. तेथेही सेवेपासून लफंगेपणापर्यंत सर्वांना वाव होता. त्यासाठी बालकवीसारख्या निरपराध माणसाने येथे पिचत पडण्याची गरज नव्हती. अर्थात माझे हे सर्व म्हणणे वाऱ्यावरच जाणार होते. त्या थंडीत दोन घोंगडी अंगावर घेऊन आम्ही सडकेने फिरायला निघालो. काही दिवसांपूर्वी या आश्रमाच्या आसपास एक नवा साधू उगवला होता. त्याने जेवण मुळीच करणार नाही असे जाहीर केले होते. एक लहानसा आश्रमही त्याच्या अवतीभोवती उभा होऊ लागला होता. एवढ्यात मात्र त्याची काहीच वार्ता नव्हती. बालकवींजवळ चौकशी करावेसे वाटले; पण झोप अशी मस्त येत होती !

## चौथा दिवस

नेर व मोर्शीचे हारतुरे, वरूडची संत्री आणि बालकवींकडचा चहा यांच्य आठवणी झोपेस्तो रेंगाळल्या, झोप गाढ व भरपूर मिळाली; पण थकल्यामुळे तरीही ती अपुरी वाटत राहिली, भल्या पहाटे एकदा जाग आली, प्रार्थना-मंदिरात टणटण घंटा वाजत होती. सकाळच्या पारदर्शी काळोखात टण टण आवाज फार गोड वाटला. संत्र्यांसारखी आंबट व गोड अशी त्या नादाला चव होती. त्या गार गार व तेजाची चाहूल लागलेल्या काळोखात तो आवाज वर्धेत स्नान करून आल्यासारखा स्वच्छ शीतळ वाटत होता. कोणी तरी मनमोकळेपणाने आपल्याशी बोलावे तसा प्रत्येक ठोक्याचा चेहरा आनंदी होता. पहाट अशी उगवली. आश्रमाच्या निसर्गात व त्या पहाटेत आम्हाला, या यंत्रयुगाच्या मागे — गोपाळ गाई चारायला निवत असे त्या काळात नेण्याचे बळ होते. काही झाले तरी एका कवीच्या आश्रमातली ती सकाळ होती. एका संताच्या झोपडीभवतीचा तो निसर्ग होता. मी हरखून गेलो. तेवढ्यात बाहेरच्या सडके-वरून एक मालवाहू ट्रक चिडत ओरडत गेला. त्याची घर्र घर्र त्या स्वप्नधुंद

पावित्र्याचे काळीज चिरत गेली. प्रार्थनेच्या घंटीस माझे शरीर 'ओ' देणार होते; पण रसभंग झाला व मऊ अंथरुणावर अधिकच विसावून मी रुसलेल्या मुलासारखा पडून राहलो. आश्रमाची प्रार्थना ऐकायची खूपशी इच्छा तशीच राह्यली.

बालकवी आणि आश्रमातले माझे इतरही जुने मित्र थोड्या वेळाने आले. बालकवी कधी उठले ? की झोपलेच नव्हते ? झोपडीतच चहाफराळ झाला. मामासाहेबांनी तेथून घरी फोन केले. माधवरावांना मुंबईची काही पत्रे तेथे आली होती. फोननेच ती त्यांनी ऐकली. मग प्रवास सुरू करण्याआधी आश्रम बघून जा अशी बालकांनी सूचना केली. आम्ही त्याप्रमाणे तिकडे निघालो.

आश्रम म्हणजे पहिल्या दर्शनात एक सुंदर बगिचा वाटतो. भकास जागेतले भयाण रानातले, नदीकाठचे असे अनेक आश्रम मी पाहिले. अपटुडेट पोंग्राखातल्या रामकृष्ण आश्रमाच्याही इमारती पाहिल्या. पण उपवनातला आश्रम हाच. येथे पूर्वी खरोखरच बगिचा होता.मी चार वर्षांचा होतो तेव्हा या बगिच्यात दादाजींसोबत दुडदुड धावत होतो. त्यावेळी आम्ही सर्वजण चातुर्मास्यासाठी महिनाभर येथे होतो. मग यज्ञ झाला. खूप साधुसंत गोळा झाले. त्याची आठवण जपण्यासाठी की काय कोणास ठाऊक पण तुकडोजींनी येथे वास्तू बांधली. हा बगिचा त्यांना ठाकुरांनी दिला. नंतर यज्ञयागांकडून देशभावनेकडे वळलेल्या महाराजांनी वरखेडचे कार्यकेंद्र येथे आणले. वरखेडला देवळांचे महत्त्व. ते त्यांच्या गुरूचे गाव. शिवाय तेथेच मामाघरी त्यांचे बालपण गेलेले. येथे मात्र गांधींची भेट झाल्यानंतरच्या त्यांच्या कल्पना साकार झाल्या. देवळापेक्षा दवाखान्यास व यज्ञा-पेक्षा ज्ञानास व विद्यालयास महत्त्व आले. आज प्रेस, वाचनालय, वसतिगृहे या सर्वांचा समावेश तेथे आहे.

येथली सर्व वास्तू महाराजांच्या कल्पकतेतून आली. पूर्वीचा बगिचा कोठेही न दुखवता त्यांनी इमारती बांधल्या. तुकडोजींना शिल्पकलेचे खोल ज्ञान आहे. थोड्या पैशात, सुंदर व छोट्या असूनही भव्य वाटणाऱ्या या सर्व इमारती ! या आश्रमाचे महाद्वार खरोखरच सुंदर आहे. आश्रमाची प्रौढता, प्रसन्नता व ज्ञानतपात तावलेली विरागी वृत्ती या सर्वांचे भाव त्या दारावर उमटल्याचा प्रत्यय येतो.

गोरक्षण, विहिरीत बांधलेल्या योगाभ्यासाच्या खोल्या, विक्रीकेंद्रे, औषधी

वनस्पतींची लागवड इ. बघत बघत आम्ही डॉ जैस्वालांकडे चहाला बसलो. प्रसूतिविभागातून डोकावले तेव्हा नवजात बालकांच्या पाळण्यावर सूर्याचे कोवळे स्पर्श झालेले दिसले. आश्रमाचे रस्ते आखीव, मऊ मऊ रेती आंथरलेले आहेत. सुंदर हिरवळी राखल्या आहेत.

कोणाही नवागताला खूष करून सोडणारा येथला उपवनाचा श्रीमंत भाव, वातावरणाचे सौंदर्य व वास्तूची ऐट आहे. येथले कार्यही माणसाला थक्क करून सोडते. येथे जे जे तुकडोजींचे आहे ते ते सर्व उदात्तसुंदर आहे. आणि जे त्यांचे नाही, ते मात्र भयंकर आहे. जुन्यानव्या कार्यकर्त्यांचे मतभेद आहेत. एके काळी केलेल्या त्यागाचा पश्चात्ताप झालेले हेवेदावे आहेत. हे सगळीकडेच असते. या आश्रमाची भांडणे मात्र इतक्यात चव्हाट्यावर आली होती. काहीतरी भानगड खूप गाजली होती. महाराजांनी व्यवस्थेत बराच बदल केल्याचे व बराचसा अजून करणार असल्याचे कळले. अर्थातच आम्हांला त्यांशी कर्तव्य नव्हते. आश्रम बघायचा होता. तो जगायचा नव्हता.

निघताना मी बालकवींच्या हाती दोन तीन संत्री ठेवली. "मला कशाला देता ती ?"

खरेच आजवरचे आयुष्य अशा रुक्षपणाने व भोळेपणाने दवडलेल्या त्या अकाली म्हाताऱ्यास आता संत्री खाऊन तरी काय सुख मिळणार होते ? साऱ्या जाणिवाच त्याने बधीरून टाकल्या होत्या. मी त्यांना सांगितले,

"तुमच्यासाठी नाहीत ती. बाईंना द्या." मोटार कौंडण्यपुराकडे निघाली.

तिवस्यापासून चांदूर रेल्वेकडची सडक घेतली. मामासाहेबांनी धावत्या खेड्यांकडे बोट दाखवीत आम्हांला तीस पस्तीस वर्षे मागे नेले. त्या काळात तरुण डॉ. मामासाहेब होते, नुकतेच उगवू लागलेले डॉ. पंजाबराव होते. आणखीही कोणी कोणी होते. ब्राह्मणेतरांच्या पत्रकावर भाऊसाहेबांनी सही दिली नव्हती. वातावरण गरम होते. कुठल्यातरी गावी चौबळ पंजाबरावांचे स्वागत करणार होते. पण मतभेद झाला असताना ब्राह्मणेतर बहुमताच्या असेंब्लीत आपण मंत्री राहायचे नाही असा निर्णय पंजाबरावांनी घेतला. त्यांच्या राजीनाम्यानंतर चौबळ मंत्री झाले. मग त्या अमक्या गावातल्या स्वागत समारोहाबद्दल मामासाहेब म्हणाले, "प्रथम मंत्री भाऊसाहेबांचे स्वागत चौबळ करणार होते; पण मंत्री चौबळांचे स्वागत भाऊसाहेबांना करावे लागले." अशाच

आठवणींनी भारावून जाऊन गाडी धावतच होती. एका खेड्यात ती थांबली. कुणीतरी जुनी माणसे भेटली. पुन्हा खालचा तळ ढवळला गेला.

पक्का रस्ता ऊर्फ कच्ची सडक पकडून काही वेळ प्रवास झाला. मग वर्धेच्या काठची टेकाडे दिसू लागली. तेच कौंडण्यपूर होते. नदीच्या एका बाजूला कौंडण्यपूर आणि दुसऱ्या बाजूला देऊळवाडा. दर कार्तिकी-पौर्णिमेस आम्ही इकडे येतो. भली जोरदार यात्रा भरते. वरखेडला होतेच; पण येथेही. तुकडोजींचे त्यावेळी भजन होते. एखादा तरी यज्ञ होतो. गतवर्षी त्या यज्ञात एक साधू पडला. कोणी म्हणे अपघात झाला. कोणी म्हणे ती अग्निसमाधी ! वाचला म्हणतात. यज्ञ म्हटला म्हणजे मग एखादा चमत्कार करून दाखवण्याची जबाबदारी आलीच. त्या साधूचा तो उडी घेण्याचा अथवा पडण्याचा चमत्कार ! पण त्याला वाचवण्याचा खरा चमत्कार त्या डॉक्टरांचा. विसाव्या शतकाकडे जर यज्ञदेवतेने पाहिले तर किती किती चमत्कार तिला दिसतील व मग आपल्यापेक्षा या विज्ञानयुगाची उपासना करा असे ती आपल्या भक्तांना सांगेल.

कार्तिकी यात्रा सरलेली होती. यात्रेत पेटलेल्या चुलींचे अवशेष, हॉटेलांच्या आठवणी तेथे उमटल्या होत्या. आम्ही गाडी स्थिर करून पायी निघालो. दोन गावांच्या मध्ये वर्धामाई वाहात होती. परवा पूर्णा दिसली तेव्हा वर्धेची आठवण झाली होती. आमचे सगे पाणी वर्धेचे. पूर्णेचे म्हणजे मावसपाणी. चड्डीवर इस्त्रीचा पँट घालण्याच्या वयात मी पूर्णा पाहिली; पण चड्डी नव्हती त्या वयापासून वर्धेशी लगट. सारे बालपण तिच्या अंगाखांद्यावर गेले. तिची पुरापासून मोत्यांपर्यंत सारी रूपे न्याहाळली. श्रावणातला तिचा चहा पाहला. कंटाळवाण्या पावसाने चिडलेले तिचे रागीट पाणी पाहिले आणि कार्तिकातला तिचा प्रसन्न गर्भारगौरवही पाहला. तिच्या रात्रगाण्यांवर, वाहत्या धारेवर डुललो. बाया तिच्या केसात दिव्यांची रांग माळीत तोही सोहळा पाहिला. मार्गशीर्षातली ही समोरची वर्धा रुक्मिणीसारखी सुडौल बांध्याची आणि उफाड्या पिंडाची वाटत होती. सागराकडे जाण्याच्या गतीत अभिसारिकेचे डोळे होते; पण चाल होती मत्त हत्तीसारखी मंद. स्वतःशीच स्वप्न रचल्यासारखी, पिकलेल्या अंगसौंदर्याच्या जाणिवेने स्वतःस हारवल्यासारखी ती वाहात होती. तिच्याकडे कौंडण्यपूरच्या देवळातली देवी टेकाडाचे आसन उंचावून कौतुकाने पाहात होती—सासरी निघालेल्या

१७२९२


रुक्मिणीस पहावे तुझी. हजारो वर्षांपासून रुक्मिणीचे प्रेमकाव्य या वातावरणात गुंजत आहे. प्रेयसीच्या हाकेला साद देत श्रीकृष्णांच्या होकाराची अक्षरे येथे देव होऊन उभी आहेत.

देवळे बघून झाली. फोटो घेऊन झाले. आसपासच्या टेकड्यांनी बराच जुना इतिहास लपवला आहे. संशोधकांनी त्या टेकड्यांना आजकाल थोडे थोडे बोलायला लावले आहे. आम्ही त्या उत्खनित स्थळांकडे गेलो. तेथे जुनी मडकी, कुजलेले धान्य वगैरे सापडल्याचे एक हरिजन पुजारी सांगत होते. त्यांना काही चकचकीत दगडही आढळले होते. कुठल्यातरी ' साहेब ' लोकांनी त्या वस्तू नेल्या. त्या पुजाऱ्याला ते इनामही पाठवणार होते म्हणे. पण तो ते घेईल की नाही या शंकेने कदाचित ती मनीऑर्डर तशीच रेंगाळली असेल. कौंडण्यपूरचे नदीसमोरचे देऊळ जरा किल्लेवजा आहे. तेथे भुयार आहे. थेट अमरावतीला उघडते. भुयार म्हटले की ते खूप दूरपर्यंत जाते असे मानल्याविना त्याला वजनच येत नाही.

नदीत पाणी प्यायला आम्ही उतरलो. वरची टेकाडे तेथून भव्य वाटू लागली. ती उघडीबोडकी व भुसभुशीत मातीची जराशी पिवळट राखटपणाकडे झुकलेली टेकाडे फारच सज्जन आहेत. अगदी स्नानाला आल्यासारखी वाटतात.

निघायला लागलो तेव्हा आम्हांला बघून एक बैलगाडी थांबली. त्या नदी-काठाला, देवळांच्या वातावरणाला त्या बैलगाडीमुळे शोभा आली. बैल आपली घुंगरे वाजवीत दुरून धावत येत होते आणि गाडीच्या चाकांना धुळीची उंच तुरेदार डहाळी फुटली होती. मामासाहेबांमागोमाग मीही तिकडे गेलो. शांताबाई त्या छकड्यात दिसली. माझ्या या आत्येबहिणीला माझ्या भेटीने बराच आनंद झाला, " बाबू, तू आज इकडे कसा ? "

" अन् तू इकडे कुणकडे ? "

ती आपले उत्तर चोखपणाने देऊ शकली. अमक्याअमक्या कारणासाठी तिला धामणगावी जायचे होते व रस्त्यात हे गाव होते. मी तिला काय सांगणार ? हे गडकरी, वृत्तपत्र, संपादक, दौरा, शिवाय मामासाहेब, एज्युकेशन सोसायटी वगैरे वगैरे म्हणजे...आणि त्यातही तिचा प्रश्न उरलाच असता. " पण त्या सर्वांमध्ये तू कशाला ? " म्हणून तिला सरळ शब्दात सांगितले, " म्हटले, नाही रुक्मिणी तर निदान तू भेटशील म्हणून आलो... "

मी अजूनही वात्रटच राहलो असे मनाशी सांगत ती बैलगाडीत चढली. आम्हीही त्या पुरातन मंदिराकडे पुन्हा वळत नागपूर रोडकडे निघालो.

आता नागपूर म्हणजे येथून पुरता शंभर मैलांचा प्रवास. शिवाय रस्त्यात मध्ये कोठेही काही पाहायचे नव्हते. काहीही—म्हणजे शिवाजी संस्थेची शाळा-देखील नाही. त्यामुळे गप्पांना ऊत येणे साहजिकच होते. मध्येच तिवसा पुन्हा लागले. तिथली नदी कोणती म्हणून प्रश्न निघाला. मला विचारण्याचे धाडस कोणी केले नाही. पूर्णा व वर्धा सोडून मी इकडच्या सर्व नद्यांना नाले म्हणत असतो; आणि लौकिकात नाला म्हणून गौरव पावलेल्या पाणलोटांस मी 'नाली' अशी हाक मारतो. तिवस्याला त्या नदी ऊर्फ नाल्यावर एक पूल आहे. इतका वसका पूल! बरोबर आहे. जसा नाला तसा पूल. त्याच्या योग्यतेचा. वर्धेवर बांधून पाहा म्हणावे इतका टेंगणा पूल. . .रेल्वे लायनीला वर्धा आडवी झाली. तेथे पूल बांधावा लागला. आणि त्या बांधकामाची आठवण म्हणून त्या गावाला 'पूलगाव' हे नाव आले. तिवस्याचा रोड भिजू नये म्हणून नाल्यांवर अशा पुलांची लांडी चड्डी कोठे चढवलेली आहे. फारच मोठा नाला असला तर एखादे वेळी पुलाचा पायजामाही दिसेल. तेवढ्यात तळेगावाच्या खुणा दिसू लागल्या. माझ्या जन्माआधी या गावाला जंगल-सत्याग्रह झाला होता. अर्थात तेव्हा मी नसल्यामुळे, तेव्हाचे सर्वच काही मी सांगितले नाही. पण एक स्मृतिस्तंभ तेथे उभा आहे. आम्ही लहानपणी त्या सत्याग्रहाच्या आठवणी ऐकल्या. समारंभपूर्वक वाजत गाजत तेथे सत्याग्रही गेले आणि पोलिसांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी तेथल्या बोटभर काटक्या उचलल्या. तेवढ्याशा काटकीसाठी इतका जेल वगैरे भोगण्याची कल्पनाच मला मोठी गमतीची वाटली होती. तेथून जंगलही मोठे जोरदार दिसत नाही. आर्वीचे जंगल कोठेतरी जाता जाता येथे थोडेसे सांडले असावे—इतकेच. बाकी सारी बोडकी टेकाडे. जवळच आता मैलावर आष्टी आहे. तेथले हत्याकांड मात्र फारच उग्र होते. वांगी भाजावी तशी ब्रिटिशांची नोकर माणसे तेथे जाळली होती. त्या घटनेवरचे पवाडे अजून कानात घुमतात.

ऊन्ह आता तीव्र झाले होते. त्याच्या जिभा लाहा लाहा करीत सडक चाटत होत्या. कोणीतरी तळेगावला चहा घेण्याची कल्पना काढली. मी त्याच्याकडे अत्यंत आदराने पाहले. चहा कुठल्या हॉटेलचा यावर जरासा मतभेद झाला.

एकाही हॉटेलबद्दल मुळीच काही माहिती नसताना अधिकारवाणीने प्रत्येकजण आपापली निवड बोलत होता. मनुष्यस्वभाव ! दुसरे काय ? मला मात्र त्या विषयात मामासाहेबांनी मुळीच विचारले नाही. परवा चिखलदरा दाखवीत ( ! ) असताना मी एका तलावाचे नाव सक्कर तलाव आहे याचा फायदा घेऊन दुसऱ्या एका तेथल्याच लाल गढूळ डबक्याला ' गूळ तलाव ' ठरवले होते. तो तलावच नव्हता, त्या नावाचा तर मुळीच नव्हता व ' सक्कर ' नावाचा एकमेव तलाव तेथे आहे असा पत्ता लागल्यानंतर मामासाहेब माझ्यावर बरेच चिडले होते. आजही त्या साखर व गूळ तलावांच्या कडू आठवणीमुळे हॉटेलबद्दलचा माझा माहीतगारपणा त्यांनी धुडकावून लावला.

रस्त्यावरच एका झाडाखाली गाडी थांबवली. गाडी असण्याचे जे हजार फायदे आहेत त्यातच एक असा की तिच्यातल्या लोकांना चहा चांगला मिळतो. थोडा बेचव वाटलाच तर खुद्द हॉटेलवाला म्हणतो, " साहेब, तुमच्यासारख्या बड्या लोकांना आम्ही वाईट चहा कसा देणार ? " गाडीतल्या साहेब लोकांनाही ते पटते. मग तोच चहा त्यांना चवदार वाटतो. हाही एक अधिकचा फायदा.

रस्ता अजूनही बराच काटायचा होता. तेव्हा वेळ जावा म्हणून मामा डॉ. पंजाबरावांच्या व शिक्षणसंस्थेच्या आठवणी सांगू लागले. नागपुरे आष्टी हत्या-कांडाच्या घटना बोलू लागले. गडकरी आपले ठाण्याचे—दिल्लीचे जीवन सांगू लागले. आतापर्यंत स्थळे व आपलीच माणसे पाहण्याच्या गडबडीत मी गड-करींना पाहण्याचे विसरूनच गेलो होतो. एक पाहुणा नावाचा पुतळा असेच त्यांना समजलो होतो. जणू काही विदर्भ पाहण्याचा कार्यक्रम माझ्याचसाठी आखला गेला होता. आता या लांब रस्त्याने जाताना नागपूरला पोचेपर्यंत विरंगुळा होता. त्यामुळे विदर्भाऐवजी मी जरा गडकरीत डोकावले. माणूस उमदा होता. संथ चेहऱ्याचा व भरल्या बांध्याचा. कुस्ती-बिरतीचाही शौक त्यांना कधी काळी असणे अगदीच अशक्य नव्हते. वृत्तपत्राच्या सोयीपेक्षा स्वतःच्या भटक्या वृत्तीच्या सोसामुळेच हे गृहस्थ या दौऱ्यात जास्त खुशीने आले होते. वडि-लांच्या छायेतली श्रीमंती, भटकेपणातली दिल्ली वारी, तेथली दर्जेदार नोकरी, मुंबईची ओढ व सध्याची आवडती संपादकी इ. च्या प्लेटिंगने त्यांच्या मनाला व शब्दांना चकाकी आली होती. आम्ही त्यांना आतापर्यंत आमचा प्रदेश, आमचे जीवन दाखवले होते. आता ते खुलले होते. त्यांचे जीवन ( विशेष

म्हणजे त्यांचे जेवण खमंग—मासळ्या, लज्जतदार मट... ) त्यांचा प्रदेश आता ते शब्दांनी आमच्या समोर उभा करीत होते. मीही ते सर्व ऐकण्यात रमलो होतो. तरीही अधूनमधून कारंजाचे अतिशय क्षेत्र ( म्हणजे जैनांचे ), तर कोंडाळीची संत्री याविषयी बोलत होतो.

असे होता होता नागपूरचा नाका आला. नागपूरची घरे व वसती ही नागपूरच्या किती तरी आधीच लागते. मग नागपूरचा नाका आणि नंतर नागपूर. त्या नाक्याच्या समोर रस्ता उडी घेतल्यासारखा वेगाने उतरतो. बाजूच्या डी. लक्ष्मीनारायण इन्स्टिटयूटच्या सुंदर इमारतीकडेही पाहण्याचे त्याला भान राहात नाही. मी माधवरावांना त्या उंचावरच्या उंच इमारतीकडे पाहून सांगितले, " तो डी म्हणजे दिवाण बहाद्दर लक्ष्मीनारायण असाच एक उंच माणूस होता. जन्मभर त्याने मॅंगनीझच्या धंद्यात पैसा कमावला. आधी गरीब होता म्हणतात.

" त्यांच्याबद्दल एकाहून एक दंतकथा आहेत. कोणा नोकरावर सहा आणे की काय ती रक्कम होती म्हणतात तर ती वसूल करण्याबद्दल मृत्यूपूर्वी आवर्जून लिहून ठेवले होते. आणि अशा या माणसाने दरसाल नव्याने लिहिलेल्या मृत्युपत्रात एकवीस लाखांवरची रकम विद्यापीठासाठी कायम निर्धाराने पुन्हा पुन्हा उल्लेखली होती. त्याच रकमेतून आमचे नागपूर विद्यापीठ तयार झाले. "

त्यानंतरची त्या पुरुषाबद्दलची मला असलेली एकमेव माहिती म्हणजे वर्षातून एकदा सर्व कॉलेजांना सुटी मिळते हीच.

त्या नाक्याच्या एका बाजूकडून तेलंखडी तलावाकडचा उतार व गर्द राई दिसत होती. आम्ही वेगळ्या अंगाने निघालो. अंबाझरी या कॉर्पोरेशनच्या लाडक्या तलावाकडे गाडी भरधाव धावत होती. भूक सपाटून लागलेली; पण पाहुण्यांना अंबाझरी दाखवणे हा प्रधान कार्यक्रम.

त्या चढलेल्या दुपारीच्या उग्र उन्हात अंबाझरीकाठची हिरवळ पाहून जरा बरे वाटले. हे तळे संध्याकाळी भेटायला येणारांसाठी फुलझाडांचा श्रृंगार लेवून ऊर-भरल्या आढ्यतेने फतकल मारून बसले होते. काठावरची हिरवी नक्षी त्याच्यात डोकावून झुळकींच्या निमित्ताने माना डोलवीत सुखनिश्वास टाकत होती. पूर्णेची आपुलकी किंवा वर्धेचा ओलावा त्या पाण्यात नसला तरी शहरी जीवांना एक दिलासा मात्र होता. मामासाहेबांनी हेच ठिकाण निवडले याचा

आनंद झाला.

नाही तर काही लोकांचा गैरसमज होऊन ते नागपूरची म्हणून नाग नदी पाहण्याचा बूट काढणेही शक्य आहे. ही नदी ऊर्फ नाला, मी तुपाचा व्यापार करायला या शहरात आलो तेव्हा, माझ्या सोबतच्या चंपतरावांनी ओलांडण्याची चूक केली होती. त्या पाण्याने दिलेली त्यांच्या पायाची खरूज सहा महिने बसली नव्हती. नागपूर म्हणजे विविध गोष्टींची भयानक मिसळ. जितके सुरूप तितकेच कुरूप. आशियात सुंदर व भव्य अशी मेडिकल कॉलेजची इमारत; तेवढाच सुंदर शिवराज लिथो ! आणि तितकाच कुरूप इतवारा. महाविदर्भवादी कोष्टी, पैलवान, बुद्धिमान, कलाकार सर्व नागपूरच. पण हे नागपूर विदर्भांच्या यात्रेत समाविष्ट न करताही केव्हा तरी पाहता येईल व ते नक्कीच पाहीन असा माधवरावांनी दिलासा दिल्यामुळे तेथली प्रेक्षणीय स्थळे व माणसे पाहणे, आम्हांला आवरते घेणे भाग पडले. सध्या खरी गरज होती जेवणाची.

गाडी श्रद्धानंद पेठेत शिरली. समोर पाटी होती— ' श्रद्धानंद अनाथालय '. ऑफिसात जाऊन जरा हाशहुश करतो न करतो तोच श्री. नियोगी आले. श्री भवानीशंकरांचे हे बंधू. त्यांनीच ही संस्था काढली. आता डॉ. पंजाबराव ती चालवताहेत. त्यांच्याशी बोलत बसलो. चहा आला. तो घेऊन श्री. गोळ्यांच्या घरात शिरलो. बाईंनी स्नानाची व्यवस्था केली. सर्वांची आपापल्या आवडीप्रमाणे स्नाने, अर्धस्नाने, मुखस्नाने वगैरे आटोपली. श्री. नियोगी तऱ्हतऱ्हेची माहिती देत होते. तेथे जन्म झालेल्या बालकांच्या मातापितरांची माहिती देण्याचे मात्र त्यांनी कटाक्षाने टाळले. ती एक पवित्र गुप्तता आहे. आईच्या नावावरून मुलांना आडनावे मिळतात. हे मातृसावर्ण्य. परवा गंगाधर गाडगीळांना मी विचारले, " समाजात फ्लर्टिंग वाढत आहे. सेक्सच्या बाबतीत नीती-अनीतीच्या कल्पना बदलत आहेत. हे असेच चालू राहले तर काय होईल ? "

" काय होणार आहे ? "

" अहो, हा मुलगा आपला आहे की नाही याचा संदेह मनात असताना त्याच्या शिक्षणासाठी आपुलकीने पैसा कसा साठवायचा ? त्याचा पापा कसा घ्यायचा ? "

" अंऽऽ. त्यात काय एवढे. समाज बदलत आहे. बायाही आर्थिकदृष्ट्या समर्थ होताहेत. अशावेळी मुलांना निदान आईचा आधार मिळेल. पितृत्व

संशयास्पद असले तरी मातृत्व निश्चित असते ना ! कदाचित या समाजात मातृसावर्ण्य येईल. ”

या संस्थेत आलेल्या मुलांचे बाप भ्याड होते. आया असमर्थ होत्या. त्यामुळे येथे पालनपोषणाच्या बाबतीत पितृसावर्ण्य अथवा मातृसावर्ण्य यांपैकी काहीही नव्हते. संस्थासावर्ण्य. कदाचित पुढे समाजरचनेत राष्ट्रसावर्ण्य येईल.

नियोगींच्या सोबत संस्था बघायला निघायचे होते. आमचे जुने मित्र महेश जोशी तेथे कर्मचारी होते. आमच्यासोबत जाण्यासाठी त्यांनी पत्नीला निरोप पाठवला. आमच्यापैकी एकाचे नावही त्यांनी त्यात कळवले. सौ. जोशी इथल्या वॉर्डन. त्यांनी निरोप ऐकला. पतिराजांनी कळवलेले पाहुण्यांपैकी एकाचे नावही ऐकले. त्यांनी उत्तरादाखल निरोप पाठवला, “ मी येत नाही. त्या तमक्या मेल्याचे मला तोंडही बघायचे नाही. ”

आम्ही चाटच पडलो. आमच्यापैकीचा तो माणूस इतका प्रसिद्ध असेल याची कल्पनाच नव्हती. जोशीसाहेब तर अक्षरशः गांगरून गेले. ते स्वतः आत गेले. थोड्याच वेळाने ते धावतच सौ. ला घेऊन बाहेर आले. बाई बिचाऱ्या भयंकर ओशाळल्या होत्या. त्या तमक्या गृहस्थाची पुन्हापुन्हा क्षमा मागत होत्या. काय घोटाळा झाला ते नंतर लक्षात आले. नेमका त्याच नावाचा एक गृहस्थ या भागात नावारूपास आला होता. एकट्यादुकट्या स्त्रीला त्याच्यासमोरून रस्त्यावरून जाणे दुरापास्त होते. त्याच नावाचा एक सभ्य गृहस्थही असू शकेल अशी त्यांना खात्री नव्हती. त्यामुळेच भ्रमनिरास झाला तेव्हा त्या खूपच दुःख करू लागल्या. वास्तविक हा विनोदी योगायोग आहे व त्याचा शेवटही गोड झाल्यामुळे या प्रसंगी हासण्यास भरपूर वाव आहे, हे आम्ही जोशी वहिनींना समजावून सांगितले. पण त्याप्रसंगी आमचे काही एक न ऐकता त्या शोक करू लागल्या. शेवटी एकदाचे मन आवरून त्यांनी आम्हांला संस्था दाखवायला नेले.

पहिल्या दाराच्या पायऱ्यांजवळ काही दहाबारातल्या मुली हासत-खिदळत बसल्या होत्या. मी देवाचे मनोमन आभार मानले. सामाजिक अप्रतिष्ठा, निराधारपणा हे त्यांच्या वाट्याला आले होते. आईवडलांचा ओलावा त्यांना ऐकूनही माहीत नव्हता. रुस्तुम व सोहराब हे पितापुत्र एकमेकांना शोधत होते या प्रसंगाचेच केवढे मोठे नाट्य झाले ! येथे तेही नव्हते. या बालकांना आधार होता एका महान अज्ञानाचा. जगात ज्याने अज्ञान आणले असेल त्या देवाचे

मी पुन्हा आभार मानले. मुले सुंदर होती. सुंदर आयांवर कोणा पशूंचे हात पडले असतील, त्यातून हे उपेक्षित जीवन जन्माला आले.

जरा आत गेलो तो डाव्या अंगाच्या दालनात गावातल्या मुलांसाठी एक वर्ग चालला होता. त्याचे उत्पन्न, देणग्या इ.तून या मुलांचे पोषण होते. तान्ह्या जीवांच्या विभागात आम्ही शिरलो. जरा स्वावलंबी झालेली वर्ष दीड वर्षांची सहासात मुले लहान लहान चटयांवर बसलेली होती. काहीतरी करायचे म्हणून एकसुराने रडत होती. एका दोघांनी तेथेच देहधर्म केले. त्या सर्वांवर नजर ठेवणाऱ्या बाईची ते आवरता सावरता खूप धांदल उडाली होती. एकाच मुलाच्या आईला कसे नकोनकोसे होते. येथे तर संस्थाच खरी लेकुरवाळी.

नवजात बालके एका दालनात पाळण्यापाळण्यातून झोपलेली, पहुडलेली होती. कुत्र्याची डोळे मिटलेली पिले असावी तशी ! या संस्थेने त्यांना गर्भात मरण्याची मनाई केली होती. कुठल्यातरी आईबापांनी त्यांना जन्माला येण्याची सक्ती केली होती, आता ते निरागस डोळे उघडणार होते. वर्ष-सहा महिन्यांनी त्या डोळ्यांत या जगाची पावले उमटणार होती. त्या अपमान करणाऱ्या, तुच्छतेने हसणाऱ्या जगाकडे पाहण्याची त्यांना सक्ती होणार होती. आपण जन्माला घातलेली मुले सध्या कशी असतील, त्यांना दूध पाजले जात असेल का ? हे प्रश्न समाजात लपलेल्या त्यांच्या आईबापांच्या मनांत येत असतील का ? रसराज शृंगाराचा हा दोष की आजच्या समाजव्यवस्थेचा !

त्या तान्ह्यांच्या वार्डात एक नुकतीच उगवलेली मुलगी माझ्याकडे पाहून हसायला लागली. कुठले तरी अदृश्य यंत्र त्या मुलीला हासवीत होते. असहायता, अज्ञान यांचे दुःख हासण्याच्या माध्यमातून प्रगट होते तेव्हा ते अतिशय भयंकर वाटते. मीही माझे दुःख हासण्यातूनच प्रगट केले, Our sincerest Lauahters with some pain is fraught ! छे, ती मुलगी हसली नसती तर फार बरे झाले असते.

या मुलांचे भवितव्य ? कशीबशी जगतात. शाळेत जातात. एखादे दिवशी कुणी येतो. एखादे मूल पाळायला घेऊन जातो. गोंडस आणि चुणचुणीत मुलांना हे भाग्य जास्त लाभते. काही मुलांनी मात्र अवैधपणे जन्माला येण्याबरोबरच कुरूप व वेंधळे होण्याचाही गुन्हा केलेला असतो. भोजनगृहालगतच्या दालनात एकेका मुलीला एकेक जागा नेमून दिली आहे. या भयाण जगातला एक

लहानसा तुकडा त्यांच्या वाट्याला आला. त्या क्षुद्र तुकड्यावरच त्यांनी किती आपुलकी ओतावी ! कोण्या मुलीने तेथे गणपतीचे चित्र लावून ठेवले होते. कोणी आणखी असलेच काही. परत येताना व्हरांड्यातील भिंतीवर फोटो लावले होते. काही मुलामुलींची लग्ने झाली, कोणाला नोकरी लागली, त्याचे प्रसंग त्यात होते. नियोगीजी एकेका मुलाचे कर्तृत्व सांगत होते. कोणाला म्हणे नोकरी लागली. दीडशे रुपयांची नोकरी हेही त्यांना कौतुक होते.

संस्था पाहून परत आलो. ऑफिसच्या समोर उन्हात खुर्च्या टाकून बसलो. नजीकच्या शाळेतून दोघी मुलींना बोलावण्यात आले. त्यातली एक आठ नऊ वर्षांची गोंडस मुलगी रूपा. हिच्यावर संस्थेतल्या सर्वांचे प्रेम. ती जयपूरच्या कलेक्टरांना भारत-पाकिस्तान सीमेवर तान्हेपणी सापडली. तिच्यासोबतच आणखीही एक होती. गुंडांनी तिच्या आई-वडलांना मारले होते व या मुलींना चिखलात फेकून दिले होते. गळ्यापर्यंत ती बालके गाळात रुतली होती. डॉ. पंजाबराव केंद्रमंत्री असताना जयपूरला गेले. तेथल्या अधिकाऱ्यांनी त्या मुली त्यांना दाखवल्या. पोरी रूपवान होत्या. थोरामोठ्यांच्या घरचे बाळसे ल्यायल्या होत्या. पंजाबरावांनी त्यांना येथे आणले. रूपा जरा तोतरी बोलते. पण शाळेत खूप हुशार आहे.

पंजाबराव का मोठे हे कोणी विचारले तर आता त्यांचे शाळा-कॉलेजांचे वैभव हे कारण सांगता येणार नाही. या संस्थेकडे बोट दाखवावे लागेल.

आम्ही धनवटे नॅशनल कॉलेज पाहायला निघालो तेव्हा नियोगीजींनी विचारले, " जेवण किती वाजता घेणार ? "

खरेच, जेवायचे आम्ही अजिबात विसरलो होतो. पण त्या संस्थेत जेवण घेणे आम्हांला शक्य नव्हते. आम्ही बाहेरच जेवण्याचे ठरवले. नियोगींची निराशा केली. संस्था सोडल्यावर, बाहेरच्या जगात, जरा सुटल्यासारखे वाटले. दुःखाने दुःखी होण्याचा मानवी स्वभाव आहे खरा. पण अंतर्मन ते दुःख फार वेळ सहन करायला राजी नसते. बाहेरच्या नागपूर शहरात, आम्हांला पुन्हा नेहमीची माणसे बनवण्याची ताकद होती. अनाथालयाच्या व्यथेची तीव्रताच एवढी भयानक होती की तेवढे दुःख आमचे मन फार वेळ सहन करूच शकत नव्हते.

रस्त्याने ती संस्था विसरण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आम्ही नॅशनल

कॉलेजबद्दल बोलत होतो. आज त्या कॉलेजला दृष्ट लागावी अशी इमारत होती. सायन्सची उपकरणे, फर्निचर इ. ची सुबत्ता होती. मुलांची संख्या तर नागपुरात पहिल्या नंबरची. आणि याच संस्थेचे एक प्राचार्य काही वर्षांपूर्वी अमरावतीस शिवाजी संस्थेच्या चालकांना भेटायला आले होते. रात्र पडली होती. पावसाने त्यांचे कपडे ओले झाले होते. प्राध्यापकांना अनेक महिन्यांत पगार झाला नाही. कॉलेजात मुले नाहीत. ही संस्था कसेही करून तुम्ही ताब्यात घ्या. अशी विनंती ते करीत होते. एवढा मोठा माणूस पण पैशाच्या अडचणींनी असा खचला होता. शरण आलेल्याला परत पाठवण्याचा विचारही कोणी केला नाही. आज ते कॉलेज या पदाला आले होते. आम्ही त्या भव्य इमारतीकडे डोळे भरून पाहिले. माधवराव त्या इमारतीत फिरायला लागले तेव्हा मी तेथल्या प्राध्यापक मित्रांशी गप्पा करीत कँटीनमध्ये बसलो.

दिवस आता मावळायला आला होता. अजून नागपूर पाहणे सुरूही झाले नव्हते. पण नागपूर पाहायचे नाही हेच ठरले होते. ते केव्हाही पाहता येणार होते. असेंब्लीत माधवरावांना आपल्या पत्राच्या प्रतिनिधीशी भेटायचे होते. चार दिवसांनंतर त्यांना स्वतःची माणसे, स्वतःचे जग लाभणार होते. त्यामुळे ते खुशीत आणि at home दिसत होते. रस्त्यात मेडिकल कॉलेजच्या इमारतीस एक वळसा घातला. आत जाण्याइतका वेळ नव्हता. चिखलदऱ्याचा किल्ला पाहताना जे तत्वज्ञान उपयोगी पडले तेच येथेही धावून आले.

माधवराव असेंब्लीत पोतदारांना भेटेपर्यंत मी मॉरिस कॉलेजात गेलो. डॉ. देशमुखांची पाटी प्राचार्यांच्या बंगल्यावर पाहून खूप अभिमान वाटला. मला मराठी शिकवणारे आवडते प्राध्यापक इतके मोठे झाले होते! त्यांच्याकडे बसलो. खूप दिवसांनी भेटत होतो. गप्पा झाल्या. त्यांना दृश्ये पाहताना वापरलेली चिखलदरा पद्धती सांगितली. या नव्या मेथडबद्दल मला डॉक्टरेट का देण्यात येऊ नये असा नम्र प्रश्न मी केला. त्यावर ते म्हणाले, "दृश्ये पाहताना जशी दृश्यांची गरज नाही तशी ती पाहणाऱ्या या प्रवासात तुझी तरी गरज त्यांना का वाटावी? तू जन्माला आला नव्हतास तेव्हाही त्यांचे पत्र चालू होते. आता तू असं कर—त्यांना दे सोडून येथूनच. इतक्या दिवसांनी आल्यासारखा काही दिवस येथेच राहा. ही नवी गाडी बघितलीस?"

अर्थात हे मान्य करणे ठीक नव्हते. सौ. देशमुखांना सारे जगच बदलल्याचा

प्रत्यय आला. त्या मला 'जेव' म्हणाल्या तेव्हा मला भूक नसल्याचे त्यांना सांगितले. 'तुम्ही आणि भूक नाही! अहो, अहो, हे बघा हे मी काय ऐकते आहे...' डॉ. देशमुखांनीही बाईंच्या त्या आश्चर्यात भाग घेतला असता; तेवढ्यात आमची वारकरी मंडळी मला शोधत तेथे आली. प्रवासात माझा बराच उपयोग होतो हे डॉ. देशमुखांना स्वतः गडकरींनीच सांगितल्यामुळे त्यांनी मग मला तेथेच थांबायचा उपदेश केला नाही. त्यानंतर विदर्भ साहित्य संमेलनाचे यंदाचे अध्यक्ष बापूसाहेब चोरघडे, पुसदहून नुकतेच आलेले प्रा. ऊर्ध्वरेषे इ. शी आम्ही गप्पा केल्या. त्या गप्पांमधून एक निष्पन्न झाले की आमच्या पुढच्या दौऱ्यातले नियोजित पुसद वगळायला काहीही हरकत नाही.

सर्वांचा निरोप घेऊन आता वर्धेला झोपायला जायचे ठरले. आज संपूर्ण दिवसभरात राहून गेलेला खाण्याचा कार्यक्रम आता जोरजोराने हाका मारू लागला. श्री. पोतदारांना मदतीला घेऊन मी माझी हॉटेलविषयक माहिती पुढे मांडली. चांगले हॉटेल निवडण्याचा मला पुरेपूर हक्क होता. मघा अनायासे खायला मिळत असताना आणि समोर सौ. देशमुखांच्या ताटातून खमंग रंगांचे आमंत्रण येत असतांना मी चक्क नकार दिला होता. हे सर्व काय मी एखाद्या क्षुद्र हॉटेलात जाण्यासाठी केले होते? माझी माहिती व मते पोतदारांना पटत होती. कितीही झाले तरी एका रिलायेबल पत्राचे ते प्रतिनिधी होते. त्यांच्यावर अविश्वास कोण करणार? गतवर्षी त्रिं. गो. मेयर झाले त्याबद्दल मी त्यांना खायला मागितले होते. ते मोतीमहाल की कसले तरी हॉटेल माझ्या आठवणीत पक्के होते. पुन्हा त्याच हॉटेलात जायचा योग आला नव्हता. त्रिं. गो. नी मेयर होण्याच्या आनंदात एकदा पार्टी दिली होती. आता ती कटकट मागची सुटल्याच्या आनंदात त्यांनी डबल पार्टीही दिली असती; पण त्यांच्या घरी दोनदा वाजवूनही फोनवर उत्तर नव्हते. 'मोती महाल' मध्ये मिळणाऱ्या असंख्य जाती व त्यांचा स्वाद यावर आमची वर्णने मामासाहेब तिऱ्हाईतपणे ऐकून घेत होते. त्यांना त्या दिवशी एकादशी होती. मटनात कांदे वगैरे एकादशी बाटवणाऱ्या वस्तू घालू देणार नाही असे त्यांना आश्वासन आम्ही देणार होतो. पण त्याची आवश्यकता पडली नाही. त्यांनी थेट मोतीमहालासमोर कार उभी केली.

इतक्या साऱ्या दिवसांत दादाचे तोंड पहिल्यांदा येवढ्या मोकळेपणाने उघडले. तो त्या उघड्या तोंडाचा फायदा घेऊन चमचोक्त पदार्थ चापू लागला.

आजच्या जेवणात कसूर म्हणून करायचा नाही असे सर्वानुमते ठरले. मामासाहेबांसाठी फ्रुटसलाड नावाचे इंग्रजी शिकरण वाढायला लावले. चांगल्या खवय्यांबद्दल वेटर लोकांना एक विशेष प्रकारचा आदर असतो. आज तो आमच्यापैकी प्रत्येकाच्याच वाट्याला आला. समोरच्या मेनूतून पदार्थ मागणे मला जमत नव्हते. उच्चारात स्पेलिंगमिस्टेक होत होत्या. माधवराव हे मुंबईकर खवय्ये माझ्या मदतीस धावून येत होते व पदार्थ मागवले जात होते. आपल्यापेक्षा माधवरावांना अधिक पदार्थांची नावे माहीत आहेत हे मला प्रशस्त वाटले नाही. मोती स्पेशल या बिर्याणीच्या कुटुंबातील एका पदार्थाचा फन्ना उडवीत असताना मी त्यांना विचारले, " माझी पाकशास्त्रातली प्रगती तुम्हांला माहीत नसेल. मी नेहमी करीत असलेल्या एका पदार्थाचे नाव तर तुम्ही अजून ऐकलेलेही नाही. "

" ? "

" शिपोची हे त्या पदार्थाचे नाव. "

" ! "

मामासाहेब हासू लागले. त्यांना तो पदार्थ माहीत होता. दुसरा एक होता ' कां का टो कुम् '. पहिला जरा जपानी नावासारखा साऊंड होतो असे माधवरावांना वाटले. कांकाटोकुम् हा आफ्रिकन वाटायला हरकत नव्हती.

शेवटी माधवरावांच्या मदतीला आमच्यापैकी एकजण धावून आला. " शिपोची म्हणजे शिळ्या पोळयांचा चिवडा. आणि कांकाटोकुम् म्हणजे कांदा, काकडी, टोमाटो, फुटाणे व मुरमुरे यांची भेळ ! "

भोजनोत्तर अर्धशत रौप्यमुद्रांचे दान हॉटेलवाल्यास करून आम्ही पोतदारांचा निरोप घेतला. मामासाहेबांनी आपली एकादशी गोळयांकडे सोडण्याचे ठरविले होते. त्या श्रद्धानंद अनाथाश्रमात पुन्हा एकदा जावे अशी आमचीही इच्छा होतीच. आम्ही पुन्हा तेथे गेलो. मामासाहेबांचा फराळ आटोपेपर्यंत मला इतर गोष्टीत अडकवून ठेवणे सौ. जोशींना भाग होते. खरे म्हणजे आता पुन्हा फराळ करण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती. तरीही महेश व वहिनी यांनी मला एका बंद खोलीत बसवले. इकडच्यातिकडच्या गप्पांनंतर त्यांना मी विचारले, " वहिनी, या तरुण वयात तुम्ही या जनसेवेकडे कशाला वळलात ? महेशांना तर दिल्लीत चांगली ' कार 'वाली नोकरी होती ! "

"अहो, या व्यथेसाठी काही करण्याला म्हाताऱ्या वयाची वाट कशाला बघायची ?"

वातावरण गंभीर झाले असते. पण त्या दुःखी जगातल्या निरागस बालकांनीच आम्हांला तसे करायला मज्जाव केला. एकेकजण हळूहळू गोळा झाले. वहिनींनी मग त्यांना आमच्या समोर गायला, नाचायला व वाद्ये वाजवायला दुजोरा दिला. गाणी ऐन रंगात आली तसा फराळ आटोपून मामासाहेबांचाही पाय तेथे पडला. गाडी तयार होती. निघताना मी आतल्या डोळ्यांनी मघाच्या त्या हासणाऱ्या अर्भकाकडे पाहात होतो. हात खिशात काहीतरी चाचपू लागले. दहा रुपयां-पर्यंतची चिल्लर होती. वहिनींच्या हाती ठेवीत मी म्हटले, "पोरांना काही द्या."

"काय देऊ ?"

"ते तुम्हीच जास्त व्यवस्थितपणे ठरवाल, मी काय, असा अचानक आलेला."

गाडी सुरू झाली. वर्ध्याकडे देह जात होता. मन नागपुरात रेंगाळत होते. खूप बघायचे व दाखवायचे राहले होते. नुसत्या काठीने बंदुकीच्या तेरा गोळ्या झेलणारा व पोलिसांच्या वेढ्यातून निसटणारा देशभक्त राजे उदाराम याचे घर पाहुण्यांना दाखवावयाचे राहून गेले होते. काशीबाईंचे लहानसे पडके देऊळ वास्तुशास्त्राचे नवल आहे म्हणे. अमेरिकन इंजिनीयर त्याच्या बांधणीचा अभ्यास करून गेले असे कोणी तरी सांगितले होते, मी ते देऊळ खूपदा पाहले; पण जुन्या व पडक्या इमारतीपार मला त्यात काहीच दिसले नव्हते. माधवराव नागपूर पुन्हा कधी तरी पाहणारच होते. आमची ओढ होती वर्ध्याची. तेथे झोप मिळणार होती.

## पाचवा दिवस

वर्धेला रात्री एकाएकी मी उठून उभा झालो. अमरावतीच्या समर्थ हाय-स्कूलचा लेले मास्तरांचा तास चुकवून मागच्या बाजूच्या स्मशानाच्या रानाकडे पळालो. माणीक तेथे चिंचा पाडीत होता. त्याच्यासारखा मीही मग झाडावर चढलो. पण उंच चढल्यानंतर खाली पाहले तेव्हा एकदम भोवळ आली. माणीकने मला वरच्यावर धरले. पुन्हा कधी चढू नकोस म्हणून दाटले. आपल्या

हातावर झेलीत त्याने मला खाली आणले. त्याच्या हाताची उशी करून मी खूप वेळपर्यंत पडून राहलो. जरा वेळाने त्याने मला शिव्या देत देत हाका मारायला सुरुवात केली, "अबे ऊठ. इतका वेळ झोपत असतात काय ?"

मी डोळे चोळून समोर पाहले. समोर माणीकराव होता. "तू इकडे कोठे ?"

"मी या वर्ध्यालाच असतो. याच शाळेत मास्तर आहे." माणीकराव समर्थ हायस्कुलात असल्यावेळेपासून आजवर जोचा तोच होता.

रात्री मी कधी येथे आलो. या शाळेत कसा झोपलो वगैरे मग हळूहळू आठवू लागले. श्री. साळवे यांनी मामासाहेबांच्या निरोपासोबतच आमच्यासाठी गाद्या पाठवल्या होत्या. त्यावर आम्ही असे हाका मारीस्तो झोपलो होतो. मग गावात साळव्यांकडे जाऊन स्नाने झाली. फोडणीचा हुरडा व चहा झाला. ऊन्ह कोवळे असे तो पवनारला पोहोचलो. धाम नदीवरचा पूल ओलांडून विनोबांच्या आश्रमासमोर गाडी उभी झाली. नागपूर सडकेच्या बाजूच्या झोपडीत दोघातिघांची वर्दळ दिसली. तिच्याच ऊन्ह-भरल्या पडवीत विनोबा खाटेवर पहुडले होते. मालीश चालू असावी.

श्री. कर्णिकांनी मुंबईहून पत्र पाठवून या भेटीची व्यवस्था ठरवली होती. विनोबांकडे पाच सहा प्रश्नही पाठवण्यात आले होते. आम्ही तेथल्या एका गृहस्थाला हा सर्व संदर्भ सांगितला. अर्धाएक तासापूर्वीच विनोबांना फिट आली होती. त्यामुळेच ते असे स्वस्थ पडले होते. या पाचदहा मिनिटांत मात्र ते ताजेतवाने होऊन आमच्याशी भेटण्याच्या अवस्थेत येणार होते, थोड्या वेळाने एका गृहस्थाने आम्हांला खूण केली. तसे मग आम्ही त्यांच्या चौपायीभवती गोळा झालो. त्यांना ऐकायला अजिबात येत नव्हते. बोलतही नव्हते. त्यांनी आमच्याकडे नुसते पाहिले. आमचे साफल्य झाले. पाय, कान व जीभ ही तीन महत्वाची इंद्रिये त्यांनी बंद ठेवली होती तरीही विनोबा नावाची महान शक्ती तेथे उरलेली होती. सर्व सेवामुक्त इंद्रियांचे कार्य नुसते डोळे करीत होते. आंधळयाला स्पर्शज्ञानाचे बळ असते. कोठलेही एक इंद्रिय बधीर झाले तर त्याची उणीव इतर इंद्रिये भरून काढतात अशा अर्थाचा एक लेख मी पूर्वी रीडर्स डायजेस्टमध्ये वाचला होता. त्याच्याशी हे कार्यशील डोळे जुळत होते. बोलण्याचे, गतिमान होण्याचे बळ देण्याचे व ऐकण्याचेही काम ते डोळे करीत

होते. गीता-प्रवचनात त्यांनी कर्म, विकर्म व अकर्म असे प्रकार समजावून देताना अकर्माच्या संदर्भात एक सुंदर दृष्टांत दिला आहे. सर्व कार्य करून थकलेला वृद्ध पिता एक दिवस अंथरुणावर पडतो व स्वतः काही न करता पोराच्या पाठीवर हात फिरवून त्याला चैतन्य देतो. त्या आशीर्वादाने पोराला सर्व बळ मिळते. सारा देश फिरून व जागवून आता थकून पडलेला त्यांचा गतिमान देह त्या अकर्मी बापासारखा वाटत होता. 'केल्याने वा न केल्याने त्यास भावार्थ सारखा। कोणामध्ये कुठे त्याचा न काही लोभ गुंतला ॥' असे त्या देहातून गीताई बोलत होती. कोणत्या का निमित्ताने होईना; पण ही मूर्तिमंत गती आपल्या घरी परतली होती. आश्रम टवटवीत दिसत होता. परवा मी येथे आलो होतो; त्याला आता चौदाच्या वर वर्षे लोटली. त्यावेळी रामनवमीनिमित्त विनोबांनी भरतभेटीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली होती. त्यानंतर त्यांनी भूदानाची देशफेरी चालवली. कित्येक वर्षांनंतर आज या झोपडीत ती दिसत होती. पूर्वी ते वापरत तो बंगला आता प्रकाशन विभागाने ताब्यात घेतला होता. त्या बंगल्याच्या मुख्य दालनात बैठ्या, छोट्या टेबलासमोर फळीला पाठ टेकून बसलेले विनोबा मी माझ्या मनात जपून ठेवले आहेत. त्या चित्रात ते नुकतेच सुरगावाहून ग्रामसफाई करून आलेले आहेत. थोडा वेळ लेखन चालते. आल्यागेल्यांशी चर्चा होते. मग काहीतरी वाचीत बसतात. खूप ताजेतवाने विनोबा ! आजचे विनोबा मात्र वाळलेले, इंधन झालेले आणि खाटेवर पहुडलेले. माधवरावांशी ते वहीतून बोलले. ती वही आमच्याजवळ राहणार नव्हती. मी त्या अक्षरांचा फोटो घेतला. 'मौन ही एक प्रकाशन-शक्ती आहे' असे एक ओजस्वी वाक्य विनोबांच्या हस्ताक्षरात बोलत होते. विनोबांइतकाच विनोबांचा आश्रमही पाहण्यासारखा आहे. नदीचा काठ साधून या बाजूच्या उभार थरावर एक सुंदर बंगला व त्याच्याशी सगेपणाने शोभणाऱ्या सुंदर झोपड्या. बंगल्यामागे एक प्रेमळ बाग आहे. फुले, फळे कशालाच काही तोटा नाही. त्यातल्या रस्त्यांना सुंदर व आध्यात्मिक नावे दिली आहेत. कृत्रिम अंतराळाची गंमत दाखवतात तसा हा आश्रम पूर्वीच्या मुनींच्या काळाचा निसर्ग, समृद्धी व पावित्र्य यांचे एक प्रतिचित्र आहे. विनोबांशी बोलून आम्ही त्या झोपडीसमोरच्या घडीवर थोडसे टेकलो. विनोबा पडवीतून आत येऊन अस्वस्थपणे फेऱ्या घालू लागले. मौन तोडून काही शब्द उच्चारू लागले. मी घाबरलो. कसल्यातरी विझविझचा तर हा अंतिम

फडफडाट नव्हे ना ? ही शारीरिक अस्वस्थता अशी मानसिक अशांततेत कां परिणत व्हावी ? नेहरूंना नेणारे ६४ साल यांच्यावरही तर टपले नाही ना ! कावराबावरा होऊन मी सभोवार पाहू लागलो. समोर गांधींची रक्षा विसर्जली ते स्थळ चौथऱ्याच्या रूपाने उभे होते. एका महान मरणाच्या आठवणींचे उद्दीपन ते स्थळ देऊ लागले तसातसा मी दुःशंकेने अधिकाधिक अस्वस्थ झालो; पण तेथल्या निसर्गात, वातावरणात कुठल्याही नाशाची चाहूल नव्हती. वारा स्थिर वाहात होता. फुले, फळे संकटाचा इशारा ऐकल्यासारखी वाटत नव्हती. जर काही होणार असेल तर त्याचा आगाऊ परिणाम या वातावरणावर व्हायलाच हवा होता. तो झाला नाही म्हणून मलाही ढिवसा आला. कोणी वेडे म्हणो; पण महान घटना पुढे घडणार असतील तर अवतीभवतीच्या वस्तू आपल्या चेहऱ्यांनी त्याचे इशारे देतात अशी माझी श्रद्धा आहे.

जरा वेळाने विनोबा पुन्हा त्या खोलीत शांतपणे बसले. आमचा दबलेला श्वास पुन्हा सुरळीत झाला. कमाल वाटली भवतीच्या सर्व मंडळींची. कुठल्याही वादळात मनावरचा ताबा सुटू न देण्याची त्या सर्वांना शिकवण मिळाली होती. कोणाच्याही तोंडावर त्यावेळी घाबरल्याची छटा नव्हती. तेवढ्यात एक आश्रम-कन्या आली. भरतरामाचे देऊळ व विनोबांची झोपडी यांच्यामध्ये तिने एक मोठे जलपात्र ठेवले. देवळाच्या मागच्या भिंतीत गंगेची मूर्ती जडवली आहे. तिला ती सगान अवगाहू लागली. नाव माहीत नसलेले, एखादी अनोळखी पण सुंदर फुलांची माळ असावी तसे, तिचे गीत रंगीत व सुगंधी होते. ती बंगाली गीत म्हणत म्हणत गंगेला न्हाणत होती. विनोबांची नुकतीच ओसरलेली ती अवस्था विसरून मी त्या गंगास्नानाकडे बघू लागलो. मुलगी स्वतः गुजराती आहे असे कळले. ती आंतरभारती !

बहुभाषी विनोबा, कवी विनोबा, तत्त्वचिंतक, गतिमान विनोबा त्या उत्साही कार्यकर्त्यांमधून एकेका पैलूंनी जगत होते. आम्ही त्यांच्या झोपडीसमोर नत-मस्तक होऊन पायऱ्या उतरू लागलो. वरच्या बंगल्याच्या या बाजूच्या आंगणात मी रामकृष्ण–आश्रमाची प्रार्थना म्हटली होती व तेथेच रात्रभर झोपलो होतो. तेथेच विनोबांनी नानकांची एक आरती आम्हांला म्हणून दाखवली होती. 'स्थितप्रज्ञ–दर्शन' या पुस्तकाचा काही भाग वाचून दाखवला होता. एखादा जवळचा नातेवाईक दाखवावा तसे मी ते आंगण सर्वांना दाखवले. खाली उतरू

लागलो. या टेकडीच्या उत्खननात विनोबांना तऱ्हतऱ्हेच्या मूर्ती सापडल्या होत्या. देवळाच्या सभोवतालची भिंत त्या मूर्तींनी शोभत होती. एक म्हातारे पण चड्डीमुळे आणि चेहऱ्यावरील बालकभावामुळे आपलेच कोणी सवंगडी वाटणारे गृहस्थ रस्त्यात भेटले. त्यांनी आम्हांला ती सर्व चित्रे समजावून दिली. भरतभेटीची मूर्तीही दार उघडून दाखवली. ते विनोबांचे बालमित्र बाबाजी मोघे ! त्यांची आणि विनोबांची मैत्री म्हणजे अर्धशत वर्षांची. खूप अंधार, खूप उजेड यात सावलीही टिकत नाही. पण हा मित्र टिकला होता. त्यांनी आमची ती सद्गदित स्तुती निर्विकारपणे ऐकली व विषय बदलल्यासारखे करून ते म्हणाले, प्रकाशन विभागाच्या आंगणात विनोबांचे बंधू आहेत. त्यांची भेट घ्या ना. मग त्या स्तुतीतून स्वतःला सोडवत ते हळूच सटकले.

विनोबांचे बंधू बाळकोबा तेथे उन्हात बसले होते. विनोबांच्या प्रकृतीबद्दल आश्रमीय संयम या सहोदराला जमत होता काय ? ते अधीरतेने मामासाहेबांना म्हणाले, " तुम्ही डॉक्टर आहात; त्यांना हे असे काय होत आहे ते सांगा ना. काही उपाय सुचवा ना... "

आम्ही न बोलता ते आश्रमीय सौंदर्य व त्यातली ती मूक व्यथा ओल्या डोळ्यांनी गिळली व गाडी सुरू केली.

नागपुरे व मधुकर गव्हाणे ही मंडळी आमच्यातून गळली होती. माधवराव, मामा, दादा व मी असे चारच जण आता कारमध्ये होतो. पवनार सेवाग्राम दाखवण्यापुरते श्री. साळवे सोबत होते. वऱ्हाडात नाते फार पक्के असते; मामा-साहेबांचे त्याही गावात नव्हते; म्हणून माणिकराव साळव्यांवर आमच्या पाहुण-चाराची सर्व जबाबदारी पडली होती. त्यांनी आम्हांला सेवाग्रामच्या आश्रमात नेले.

पूर्वी पाहलेलाच हा सेवाग्राम. तेथे प्रार्थनेचे आंगण उदास, शांत चेहऱ्याने आमचे स्वागत करीत होते. बापूंची झोपडी, ' बा 'ची कुटी जसेच्या तसे होते. भंसाळी काका तिकडे दुसरा आश्रम स्थापून दूर राहतातसे समजले. ते नव्हते म्हणून त्यांची अंगणातली चटई नव्हती. आणि म्हणूनच त्यांच्या अंगावर लोळणारी मुलेही नव्हती. त्यांच्या तोंडच्या परीकथा, त्यांचे दचकल्यासारखे बोलणे हेही त्यांच्या सोबत गेले होते. चिमणलालाचे स्नान चालू होते. मजुरांना झाडाखाली लावलेल्या रईचे ताक वाटणारे व Times सरळ हिंदीत वाचून

दाखवणारे चंद्रप्रकाशही नव्हते. सारी पाखरे उडून गेली होती. आश्रमाने आमचे सांत्वन करायचे की आम्ही आश्रमाचे ?

आम्ही वर्ध्याला परत आलो. गोपुरी, महिलाश्रम इ. संस्था फक्त दुरून पाहल्या. श्री. साळ्यांना निरोप देऊन यवतमाळचा रस्ता धरला.

आश्रम पाहण्याच्या गडबडीत जेवणाची वेळ टळून गेली होती. यवतमाळच्या शिवाजी शाळेत मग जरासा चहाफराळ झाला. हारतुरे सभा इ. पार पडले. जवाहरलाल दर्डांच्या मुनिमांनीही आतिथ्य केले. सौ. दर्डा द्राक्षांच्या मळयात भेटल्या. आमच्या गाववाल्याची मुलगी येथे दिली होती. सोयऱ्यांना न भेटता गेलो तर पंचाईत. गावच एखाद्या गावाचे सोयरे इकडे बनते. पण घाईमुळे कोणालाच न भेटण्याचे ठरले. लोकनायक अणे, इतिहासाभ्यासक य. खु. देशपांडे, कादंबरीकार टोंगो, कवी ना. ना. हूड आणि लोकवाङ्मयकार गोरे इ. सर्वांचे हे गाव. कोणालाही न भेटता निघणे भाग होते. सौ. दर्डांनी बगिच्यातली गुलाब-पुष्पे दिली. आपल्या नेहमीच्या फुलाच्या एवढी तर त्यांची एकेक कळीच होती.

गाडी एकदम दारव्हा येथे थांबली. एक लाऊडस्पीकर क्रीडा महोत्सवाच्या सूचना देत होता. शिवाजी शाळेच्या भव्य पटांगणात एकाच वेळी दोनतीन सामने चालले होते. ही गर्दी ! या भागात अत्यंत नावाजलेल्या दोन चमू कबड्डी खेळणार होत्या. मामासाहेब हेडमास्तरांशी शाळेच्या कामकाजाबद्दल बोलत बसले तोवर आम्ही त्या प्रसिद्ध चमूंचा सामना पाहण्याचे ठरवले. समोरच्या रांगेत आमच्यासाठी दोन खुर्च्या टाकण्यात आल्या. शिटीच्या इशाऱ्याने खेळ सुरू झाला. एका बाजूचा एक मुलगा शाळेला निघाल्यासारखा रमतगमत दुसऱ्या पाटीत गेला. आपल्या रमण्यागमण्यातून जराशी सवड काढून तोंडाने हु तू तू तू तू करू लागला. हा तेथे कशासाठी आला ते आम्हांला समजेना. त्यालाही त्याचा विसर पडला असावा. त्या पाटीतले लोक त्याचे स्वागतही करीत नव्हते व त्याला पकडतही नव्हते. तो आपल्या घरी आलाच नाही, अशा उदासीनतेने त्याच्याशी वागत होते. तोही त्यामुळे चिडून न जाता, तेथे शांतपणे फेऱ्या मारीत होता व गाणे म्हणावे तसे तू तू तू तू करीत होता. त्याची लहर लागली तेव्हा तो त्याच सहज चालीने परत आला. मग परत—भेट म्हणून तिकडच्या पाटीतला एकजण यांच्याकडे आला. तू तू ऐवजी त्याने काही वेळ कबड्डी कबड्डी केले. तो पुढे झाला म्हणजे हे मागे होत. तो मागे वळला म्हणजे

हे पुढे होत. तो येण्याचा उद्देश न कळल्याने, सर्व खेळाडू शांतपणे त्याच्या अवतीभवती फिरत होते. काही वाईट हेतूने तो आला असेल अशी शंकाही कोणी घेतली नाही.

हा खेळाचा कसला अभिनव प्रकार म्हणून चौकशी केली. दोन्ही गट म्हणे नावाजलेले. त्यांनी हा बचावाचा व धूर्तपणाचा खेळ चालवला होता. अखिल भारतीय स्तरावरच्या अनेक मॅचेस त्यांनी पाहल्यामुळे त्यांच्यात हे नवे कौशल्य आले होते. त्यांनी जागतिक स्तरावरचे बड्या राष्ट्रांचे वैमनस्य बघावे व त्यातले बचावाच्या धोरणाचे अध्ययन करावे ही माझी तीव्र इच्छा आहे.

दारव्ह्यावरून चहा घेऊन तात्काळ निघायला आता काहीच हरकत नव्हती. एवढ्यात एक सभ्य गृहस्थ तेथे आले. कोणीतरी त्यांना आमच्या म्हणजे विशेषतः माधवरावांच्या विदर्भ यात्रेचा उद्देश सांगितला. दोनच क्षणांपूर्वी अत्यंत सलोख्याचा नमस्कार केलेले ते गृहस्थ मग माधवरावांवर तुटून पडले. आंग्ल भाषेतून त्यांनी असंख्य प्रश्नांचा भडिमार माधवरावांवर केला. पुष्कळशा प्रश्नांची उत्तरेही त्यांनीच दिली. ती एकंदर अशी – शिवाजी संस्था बोगस आहेत. परीक्षेत कॉप्या चालतात. परीक्षक खाऊ आहेत. ते मार्क्स वाढवतात. सर्व गोंधळ चालला आहे. नुसता वरवरचा डोलारा आहे. मास्तरांच्या नेमणुकी जातीयवादावर होतात. वगैरे वगैरे.

ते कुठल्यातरी कमेटीवर घेतले गेले आहेत, ही वार्ता आम्ही सकौतुक ऐकली, तेव्हा ते मग पुन्हा प्रेमळपणाने बोलू लागले. प्रेमळपणा इतकाच की त्यानंतर त्यांनी फारसे प्रश्न विचारून आम्हांला संकटात टाकले नाही. उलट न जन्माला आलेल्या प्रश्नांची बरीचशी उत्तरे त्यांनी देऊन टाकली. माधवरावांनी या भागात सर्व खोट्या गोष्टी पाहल्या व अत्यंत वरवर, घाईघाईने पाहण्यात सत्य काहीच हाती लागणार नाही असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या कुठल्यातरी मताला विरोध करण्याची चूक माधवरावांनी केली. तेव्हा ते उसळून म्हणाले, "तुमचा पेपर मला वाचवतदेखील नाही असे तुमच्या मुख्य संपादकाला सांगा."

एका वाचकाचे मत म्हणून हा निरोप अवश्य सांगेन असे आश्वासन माधवरावांनी त्यांना दिले. कबड्डी स्पर्धेतले बचावाचे धोरण या गृहस्थाशी वागताना आम्ही ठेवले होते.

जरा उशिराने पण गाडी दारव्ह्यातून व त्या मतभेदातून बाहेर पडली. वर्धेला

सकाळी स्नान केल्यानंतर विनोबापासून त्या शिक्षणतज्ज्ञापर्यंत, आश्रमापासून कबड्डीपर्यंत आमचा विविधतेने नटलेला प्रवास आज चालला होता. दर्डांकडची गुलाबपुष्पे गाडीमध्ये दरवळत होती. आणि या कार्यक्रमांच्या गडबडीत एका कोपऱ्यात पडून राहिलेले मघाचे कळमचे एक दृश्यही कधीमधी स्वतःची जाणीव देत होते—

कळम म्हणजे वर्ध्याहून यवतमाळला येताना लागलेले बसस्टेशन. छोटासा गाव; पण नृसिंहसरस्वतींच्या देवळामुळे जरा नावाजलेला. शिवाय हे गाव मला आणखी एका वेगळ्या कारणाने आवडते. उन्हाळ्याच्या आरंभाला या गावाच्या रस्त्याने दुतर्फा पळसाचे रान आहे. त्याच्यावर आगीच्या रंगाची फुले नुसती वेडी होतात. सगळे रान जराजराशा वाऱ्याच्या झोताने सारा भगवा रंग फेकून मारीत आहेसे वाटते. उन्हात तर तो रंग उसळून भडकतो. त्याच गावात आम्ही चहा प्यायला थांबलो. गाडी पार्क केली तेथूनच तमाशाचा तंबू दिसला. आम्ही त्या विषयाच्या गप्पा चोरूनमारून सुरू केल्या; म्हणून मामासाहेब सुज्ञपणाने कारमध्येच बसून राहिले. ‘ माझा चहा इकडेच पाठवा ’ म्हणाले. आम्ही तिघे मग उल्हासाने इकडे तिकडे म्हणजे जास्तीत जास्त तंबूकडेच पाहात निघालो. बहिरमची यात्रा पाहणे जमले नव्हते. येथेही हे सर्व ‘ पाहणे ’ सकाळचे होते. हलवायाची कढई, प्रिपेरेशन करणारा प्राध्यापक व तमाशातली बाई या तीन गोष्टी सकाळच्या वेळी कधीच पाहू नये म्हणतात. सकाळची न धुतलेली हिरवी निळी झालेली कढई पाहून आपण उभ्या जन्मात मिठाई खाणार नाही. शिवाय बृहस्पतीच्या आविर्भावात वर्गातील पोरांना थक्क करून सोडणारे प्रा. अमुकतमूक हे सकाळी हमखास बाजारू टिपणावरून गहन तयारी करीत असतात. त्यांना तशा अवस्थेत पाहणे मुळीच बरे नसते. व तमाशातली बाई सकाळी नुकतीच झोपेतून उठलेली व नैसर्गिक चेहऱ्यात पाहल्यानंतर रात्री तिच्यावर किती मूर्खपणाने आपण दौलतजादा केला त्याचीही खंत...म्हणून तशी संधीच येऊ देऊ नये. त्या लोकनाट्य-सुंदरींना या ‘ सकाळ स्वरूपात ’ पाहून आमचे पारणे फिटले असेलच व आता आपण चहा मंडळात मिसळणे अयोग्य होणार नाही असा हिशेब करून मग मामासाहेबही जरा वेळाने हॉटेलात आले. सुंदरी शोधातली आमची निराशा ध्यानी घेऊनच की काय न कळे पण त्यांनी चहासोबत आम्हांला गोडधोडही दिले. नुकसानभरपाई ?

नेर परसोपंत व नांदगाव खंडेश्वर येथल्या रात्री पाहणे भाग होते. त्या छापील पत्रकात ठरलेल्या दिवसांच्या वेळा चुकल्या होत्या. ते पत्रक मावळून हिरमुसले होते. हेडमास्तर, माहिती ( गरीब मुले, अडचणी, इमारती, परीक्षेचे निकाल ) आणि चहा ! चहा या प्रवासात इतका झाला की विदर्भ प्रदेशातले हे यात्रेकरू चहामुळे दगावले अशी वार्ता वृत्तपत्रात आली असती तर निदान आम्हांला तरी नवल वाटले नसते. जेवण नाही तर निदान चहा तरी घ्या हा आग्रह.

या दोन गावांमध्ये एका जन्मू घातलेल्या कॉलेजच्या वार्ता आम्हांला कळल्या. नेहरूंच्या स्मृतिदिनी सभा घेतली व उत्साही लोकांकडून अर्धा लाख रुपये देणगीचा संकल्पही सुटला होता म्हणे.

आम्ही रात्रीमुळे जगाला बरेच पारखे होत चाललो होतो. एका शाळेतला चपराशी आमच्या मोटारला सामोरा आला. माणसे कोण हे ओळखू न आल्या-मुळे त्याने मामासाहेबांच्या समोर विडी फुंकतच उत्तरे दिली. विडी विझव-ण्याच्या आज्ञेमुळे त्याला मग अंधुकशी ओळख पटली व तो दिसेनासा होण्याचे प्रयत्न करू लागला. त्याला जास्त गोंधळात न पाडता आम्ही गाडी भरधाव सोडली. एकदम एका खेड्यात आलो. मामासाहेबांनी पाहुण्यांना सांगितले, " हे पापळ. "

पापळ ! वऱ्हाडभर विद्या फुलवणारा एक माणूस या गावात जन्माला आला होता. याच गावाच्या धुळीत खेळला होता. त्याच्या नावाने एक हायस्कूल येथे चालू होते– ' डॉ. पंजाबराव देशमुख विद्यालय. '

या गावात येण्याचा योग गतवर्षी आला होता. पण तेव्हा जमले नाही. श्री. पंजाबरावांच्या पुतणीचे लग्न येथे झाले. ते अमरावतीला करणे अधिक सोयीचे झाले असते. या छोट्याशा खेड्यात गैरसोयींना येरव्हीच तोटा नाही. आणि भाऊसाहेबांच्या घरचा प्रसंग म्हणजे तो हजारो लोकांनीच साजरा व्हायचा. येथे ती सर्व व्यवस्था करणे म्हणजे एक दिव्यच होते. तरीही प्रसंग येथेच ठरला. स्थळ बदलून अमरावती ठरवू पाहणारांना भाऊसाहेब म्हणाले होते, " हे बघा, मी माझ्या आयुष्यात हजार लोकांकडे गेलो, हजारांकडे जेवलो. मानपान घेतले. माझ्या घरी कोणीच आले नाही. मी आजवर कोणालाच बोलावले नाही. आता सर्वांना माझ्या दारात पायधूळ झाडू द्या. अशी संधी पुन्हा थोडीच येणार ?

दोघा भावांमिळून ही येवढीच आमची मुलगी. तिच्या निमित्ताने तरी चार मंडळी येथे येऊ द्या. ”

मग येथे लग्न नावाची जत्रा चार दिवस चालली. हजारो पाने उठली. पंगती, श्लोक, बाजा यांचा जल्लोस उठला. नातेवाईक आले. मित्र आले. विरोधकही आले. प्रसंग लेकीच्या लग्नाचा होता. राजकारण, समाजकारण, विद्याप्रसार सर्व दोन दिवस दूर होते. स्नेहभोजने चालू होती. सुखसंवाद बहरत होते. ठिकठिकाणांहून मोटारी आल्या. बैलगाड्या आल्या. पायीही कितीक लोक आले. आपल्यावर प्रेम करणारा जनता-जनार्दन आपल्या घरी नैवेद्य घेऊन गेला हे पाहून दोघेही भाऊ धन्य झाले.

त्यातलेच एक धाकटे भाऊ केशवराव आज पुन्हा धन्य झाले होते. केशवराव दोनच कारणांनी धन्य होतात. पंजाबरावांबद्दल काही आनंददायक ऐकले तर आणि कोणी पाहुणा पापळला आला तर. आम्ही येणारची वार्ता त्यांनी अमरावतीस ऐकली. तेथून ते येथे लगबगीने आले. आमची वाट पाहात ते शाळेतच तिष्टत बसले. आमची गाडी आली तेव्हा मग नमस्कारचमत्कार करून फार गप्पात वेळ न घालवता ते पाकसिद्धीच्या तयारीकडे वळले. घरची मंडळी सध्या अमरावतीस होती. वाड्यात पुरुष मंडळींच्या हस्ते स्वयंपाक होणार होता. पुरुषांचे रांधणे व पुरुषांनी वाढणे या प्रदेशाला नवीन नाहीच. वाढप तर पाटील देशमुखांच्या बायका परपुरुषांच्या पंगतीला चुकूनही करणार नाहीत. पुरुषांचे रांधणे जरा रांगडे, पण म्हणूनच वेगळ्या चवीचे असल्याने बरे वाटते. पुरुष कधीमधी चुलीजवळ बसला तर सढळ हाताने तेल-मसाला वापरतो. स्त्रीजातीवर ताण करण्याच्या ईर्षेने केलेले ते पदार्थ प्रमाणशीर नसतील पण भलतेच तेलदार, मसालेदार वगैरे असतात. तमके नाही म्हणून नव्हे तर तमके फार आहे म्हणूनच बरेचदा पदार्थांचा घोटाळा होतो. केशवराव बाबा पाकशास्त्रात दर्दी आहेत असा भरंवसा गावकऱ्यांनी दिल्यामुळे आम्ही निर्धास्त झालो.

शिरजगाव बंडनंतर खेड्यातला मुक्काम हाच पडला होता. मग ठरलेल्या कार्यक्रमात खेडे समाविष्ट नव्हते. मुंबईकरांना ही येथली शांतता मोठीच आकर्षक वाटत होती. वेळ होता. शाळेच्या चपराशाने दोन लोटे भरून दिले. माधवराव व मी गावाबाहेर सडकेने ‘ दिशेला ’ निघालो. हा खेडेवाल्यांचा

अत्यंत आवडता कार्यक्रम. त्यात लेख्यांना महत्त्वाचे स्थान नाही. बोलत चालत जरा गावाबाहेर जायचे. मोकळी हवा खायची आणि पायही मोकळे करायचे. आम्हीही मस्त फिरलो. माधवराव व मी पुन्हा भेटलो तरी त्या भेटीत आम्हांला अशी शुद्ध पक्षातली द्वादशीची रात्र, हे निवांत खेडे व हा निर्जन शांत रस्ता मिळेलच अशी खात्री नव्हती. आम्ही तो रस्ता खूप लुटला. प्रवास अर्ध्याहून जास्त झाला होता. चित्रकाराने चित्र पूर्ण व्हायला आले असताना मध्येच थोडे मागे जाऊन तिऱ्हाईतपणे त्याच्याकडे पाहावे तसे काहीसे आम्ही या प्रवासाकडे पाहू लागलो. मधूनच काही गमतीची आठवण होऊ लागली. मद्याचे ते इंग्रजी भाषेतून ' May I ask you sir ' अशी प्रस्तावना करून व प्रश्नमयतेने केलेला आरंभ विसरून मग सरळ उपदेश, आज्ञा वगैरेंची सरबत्ती करणारे गृहस्थ आठवून आमची खूप करमणूक झाली. अर्थात त्या माणसाला संपूर्ण हासणे आम्हाला शक्य नव्हते. परीक्षा, मास्तरांच्या नेमणुकी, इ. मधला सावळागोंधळ ही तर सर्वीकडचीच बाब होती. नुसत्या विदर्भाचे ते वैशिष्ट्य कसे ठरणार ? शिवाजीच्या नावाने चालणाऱ्या शाळा नुसत्या श्री. पंजाबरावांच्याच नाहीत; इतरत्रही पुष्कळ आहेत. आणि त्या सर्व शाळांकडे स्वतः शिवाजी महाराजांनी जरी नोकरीसाठी अर्ज केला तरी त्यांची जात प्रथम विचारात घेतली जाईल याची खात्री होती. शिक्षणात साधनशुचिता आणणे महत्त्वाचे होते. पण देशात सर्वच क्षेत्रात हे सारे धुमसत आहे. शिक्षण त्याला अपवाद कसे राहणार ? जाऊ द्या. आम्हांला सरकारने शिक्षणशास्त्राचे तज्ज्ञ म्हणून पाठवले नव्हते. इथल्या जागृत लोकांचे विद्येबद्दलचे मोडके तोडके प्रयत्न व अपयशामागचाही त्यांचा उदंड उत्साह व प्रामाणिकपणा हा आम्हांला दिसला होता. त्यांच्याच पुण्याईने आजचे दोष उद्या झडून जाणार होते.

मस्त चांदणे चाखून आम्ही परत आलो. हात पाय धुवायला गरम पाण्याच्या बादल्या अंगणात मांडल्या होत्या. त्याचा फायदा घेऊन त्या रात्री मी पुन्हा स्नान केले. ताजेतवाने होण्याचा तो एक उपाय आम्ही नेहमीच अमलात आणीत होतो. स्नानाचे ठिकाण दूर असले तर बेजार डोक्यावरून काही वेळ कंगवा फिरविण्याचा उपाय माधवरावांनी सांगितला होता. तो त्यांना आणखी कोणी तरी सांगितला होता म्हणे.

स्नानानंतर व विशेषतः दिवसभर जेवण न मिळाल्यामुळे आम्ही जेवणाची

चौकशी करणे भाग होते. श्री. केशवरावही चौकशी करायला आमच्याकडे आले. " बोला, काय चालेल ? मटन की मुर्गी ? "

बापरे ! म्हणजे आता ही चौकशी; आणि नंतर कधी तरी तिचे रांधणे !

" तुम्ही उशिराची फिकर करू नका. आता बनवतो. फक्त चॉईस द्या. मटन की मुर्गी ? चला बोला. "

" काहीही चालेल. " पण तेवढ्यात शॉर्टकट काढण्याच्या हेतूने आम्ही म्हणालो, " या मोठ्या पदार्थात कशाला पडता ? जरा साधे होऊ द्या ना. "

" तू नकोस बोलू. केशवराव, जरा मटनच होऊ द्या. "

अशी दर्जेदार आवड साध्या स्वयंपाकापेक्षा शोभिवंत वाटल्यामुळे घरधनी खूपच खुलला, " तशी मी अमरावतीहून येताना मासळी आणलीच आहे. म्हटले, पाहुणे मुंबईचे... म्हणून येवढ्या घाईतही बाजारात चक्कर टाकली. "

माधवराव नावाचा सी. के. पी. या वार्तेमुळे खूपच खुलला. आजकाल सर्व जातीयता नष्ट झाली तरी खाण्याच्या आवडीमध्ये ती नक्कीच कायम राहील.

स्वयंपाक ' आता ' तयार होतो या शब्दांचा अर्थ हेडमास्तर राऊतांना पूर्ण कळत होता. त्यामुळे त्यांनी पुन्हा एकदा चहा दिला. पेल्यांच्या बशा—नव्हे ताटल्या समोर ठेवल्या. सिगारेटची पाकिटे सादर केली व गोष्टी अशा रसाळ सुरू केल्या की जेवायला उठण्याचा निरोप कधी आला हेच कळले नाही. ताटकळत राहिलेल्या ग्राहकांना उशिराचे विस्मरण करण्यासाठी तज्ज्ञ माणूस जर खानावळवाल्यांना हवा असेल तर त्याने खुशाल या शाळेच्या हेडमास्तरांना पत्र टाकावे.

मामांना आज द्वादशी ! शिवाय कालच्या नागपूरमधल्या मोतीमहालचे उट्टेही काढायचे होतेच. फार खायला मला कारण लागतच नाही. माधवराव व मासळी यांचे को–ऑपरेशनही प्रेक्षणीय झाले. मुद्दाम करायला लावलेल्या भाकरी, मटणाच्या परिणामकारक रश्श्यात कुस्करीत आम्ही तल्लीन झालो. केशवबाबा आपल्या मोठ्या भावाची आठवण काढीत होते. बाहेर गेलेला बंधू रोज लाडू-जिलेबी जरी खात असला तरी जेवणाच्या वेळी त्याची आठवण काढून कासावीस होण्याची वृत्ती या देशाच्या खेड्याखेड्यामध्ये आहे.

खूप वेळ पदार्थांचा समाचार घेतल्यानंतर आचवून पानविडे खायला ओसरीत बसलो. आता कुठे त्या घराकडे आमचे लक्ष गेले. अर्धवट पडझड झालेले

ते मातीचे घर होते. या कुटुंबाची जराशी बऱ्यापैकी पण मातीचीच अशी एक इमारत होती ती त्यांनी शाळेला देऊन टाकली होती. भाऊसाहेब तर दिल्लीला दत्तक दिले, आपल्याला या वयात हवी कशाला इतकी मोठी जागा ? शिकू दे गावातली लेकरे. म्हणून शाळेला जागा देऊन टाकली. आता आला गेला माणूस पडक्या वाड्याकडे येतो. असा मस्त जेवतो. आणि मग नवलाने म्हणतो, " काय, या घरात भाऊसाहेब जन्माला आले ? म्हणजे ते केंद्र-मंत्री भाऊसाहेब ?"

केशवबाबा त्यावर उत्तर म्हणून भाऊसाहेबांचे त्या घरात नक्की कोण्या ठिकाणी बालपण बागडले त्या जागा बोटाने दाखवतात. पाहुण्याच्या प्रश्नातल्या नवल वगैरेशी त्यांचा सुतराम संबंध नसतो. अरे केंद्र-मंत्री झाला म्हणून त्याने पार्लमेंटच्या खुर्चीत जन्माला यावे काय ? या घरात जन्मलेला माणूस मंत्री झाला याचे करा फार तर नवल. त्याच्या जन्मघराचे कशाला करता ? पण केशवबाबा असेही बोलत नाहीत. अनेक लोकांनी पुन्हापुन्हा दुणावल्यामुळे आता त्यांना त्या प्रश्नाचे नवलच वाटेनासे झाले आहे.

आपल्या भाऊसाहेबाबद्दल गोष्टी करण्यासाठी केशवबाबांची रात्रभर जागायला तयारी असते. आणि हेडमास्तर – ते मघाचे पेरूवाले राऊत – हेही तशा वेळी थकत नाहीत. ते व मी सारे झोपल्याचा फायदा घेऊन एका स्पेशल खोलीत टेबलावर पाय ठेवून पंजाबरावांबद्दल बोलत राहलो. ब्रिटिश राजवटीतला, संस्थानिक जमवून युद्ध करण्याचा त्यांचा कट, त्याचा इंग्रजांना लागलेला सुगावा, मग दिवाणपदाहून त्यांची उचलबांगडी...भाऊसाहेबांचे हे एक नवेच दर्शन होते. या विभागाचे औद्योगीकरण करण्याची त्यांची योजना, किसानांची बँक, फार्मर्स फोरम् . . . काय काय तरी.

राउतांनी त्यांची एक कथा वाचून दाखवली. वाङ्मयाच्या जगात बरेच दिवसांनी त्यामुळे परत आलो. झोप आता हाका मारीत होती. राउतांना विचारले, " तुम्ही आमच्या दौऱ्यात येणार काय ? "

आता ही यात्रा फक्त दोन दिवस चालणार होती. निदान तितके दिवस तरी त्यांना आमचा व आम्हांला त्यांचा सहवास लाभणार होता. मधुकर गव्हाणे वर्ध्याहून गेला; पण पापळला परत येऊन त्याने पुन्हा आम्हांला गाठले होते.

झोपताना थकल्याची जाणीव येत नव्हती. रात्री पुन्हा स्नान केले त्याचाही

तो परिणाम असेल. नाही तर आज इतके जिल्हे ओलांडले, इतकी माणसे भेटली; त्याचा शीण गात्रांवर उमटायला हवा होता. थेट विनोबांच्या कर्मभूमी-पासून पंजाबरावांच्या जन्मभूमीपर्यंत आज फिरलो होतो. विनोबा आज विझले नाहीत याचे समाधान होते. पण मनाची तयारी करून ठेवणे हा शहाणपणा होता. कितीही झाले तरी ही जुनी पिढी. ती जुनी म्हणूनच इतकी टिकली. पण गांधी, नेहरू आणि राजेंद्र प्रसाद यांच्या आठवणी तरी त्या उर्वरितांनी किती जपायच्या ? वाटचालीला अंत आहे. डॉ. पंजाबरावांनाही पक्षघाताचा झटका येऊन गेला म्हणे. पवनार, पापळ ही स्थळे आज जिवंत आहेत. ती तशीच राहोत. त्या स्थळांच्या परमपुरुषांना दीर्घायुरारोग्य लाभो ही इच्छा मनात उसळत होती. आणि त्याच वेळी सेवाग्रामचे पक्षी उडून गेलेले घरटेही डोळयांना दिसत होते. ती काळाची म्हातारी आजी भकास नजरेने पाहात होती आणि त्याच वेळी वऱ्हाडच्या हजारो शाळांतून नव्या भारताचा गोड चिवचिवाट ऐकू येत होता. मग ती आजी सुखावत होती. नातवाचे कौतुक पाहात हासत होती. विनोबांचा थकवा दृष्टीआड होऊन तेथली गंगेला स्नान घालणारी ती आश्रम-कन्या दिसत होती. तिच्या बंगाली गीतामधून वऱ्हाडच्या शाळांचे गाणे मी ऐकत होतो, तसतसे मग समोरच्या पंजाबरावांच्या फोटोतले रंग अधिकाधिक गडद होऊन रात्रीच्या कुशीत विसावत होते.

## सहावा दिवस

पापळला केशवबाबांनी हुरड्याचा झक्क बेत ठरवला होता. पण आमचे कार्यक्रमपत्रक या शेवटच्या दोन दिवसांसाठी तरी आमच्या ताब्यात राहणे भाग होते. जाताजाता या गावाची देवी पापहरा देवी हिचे दर्शन घेतले. येथेही उत्खननातल्या काही मूर्ती दिसल्या. आता उत्खनन या विषयाचे मला नवलच वाटेनासे झाले आहे. नदीमुळे किंवा इतर काही कारणांमुळे काही शहरे गाडली गेली व ती उखरल्यानंतर त्यांचे अवशेष दिसतात हे आतापर्यंत इतक्यांदा झाले आहे की ते पुन्हापुन्हा होण्यातली आवश्यकताच कळेनाशी झाली आहे. विशेषतः विदर्भाची संस्कृती अत्यंत जुनी. मराठीच्या पहिल्या गद्याला इकडे जन्मावे लागले व पुराणातल्या प्रेम, भांडणे इत्यादींनाही इकडेच घडावे लागले, याला कारण

इतर भागात वसती नव्हती व ती असलीच तर क्वचित असावी हे उघड आहे. या सर्व घटनांसाठी आणि भाषाविकासासाठी इतिहासाने त्या गावांना श्रेय देणे आवश्यक होते; पण श्रेयासाठी रुसायलाही ती गावे अस्तित्वात नव्हती हा इतिहासाचा नाइलाज. म्हणून कुंडनपूर, ऋद्धिपूर, कांतियेनगर, अमरावती इ. ची वर्णी लागली. आणि ही सर्व नावे त्याच त्या ठिकाणी पुन्हापुन्हा वसल्या गेलेल्या गावांची आहेत हेही तितकेच खरे. द्वारका जशी पाण्यात बुडली तरी तिचे नाव घेऊन पुन्हा नवी वसती तेथे आली तसेच या गावांचे. इकडे जरा कुठे काही खोदा—एकदम एखादी मडक्याची उतरंड; चुनेगची, विटांचे अवशेष, काही ना काही मिळतच राहते. देवदेवतांच्या मूर्तींना तर तोटाच नाही. मला वाटते येवढ्या म्हणजे आजवर हाती लागल्या तेवढ्या अवशेषांवर भारताच्या नागरिकत्वाची व लोकजीवनाची जुनी ओळख व्हायला हरकत नाही. एकदा हे निश्चित ठरवून टाकावे की भारत या अवशेषांच्या आधारे विशाल ठरतो, येथे कलाकार, शेतकरी वगैरे मोठे हुशार होते आणि ते सर्व लोक मोठ्याच सुबक घरांमध्ये राहात होते. हे ज्ञान एकदा नक्की झाले म्हणजे ते उजळणीच्या पुस्तकासारखे फायनल समजावे. त्याच त्या ज्ञानासाठी होणारी पुन्हापुन्हाची खोदकामे आता आवरती घ्यायला हरकत नाही. तेणेकरून या देशात शेतीसाठी थोडी फार जमीन उरेल. जयस्तंभ, स्मृतिस्तंभ, दफने, समाध्या, टोम्बसू, इत्यादीसोबतच ऐतिहासिक उत्खननाची स्थळेही जपली जाऊ लागली तर निदान विदर्भात तरी खरोखरच झाडे लावायलाही जागा उरणार नाही. येथले नागरिकत्व व सभ्यता इतकी जुनी आहे की खरोखरच येथल्या कोठल्याही धोंड्यांखाली खणले तर एखादे गाव हाती लागेल.

पापहरा देवी ही देशमुखांची कुलदेवता. तिला स्मरूनच मी हे उत्खननाचे विचार करीत होतो व कोणीतरी माझ्याजवळ उभे राहून सांगत होते, “हे गाव आज दिसते इतके लहान पूर्वी नव्हते. काही जुने बुरूज दूरवर सापडले आहेत. त्यावरून पूर्वीच्या सीमा हाती लागतात. जरा संशोधन होणे आवश्यक आहे.”

“करा संशोधन. पण त्यासाठी या बांधलेल्या घरांना पाडून त्यांच्याखाली उत्खनन करू नका.” मी काकुळतीने म्हणालो.

इतिहासावरून आठवले—डॉ. य. खु. देशपांडे हे जुन्या हस्तलिखितांचे

अधिकारी विद्वान याच पापळचे. त्यांचे वडील बंधू अजूनही येथेच राहतात असे ऐकले; म्हणून माधवरावांनी त्यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. माधवरावांची फेरी इकडे आली हे त्यांनीही ऐकले म्हणून तेही शाळेकडे यायला निघाले. या म्हातारपणी त्यांना कशाला इकडे येण्याचे कष्ट म्हणून आम्हीच लगबगीने तिकडे गेलो. तो त्यावेळी ते शाळेत पोचल्याचे कळले. नव्वदीला टेकलेला म्हातारा ! पण कोणी सांगावे ते आमच्या जलद चालीचे कौतुक करीत असतील. टॉलस्टायच्या गोष्टीतल्या म्हाताऱ्यासारखे ते ताज्या जवानासारखे चालत शाळेतून पुन्हा घरी आले. मग कुठे आमची भेट झाली. याही वयात ते स्वतः स्वयंपाक करतात. रोज फिरायला जातात. धन्य ती जुनी पिढी.

पंजाबराव प्रायमरी शिकले ती शाळा बघायला गेलो. छोटे छोटे पंजाबराव व केशवराव उन्हात रांगा करून व इवल्या इवल्या पाट्यापुस्तकांचे भारे समोर ठेवून बसले होते. पंतोजी त्यांना शिकवीत होते. ही शाळा खूप जुनी. निझामाचे विदर्भावर राज्य होते तेव्हा त्याच्या कसल्यातरी आनंदाच्या प्रसंगी त्याने मशिदींना नजराणे वाटले व काही गावांना या शाळा दिल्या. तीन वर्ग एका मास्तराने सांभाळायच्या जातीतल्या या शाळा होत्या. तीन बुके शिकून मग इतर बुकांसाठी भाऊसाहेब नावाचा तो चुणचुणीत पोरगा चांदूरला गेला म्हणे. तेथून पुढे शिवाजी संस्थेचा अध्यक्ष वगैरे झाला. गुरुदक्षिणा चुकती करायची म्हणून आणखी सात वर्ग या गावाला देऊन त्याने हायस्कूलही काढले.

पापळ सोडताना वाईट वाटत होते. या संपूर्ण दौऱ्यात आम्ही पाहुण्यांना इतक्या शाळा, इतके टोलेजंग कॉलेज दाखवले पण त्यांचा कर्ताहर्ता नव्हता दाखवला. येथे निदान त्याचे जन्मघर दिसले होते. त्याचा प्रेमळ भाऊ दिसला होता. त्याची एक कृतार्थता होती. त्याच्या ओसरीवर आम्ही दोन घास खाल्ले होते.

राऊतांना शेवटी आम्ही सोबत घेतले. गाडी पुढे सरली.

अकोला येईपर्यंत रस्त्यातल्या गावी लागलेल्या शाळा मामासाहेब दाखवीत राहले. नुसते बोटाने करून, हे सारे चालू होते. भेटून भेटून तरी किती दाखवायच्या ? दिवस थोडे शाळा फार, अशी अवस्था. कुठल्याही कोपऱ्यातल्या उनाड पोराला शाळा चुकवायची संधीच या भागात पंजाबरावांनी ठेवली नव्हती. एखाद्या गावात ग्रामपंचायत नसेल, दोन पक्ष नसतील, त्यांची भांडणे नसतील,

फार कशाला पण एखादवेळी दारूच्या भट्ट्या नसतील; पण शाळा तेथे आहेच. आणि तीही चांगली मॅट्रिकपर्यंत ! मध्येच मूर्तिजापूर लागले. गाडगेबाबांचा या गावाशी फार संबंध. पण आता ओढ होती अकोल्याची. तेथे शिवाजी संस्थेचे तान्हे कॉलेज होते. ते बघायचे आणि एक वयस्क शाळा होती, तीही बघायची. मग पुन्हा पुढे जायचे—छापील पत्रक आता घाई करू लागले. आणि आम्हीही आता कंटाळलो होतो. पहिल्या पावसाचे कौतुक ठीक आहे. पाऊस पाऊस पाऊस आणि हिरवळ हिरवळ हिरवळ—ती समृद्धी पाहायची तरी किती ?

अकोला येईस्तो आमचा कॅमेरा जरा रोगीटपणाने वागू लागला. त्याच्या या वर्तनामुळे त्याने विनोबांच्या आश्रमात फोटो घेताना दगा दिला असेल की काय ही शंका आली. ( दुर्दैवाने ती खरी ठरली. मौनातले विनोबा, ' मौन ही एक प्रकाशन शक्ती आहे ' असा संदेश वगैरेचे स्नॅप घेताना फिल्मने अक्षरशः मौन पाळले असल्याचे आज आढळून आले. असो. )

जरा वेळाने व खूप वेगाने अकोला जवळ आले. या गावाला म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष चुकून चांगला निघाला. त्याने येथे गावभर शिल्पकला वगैरे पेरून दिली आहे. तिचा आस्वाद घेत आम्ही शिवाजी कॉलेजात शिरलो.

या कॉलेजचे प्राचार्य आम्हांला पाहून भलतेच खुश झाले, " बरं झालं वेळेवर आलात. आम्ही होम सायन्स हा विषय सुरू केला आहे. त्या विभागाचे उद्घाटन मुंबईच्या पाव्हण्यांच्या हस्ते होऊ द्या. "

मग माधवरावांच्या अध्यक्षतेखाली त्या शिकलेल्या पोरींनी आम्हांला खूप खायला दिले. जीभभर कौतुक करण्यासारख्याच त्या सर्व रचना होत्या. पदार्थांचा आकृतिबंध व त्यांचे थ्री डायमेन्शनल दर्शन डोळ्यांना सुखवून शिवाय रसनिर्मितीही करीत होते. माझा स्थायी भाव, विभाव, अनुभाव वगैरेतून रसनिर्मितीची प्रक्रिया बराच वेळ होत राहली. मुहूर्तालाच माझ्यासारखा खवय्या रसिक मिळाल्यामुळे त्या पोरी चहाची केटली भरताना कृतार्थतेने भारावून जाणे यथार्थच होते. तोवर इतरेजनांनी कॉलेज व शाळा पाहण्यात आपला वेळ कामी आणला. होमसायन्सचे मुहूर्त खाऊन झाल्यावर मीही कारमध्ये देह ठेवला.

आकोटला जाण्याआधी तेथे प्रेसमध्ये पंजाबराव गौरवाचे छापले जाणारे पुस्तक कुठवर आले ते बघायला गेलो. पंजाबरावांवर आम्हा सर्वांचे लेख छापून झाले होते. त्यांचा जन्मोत्सव जवळ येत होता. प्रेसवाल्यांचे आभार मानून

आम्ही अकोटच्या भेंडे गुरुजींचे आभार मानण्यासाठी व त्यासाठी त्यांना आमच्या जेवणाची व्यवस्था करण्याचे श्रेय देण्यासाठी त्या रोडने धावू लागलो.

आकोटला कॉलेजमध्ये पुन्हा सत्कार, भाषणे वगैरे होणार हे मला कोणी सांगण्याची गरजच नव्हती. म्हणून भाषणयोग्य व्यक्तींना म्हणजे मामा व माधवराव यांना कॉलेजच्या दाराशी उतरवून देऊन मी दादाला खूण केली. आम्ही गाडी घेऊन तडक गावात गेलो. सदाशिवरावांच्या सौ. ला अतिथींचा आकडा, भूक लागण्याची वेळ व एकेकाचे भक्षणसामर्थ्य याबद्दलची साधारण रूपरेखा दिली. तेथेच दाढी वगैरे आटोपली व मामासाहेबांची गावकरी भेट आटोपेपर्यंत माधवरावांना नरनाळा किल्ला दाखवून आणावा म्हणून गाडी कॉलेजकडे वळवली. मामा तेथे भाषण करीत होते. अर्थ असा की भाषण सत्कार वगैरेचा कार्यक्रम इतक्या अवधीतही आटोपला नव्हता ! या सत्कार जंगलातून माधवरावांना सोडवून किल्ल्यापर्यंत कोण्या उपायाने न्यावे याचा गंभीर विचार करीत मी एका बाकाचा आधार घेतला. आणि हाय दैवा ! माझेच नाव भाषणासाठी पुकारले गेले. मी याच गावात पूर्वी मास्तर होतो. ती आपुलकी अशी उफाळून आली. ईश्वरकृपेने लवकर सुटका होऊन आम्ही भेंडे गुरुजींना घेऊन किल्ल्याकडे निघालो. आज दिवस पुरण्याची शक्यता होती त्यामुळेच हा तरी किल्ला मी चिखलदरा मेथडने दाखवणार नाही अशी माधवरावांना आशा होती.

शहानूर वगैरे ग्रामनावे मुंबईकरांना नवी वाटत होती. सडक सोडल्यानंतरचा रस्ताही सडक याच नावाने ओळखला जात होता. सरकार, कंत्राटदार व त्यांचे संयुक्त प्रयत्न यांच्यामुळे त्या खडबडीत रस्त्याला आपले जुने रूप कोठेही न डागळता सडक म्हणवून घेणे शक्य झाले होते. त्या रस्त्याने एकच करमणूक होती. तिखाडीच्या गवताचा चैतन्यमय वास तरतरी आणीत होता. इकडे तिरवाडीच्या तेलाचा व्यापार मोठ्या प्रमाणावर. सरकारी व कंत्राटदारी रस्ता किल्ल्याच्या रोखाने चढू लागला तेव्हा तो अधिकच दुर्बोध होऊ लागला. नवकाव्याचे बहुतेक गुण या नवसडकेने घेतले होते. माणूस अर्थाच्या आशेने शेवटपर्यंत वाचीत जातो तशी आम्हीही जाईल तितकी गाडी नेली. तितक्यात रस्ता गुप्त झाला. गाडी तेथेच रोखणे भाग पडले.

वर मनुष्यवसतीचा थोडासा मागमूस लागला. लोकांना हाका मारून रस्ता कुठाय म्हणून विचारले. त्यांनी तो मुळीच हारवला नसल्यामुळे, त्यांच्याकडूनही

उत्तर येईना. पण एका सज्जनाने तेवढ्यात ओरडून सांगितले, " दूर पळा, दूर पळा ! बार उडणार आहे. आवाज होणार आहे. "

सुरुंगाचा बार उडण्यामुळे नुसताच आवाज होणार आहे हे सांगणे जरा गंमतीचे होते. आम्ही शक्य तितकी पळण्याची प्रॅक्टिस केली. पुन्हा शंका आली की आम्ही सुरुंगाच्या भेटीला तर त्या वेगाने जात नाही ? तेवढ्यात सुरुंगाचा भडक्या आवाज होऊन कानठाळ्या बसल्या, खूप वेळपर्यंत दगडांचा पाऊस पडला. पण हे सर्व आमच्या पळण्याच्या उलट्या दिशेने झाले होते म्हणून आम्हांला ते त्रयस्थाच्या भूमिकेतून पाहता आले. अलिप्तपणा हा वाङ्मयाचा व वृत्तपत्रात वार्ता छापणाराचाही एक आवश्यक गुण आहे म्हणतात. आज अनायासे त्याचा प्रत्यय आला; जाणिवेच्या कडा बचावल्या; अभिव्यक्तीसाठी व अनुभूतीसाठी देहाला वाव मिळाला. हे सर्व उलट्या दिशेने म्हणजे सुरुंगाकडे न गेल्यामुळे झाले हे मान्य केले पाहिजे.

थोड्या वेळाने दुसराही एक बार झाला. पण त्या आवाजाला फारसे वजन नव्हते. त्याची जाणीव तितकीशी तिरकस नव्हती. आणि प्रत्ययाच्या रेखा चढल्या तशा पडल्याही. एवंच त्या बाराची आठवण तेवढी तीव्र न राहावी. शिवाय द्वितीय आवाजाने पूर्व आवाजाचे अयशस्वी अनुकरण केल्यामुळे व ते एक्सपोझ झाल्यामुळे त्याची ओरिजिनॅलिटी सिद्ध न व्हावी. असो.

सडक बांधण्यासाठीच त्या सर्व सुरुंगांची योजना झाल्यामुळे आम्ही काहीं न बोलता त्या रस्ता बांधणाऱ्या मजुरांना पायरस्ता विचारून पुढील प्रगती करू लागलो. त्या प्रगतीमधला एकमेव अडथळा म्हणजे माधवरावांचा थकवा. भेंडे गुरुजी जणू काही आपण पहिल्यांदाच हा किल्ला पाहणार आहोत, या हौसेने पुढे पुढे करीत आम्हांला हाका मारीत होते. एक दरवाजा तर पाहुण्यांनी कसाबसा ओलांडला. मोठाच नक्षीदार दरवाजा. या किल्ल्यांच्या दरवाजांची एक आगळीच तऱ्हा आहे. संपणे नाकारणारी भव्य उंच अशी त्या किल्ल्याची तटबंदी मध्येच एखाद्या ठिकाणी अल्प विरामासाठी थबकते. तेथे बांधले गेलेले दार म्हणजे एक प्रवेशमहालच असतो. त्या दारात शेदीडशे लोकांना राहण्याइतक्या खोल्या असतात. दार ओलांडताच पुन्हा गाविलगडचीच आठवण ! अजूनही काही दूर उंच उंच जावे लागणार होते. संध्याकाळची पावले तेथल्या वृक्षांच्या रांगांवर पडत होती. सागवनासाठी ख्यात असलेला हा पहाड त्या किल्ल्यांच्या सर्व

आंगणांमध्ये शिरला होता. हाही किल्ला चिखलदरा मेथडने पाहायची एक इच्छा पाहुण्यांना होणे शक्य होते. पण कामावरून किल्ल्याच्या निवासाकडे परत चाललेल्या लेकुरवाळ्या बायका भावी भारत, विद्यमान बालभारत अंगाखांद्यावर घेऊन झपाझप आमच्या पुढे चालल्या होत्या. अंधार पडण्यापूर्वी किल्ला पाहा असा त्या आम्हांला आग्रह करू लागल्या होत्या. त्या दिवसभर श्रम केलेल्या व आताही उत्साहाने रस्ता चढणाऱ्या महिलांकडे पाहून आम्हांलाही मग आमचा थकवा – हा मोटरचा – मागे ठेवणे आवश्यक वाटले.

राणीचा महाल ही इमारत कैकशे वर्षांपासून शाबूत आहे. पूर्वी एकदा तेथे मी कंदिलाच्या उजेडात रात्र काढली होती. भले मोठे दालन आहे. राणीच ती. त्या महालाचे आंगण कातीव दगडांनी मढवले आहे. बाजूला एक देवीचे मंदिर आणि समोरच्या तळ्यावर एक मशीदही आहे. ज्ञानकोशानुसार येथे ३२ की ३६ अशी तळी आहेत. काही बुझली. काही अजूनही आहेत. या महालाचा वर्षानुवर्षे शेजार करणारे काही राक्षसी दगड श्रावणात शेवाळ पांघरून पावसात न्हाताना मी पाहिले होते. त्या दृश्यांची व त्यांपैकी एका कातळावरून मी पाय घसरून पडलो होतो त्याची आठवण येऊन मन कशाने तरी भरून आले. नादुरुस्त कॅमेऱ्याने तेथल्या सक्कर तलावाचा फोटो घेतला. त्या राणीच्या महालालाही त्यात साठवले. हा किल्ला इतका निसर्ग ल्यायलेला; हवाही मोठी गुलगुल बोलणारी आणि अंगावरून नरम पिसे फिरवणारी. पन्हाळगडासारखी येथे मुक्कामाची व्यवस्था झाली तर खूप सोय होईल. रस्ते, धर्मशाळा, उपाहारगृहे इ. सोई होण्याकडे प्रयत्न चालू असावे. मघाचा तो सुरुंग त्यातलाच – म्हणजे त्यासाठीच. तलावाशेजारच्या एखाद्या उंचवट्यावर उभे राहून खाली उतरत गेलेला भव्य सभोवार पाहता येतो. राणीच्या महालाला लागून काही कामचलाऊ झोपड्या उभारण्यात आल्या होत्या. रस्ता बांधणारे मजूर त्यात राहात, खात, पीत व भांडत होते. राणी महालात नाही हे पाहून थोराड मुले त्यात हुंदडत होती. तान्ही पोरे आपापल्या पाळण्यातून टुकूटुकू पाहात तोंडात बोटे घालून कसले तरी आश्चर्य प्रगट करीत होती.

रात्र व्हायलाच आली तशी मग आकोटला वाट पाहणाऱ्या ममासाहेबांची आठवण झाली. रात्रीचे जेवणही तेथे वाट पाहात होते. मेंडे गुरुजींनी पुढाकार घेऊन परतीचा उतार शोधला.

गाडी खाली उतरू लागली. तेव्हा एका झाडाखाली चांद्याच्या एका शाळेची पाटी दिसली. शाळा, शाळा आणि कॉलेज, कॉलेज ! संपूर्ण दौऱ्यात ही मंडळी लागली होती. हेडमास्तर, मास्तर, पोरे, सभा, माहिती यांनी मन नुसते कावून गेले होते. जरा विरंगुळा म्हणून या जरनाळ्यावर आलो. वेळ छान गेला होता. आकोटला जाऊन पानावर बसण्याच्या आड आता आज तरी कोणी शाळा येणार नव्हती. पण मध्येच ही पाटी दिसल्याने आम्ही दचकलो. पाटी आहे तेथे शाळा आहे या न्यायानुसार अवतीभवती बघू लागलो. पण सारे निबिड अरण्य होते. चांद्याच्या कोणा माणसासोबत ती पाटी येथे इतकी दूरपर्यंत आली तरी कशाला ? गूढ गूढच राहिले; पण पाटीने इकडे चुकून येताना सोबत शाळा न आणण्याचा दयाळूपणा केला होता.

आकोट येईपर्यंत तेथल्या शिवाजीशाळेच्या आठवणी मनातून जाता जात नव्हत्या. गांधींचा वध झाला तेव्हा आकोटच्या शाळेतले मास्तर पकडण्यात आले. त्यांची सुटका कधी होईल हेच सांगता येईना. शाळा बिचारी ओस पडली. चांगली नांदलेली शाळा. ज्ञानकोशापासून सर्व उत्तम पुस्तके असलेली लायब्ररी, क्रीडांगण, मजबूत इमारत, मुलांची गर्दी—पण मास्तरच नव्हते ! वाट पाहून पाहून पालक मंडळी नितातून गेली. शेवटी भेंडे गुरुजी यांनी शाळेच्या अध्यक्षाचे मन वळवले व त्यांनी पंजाबरावांना ती शाळा चालवायला दिली. ती पुन्हा सुरळीत होईस्तो जुने मास्तर सुटून आले. मग जुन्या व नव्या लोकांना बऱ्याच समस्यांना तोंड द्यावे लागले. त्यातली एक प्रमुख समस्या म्हणजे भर बाजारात आपल्या छातीवर बसलेला एक आडदांड माणूस त्या आसनावरून कधी उठेल व त्यायोगे आपला श्वास पूर्ववत कसा होईल ही भेंडे गुरुजींची विवंचना. पूर्वीच्या दिवसांत गुरुजी व्यायाम वगैरे करीत, त्याचा फायदा त्यावेळी कठीण समयी देह टिकण्याइतका झाला. भेंडे गुरुजींनी तेथे मुलींची शाळा, कॉलेज वगैरे काढण्यासाठी हजार युक्त्या करून पंजाबरावांचे मन वळवले. विद्याप्रसारासाठी इतःपर तरी गुरुजींनी तो बाजारातला प्रसंग स्वतःवर पुन्हा ओढवून घेऊ नये, अशी मी त्यांना नम्र विनंती केली. पोरांप्रमाणेच शाळेतल्या काही मास्तरांनाही पालक हवे असतात. भेंडे गुरुजी हे माझे आकोट नोकरीतले पालक होते. त्यांनी जेव्हा आकोटच्या आत गाडी शिरताच कार्यक्रमात न ठरलेली शाळा पाहायला सांगितले तेव्हा मी तरी उत्तर करणे शक्य नव्हते. ती चांदण्यात

पाहून मग घरी आलो. वऱ्हाडच्या या पाटलाकडचे साधे पण गोड जेवण वऱ्हाडी आग्रहासह पार पडले. पाहुणे हे पाहुणे म्हणून व गावातली प्रतिष्ठित मंडळी ही प्रतिष्ठित म्हणून तासभर तेथे जेवण करीत होती.

भोजनोत्तर खूपच थकवा आल्याचे आम्ही जाहीर केले. आता जास्त गप्पा न करता, झोप घेणे आवश्यक हे त्यांनीही मान्य केले. त्यासाठी पाऊणशे मैलांवरची अंथरुणे गाठण्यासाठी आम्ही बुलढाण्याकडे निघालो. या दौऱ्यात आम्ही बरेचदा जेवणानंतरचा विडा चाळीस मैलांवर आणि विड्यानंतरची झोप वगैरे साठ मैलांवर घेण्याचा आमचा रिवाज ठरून गेला होता.

अर्थात झोपण्याआधी देवाला नमस्कार करणेही आवश्यकच होते. म्हणून रस्त्यात शेगावला गाडी गजानन महाराजांच्या देवळासमोर थांबली. आज अनायासे गुरुवार. या दिवशी गजानन महाराजांचे दर्शन घेणे फार लाभदायक समजतात. तेवढ्यासाठी वर्षातले बावन्न गुरुवार हे दूरदूरहून आलेल्या गर्दीने भरलेले असतात. वेळ रात्रीची; म्हणून येथले देवळानेच चालवलेले विशाळ वाचनालय आम्ही पाहू शकलो नाही. दर्शन मात्र झाले. श्री गजानन महाराजांचा इकडच्या सर्वच थरांवर विशेषतः सुशिक्षितांवर विलक्षण प्रभाव आहे. विदर्भात आजचे साधू हे गाडगेबाबासारखे कनवाळू व विचारवंत आहेत. कर्मयोगीही आहेत. तुकडोजींसारखे वक्ते, कवी व पुढारी अशा स्वरूपाचेही साधू आज आहेत. एकेकाळी मात्र संपूर्ण विदर्भ हा समाजाचे जुने रिवाज बदलवून नवे घेण्याबद्दल कुठल्याही समाजसेवकाचे, अक्कलवंताचे किंवा पुढाऱ्याचे ऐकायला फारसा तयार नव्हता. रिद्धपूरचा चांभार जर स्वतःला ब्राह्मण म्हणवून घेऊ लागला, तर जीवानिशी जायचा आणि तोही स्मार्तांच्या—कायदेपंडितांच्या निर्णयानुसार. पण या रूढी पालटू शकणारेही काही लोक होते. गोविंद प्रभू जर महाराघरचे पाणी पिऊ लागले तर लोक ते सहन करीत. गव्हर्नरला न बधणारी जनता एखाद्या वेड्यापिशाच्या हुकमाने वाटेल ते करण्याची तयारी ठेवी. जनतेवर हे असे खरेखुरे राज्य करणारे लोक म्हणजे अवलिया. त्यांचे एकमेव भांडवल म्हणजे त्यांचे वेड. कदाचित ते वेड मुद्दाम पांघरलेलेही असेल. आर्थिक समानतेवरच्या भाषणांना चुकूनही हजर न राहणारे लोक गुलाबपुरी महाराजांच्या आदेशानुसार वर्षभर गरिबांना पंगती देत. विदर्भाची सांस्कृतिक क्रांती करणाऱ्या या अवलियांवर बरेच संशोधन होण्यासारखे आहे. गजाननबाबा हे एक अव-

लियाच होते. अवलियांचा वेडेपणाबरोबरच दुसरा एक आवश्यक गुण म्हणजे गांजा पिणे. गजानन बाबांच्या त्या अवतारातले फोटो मी पूर्वीही पाहिले होते.

गांजा व वेड्यासारखी वर्तणूक ही चिन्हे म्हणजे काही सर्वस्व नव्हे. त्यासोबत चमत्कार लागे. जगातले सर्व गांजाकस व वेडे यातून अवलिया अलग काढण्यासाठी चमत्कारांच्या वार्तांची खूपच मदत होई. या देवळात बरीच चित्रे सभामंडपात लावली आहेत. ती बहुतेक त्या महाराजांच्या चमत्कार-प्रसंगांची आहेत. चित्रकाराने सर्व चित्रांत गजानन महाराजांचा चेहरा सातत्याने तोच ठेवला होता हे मात्र त्याचे कसब. चमत्कार खरे असोत, नसोत. लोकांची श्रद्धा खरी होती. माधवरावांनी वाटलेला प्रसाद आम्ही खाल्ला. तो त्यांनी जास्तीत जास्त प्रमाणात आमच्यातच वाटावा व इतर यात्रेकरूंना शक्य तो वगळावे यासाठी मी आटोकाट प्रयत्न केले. शिवाय इतर भक्तांतर्फे चाललेल्या प्रसाद-वाटप प्रसंगात मी उत्साहाने सामील झालो. त्यावेळी त्यांना परके वगैरे न मानता, अत्यंत आपुलकीने मी त्यांना प्रसाद मागितला.

येथे गजानन महाराजांचे दर्शन घेणे व देवळाचे ट्रस्टी श्री. यादवराव यांच्यापासून तोंड लपवणे असे दोन महान कार्यक्रम आम्ही साधले. जरा कुठे चूक झाली असती तर आमचे छापील पत्रक त्यांच्या हाती गेले असते. मग उद्याच्या कार्यक्रमांना चाट बसून येथेच पाहुणचार घ्यावा लागला असता. गजानन महाराजांच्या त्या सद्भक्ताची व आमची चुकामूक होऊ शकली, ही एक गजानन महाराजांचीच कृपा म्हणावी लागेल. आजवर पाहिलेल्या देवळांमध्ये हे एकच मंदिर इतक्या घनदाट गर्दीतही स्वच्छ वाटले, त्याचा मात्र आनंद झाला.

प्रसादानंतर पान वगैरे खाऊन झाले. उठल्याबसल्या आणि अनेकदा तर न उठताबसताही पानविडे खाण्याचा आम्हा वैदर्भीयांचा उपक्रम पाहून माधवरावांच्या विदर्भविषयक ज्ञानात बरीच भर पडली. जळगावला नागपूरचे एक वक्ते गेले तेव्हा दोन विडे तोंडात कोंबूनही ते शुद्ध उच्चार करू शकले हे नवल मला राजा महाजनांनी सांगितले होते. अर्थात हे असे होणे ही या प्रदेशाची स्पेशल कला आहे. आम्ही खातो तितके विडे खाल्ल्यानंतर इतर ठिकाणच्या लोकांना तर जेवणाचीही गरज भासणार नाही. झोपेआधी आणखी एखादे पान खाता आले तर पाहावे म्हणून आम्ही खामगाव जरा झपाट्याने जवळ करू लागलो. तेथे श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे घर पाहुण्यांना दाखवायच्या निमित्ताने गाडी

उभी करून मी मधुकर गव्हाणेस खूण केली. त्याने त्या अपरात्रीही पानाचे दुकान शोधून काढून विडे मिळवले. तोवर एका धनिकाने विकत घेतलेले व आधुनिक बांधकामाने पूर्वीचा चेहरा बदलवलेले एक घर आम्ही पाहुण्यांना दाखवले. कोल्हटकर हे मराठी विनोदाचे जनक. त्यांच्या या घराचा कायापालट विनोदाला शोभणारा असाच होता. मात्र ती गोष्ट आम्हांला थोडीफार लागून गेली. आजीला भेटायला जायचे व ती कोण्या धनिकाने थेट गोल साडीतल्या पेहरावात आणलेली दिसावी असे काहीसे तेव्हा जाणवले.

आम्ही या घराच्या पालटामुळे जरा अधिक वेळपर्यंत उद्विग्न राहलो असतो; पण एक सरदारजी आमच्या मदतीस धावून आले. दोन खेडूत सवाऱ्यांना आपल्या रिक्षामध्ये बसायला भाग पाडून ते आपले ॲमेच्युअर ड्रायव्हिंग सिद्ध करू लागले. त्या उपक्रमात ते, रिक्षा व सवाऱ्या ही सर्व मंडळी उंच सडके-वरून पदभ्रष्ट होऊन खालच्या खोल खड्डयात जाऊन एकमेकांना मिठ्या मारू लागली. ते न आवडलेल्या पॅसेंजरांना सरदारजी नम्रपणे सांगत होते, " हे बघा, फार जखमा झाल्या असतील तर तुमचे पैसे परत देतो; पण उगीच आकांडतांडव करू नका. " आम्ही त्या भानगडीत पडण्याचा थोडासा प्रयत्न केला; पण त्यामुळे ते देणार असलेली रक्कम काही नव्या पैशांनी वाढण्यापलीकडे दुसरे काहीही निष्पन्न झाले नाही. श्रीयुत सरदारजींच्या डोक्यात आर्थिक नुकसानभरपाईपलीकडचा कोणताही विचार शिरत नव्हता, तेव्हा मग आम्हीही त्यांच्या भानगडीत पडल्याबद्दल आमच्या अकलेविषयी शंका घेत बाजूला झालो.

कोल्हटकरांचे घर, सरदारजी, यांच्या समवेतच आम्हांला इथला मस्कऱ्या गणपतीही बघायला मिळाला. सर्व रेग्युलर गणपतींचीच नव्हे तर स्पेशल मस्कऱ्या गणपतींचीही विसर्जनांची वेळ आजवर टळून गेली होती. पण जातीय दंगलींच्या भयामुळे सदरहू मस्कऱ्या गणपती बिचारा किती काळची वाट बघत थांबला होता. निष्ठावंत मंडळी त्याची रोज पूजा-अर्चा करीत होती. पुढच्या वर्षी लौकर या अशा घोषाऐवजी हा मंगल मोरया पोलिसांचा ' या वर्षी येथेच राहा ' हा आग्रह ऐकत होता.

खामगाव सोडल्यानंतर कितीतरी वेळपर्यंत कोल्हटकरांचे ' प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ' कानात गुंजत होते. रात्री कधीतरी बुलढाणा आले. त्यासाठी गाडीला उंच उंच चढावे लागते. कित्येक ठिकाणी वळावे लागते.

तेथले पब्लिसिटी ऑफिसर श्री. पाथरकर हे आमचे सुहृद. त्यांच्या घरमालकाचे नावच आम्हांला आठवेना. शेवटी एका रात्रपाळीस निघालेल्या शिंपीवर्यांनी ते सांगितले व रस्ताही दाखवला. एक दोन हाका मारल्यानंतर वरच्या खिडकीतून एक चेहरा व दिवा डोकावला. तेच श्री. पाथरकर अशी खात्री झाल्यावर आम्ही त्यांना खाली बोलावले व संध्याकाळी येणार होतो तेच आम्ही पाहुणे या मध्यरात्री आलो आहोत ही खात्री झाल्यावर मग पाथरकरही खाली आले. एका सुंदर पण अर्ध्यातच विचकलेल्या झोपेच्या रेंगाळत्या आठवणी चेहऱ्यावर जपत त्यांनी आम्हांला एका खानावळीत झोपायला नेले.

खानावळ वाईट असली तर तेथे झोपण्याची सोय हमखास चांगली असते. कारण त्या ठिकाणी जेवणारांच्या वेचव व अपुऱ्या रक्ताचा निषेध करून ढेकूण-मंडळींनी देशत्याग केलेला असतो. प्रस्तुत खानावळ मात्र उत्तम असूनही तेथे ढेकणे नव्हती म्हणतात. ही माहिती मिळाल्याने आमच्यावर कसलाही परिणाम झाला नाही. कारण ढेकूण काय पण त्याचा बाप आला असता तरी आमचा निद्रानाश करण्याची त्याची आजच्या रात्री प्राज्ञा नव्हती. ढेकणाचे संगे हिरा भंगेल; आमची झोप नव्हे ! विशेषतः माझ्या झोपेने ढेकणांइतका इन्सल्ट दुसऱ्या कोणाचाही केला नाही. आम्ही वरच्या खोलीत जाऊन आमच्या नावावर बुक झालेल्या पलंगावर देह ठेवला. बुलढाणा हे हिल-स्टेशनच्या कुटुंबात मोडते. त्यामुळे थंडी बरीच होती. गव्हाणेने माझी शाल व ब्लँकेट पापळलाच ठेवले होते ते तशा शीतल वातावरणात आढळून आले. त्या कारणाने झोपेचा निरुत्साह होण्याची लक्षणे दिसू लागली. माझ्या सोबत माधवरावांनी जागावे म्हणून मी युक्ती केली. " माधवराव, मराठी कवितेत व कवींमध्ये तुम्हांला रस असेलच... "

" आहे. कवितेत रस असेल तर मलाही ती ऐकण्यात रस येतो. पण आता कृपा करून तुमच्या कविता म्हणू नका. माझा नाही पण मामासाहेबांचा विचार करा. "

" माधवराव, माधवराव ! " ' त्रस्त समधा शांत हो ' या चालीवर त्यांना एकदोन आर्त हाका मारून मी त्यांना म्हणालो, " अहो, तुम्ही खरोखरीच अरसिक ! म्हटलेच आहे की ' महाराष्ट्र कवि-परंपरा खंड न पडला तिला जरा... "

" होय " माधवराव म्हणाले, " आणि पुढे हेही खरे आहे की—उणीव

रसिकांचीच खरी...वगैरे...

" त्या सुंदर ओळी लिहिणाऱ्या कवीचेच हे गाव ! Bee कवी या शहरात होते. त्यांचे ठिकाण पाहायला चलता काय ? "

माधवरावांच्या ' परित्राणाय ' व माझ्या ' विनाशायच दुष्कृताम् ' मामासाहेब धावून आले; याचा अर्थ ते अक्षरशः माझ्या अंगावरच धावले, " तू मुकाट्याने झोपतोस की नाही ? एकट्या पाथरकरांचेच घर शोधता शोधता या रात्री नाकी नऊ आले, आणि हा शहाणा आता त्या दिवंगत कवीचे घर शोधणार. येथे Bee होते हे आता गावकऱ्यांना आठवत तरी असेल काय ? "

मामासाहेबांचेही खरे होते. कारण यापूर्वी मी बुल्ढाण्याला आलो तेव्हा इथल्या एका प्रसिद्ध कवीलाही ती माहिती नव्हती याची मला आठवण झाली. Bee बिचारा सामान्य कारकून. खामगावच्या विनोदाच्या जनकाच्या घरांची जर ती करुण अवस्था तर Bee च्या घराला कोण विचारणार ?

मामासाहेबांचा उपदेश कोणालाही पटावा असाच त्यांचा आवेश होता. माधवराव तर तोपर्यंत घोरूही लागले होते. Bee कवींच्या घराचा शोध मी मनापासून रद्द करावा म्हणून मामासाहेबांनी माझ्या भरपूर पांघरुणाची सोय केली. मीही मग आज्ञाधारक लहान मुलासारखा अंथरुणात शिरलो. बाळपणी लवकर झोपण्यासाठी माय मला बागुलबुवाची भीती दाखवत असे. तो बागुलबुवा पाहण्याचे राहून गेले होते. तो मामांच्या चेहऱ्याचा असणे शक्य आहे.

## सातवा दिवस

बुल्ढाण्यास त्या रात्री झोप एकदम फर्स्टक्लास मिळाली. सकाळी सकाळी मात्र अंगावर एक महावृक्ष येऊन बसल्याचे स्वप्न पडले. त्या महावृक्षाला काही मॅनर्स शिकवाव्या म्हणून मी जरा डोळे किलकिले केले. बापरे, त्या झाडाचे एक मामासाहेब झाले होते. मला उठवण्याचे सर्व प्रयत्न थकल्यावर त्यांनी ही प्रेशर मेथड अवलंबिली होती. मी आता पुरता जागा झाल्यामुळे, त्यांच्या नुसत्या शब्दांचेही वजन माझ्यावर पडणार होते, त्याकारणाने मग त्यांच्या देहाचे वजन येथून दूर झाले, पुन्हा झोपण्याचा एक प्रयत्न मी करून पाहला. मामा दुसरे कधी नसले तरी मी व्यवहारचातुर्य दाखवले म्हणजे खूष होतात हे मी जाणत

होतो. " बेटे सारे शिकले M. A. पर्यंत; पण एक पैशाचा सौदा आणता येत नाही, व्यवहारात गधेच राहिले " ही वाक्यावळ पुष्कळदा त्यांना माझ्याही संदर्भात उपयोगी पडली होती. तो काळीमा अनायासे धुऊन टाकावा म्हणून मी म्हटले,

" मामा, या संपूर्ण प्रवासात झोपण्याचे पैसे फक्त याच गावी द्यावे लागले. आपण पूर्ण रात्र तर येथे राहलोच नाही. अर्धी रात्र म्हणून काही तो अर्धा दर घेणार नाही. "

" बरं; म्हणणं काय तुझं ? "

" तेच, तेच ! " मी जरा उत्तेजित झालो, " तेव्हा आपण जर आणखी चार तास झोपले तर पूर्ण पैसे वसूल केल्यासारखे होईल... "

" वसुलीची फिकीर तुला कशाला ? ते पैसे काय तुझ्या बापाने दिले आहेत ? "

कोठलाही मामा या प्रदेशात क्रोधप्रसंगी आपल्या भाच्याच्या बापाचाच उद्धार करीत असतो. त्या ' भाच्याच्या बापा 'ला बहीण दिल्याची एकदा केलेली चूक अशा रीतीने पुन्हा पुन्हा सावरण्याची ही खास वऱ्हाडी प्रथा आहे. पश्चिम महाराष्ट्रात ती आहे की नाही कोणास ठाऊक. मामा हा सहज बोलण्यातदेखील आपल्या प्रिय भाच्याला सांगत असतो, " तुझा बाप मेला, तुझ्या बापाचा पाय लंगडा झाला इ. इ. "

माझे व्यवहारज्ञान त्यांना थक्क न करू शकल्यामुळे, मला पुन्हा झोपणे अशक्य झाले, मी सकाळच्या चहाला तयार होईस्तो मामासाहेबांनी व गड-कऱ्यांनी दाढीचा कार्यक्रम आटोपला. दादाला दाढीचे वय नसल्यामुळे, तो त्या उरलेल्या वेळेचा सदुपयोग म्हणून माझ्यासोबत चहा घेऊ लागला. तेवढ्यात पाथरकर आले. आमच्या कॅमेऱ्याच्या आजाराचे वृत्त त्यांना कुठल्या टेलीपथीने कळले कोणास ठाऊक; पण त्यांनी सोबत खामगावच्या खेकाळ्यांना आणले होते. त्यांचा एक रंगीत फोटो काढणारा, पाथरकरांचा काळेपांढरे फोटो काढणारा व आमचा रंगातीत फिल्म ठेवणारा असे तीन कॅमेरे पाथरकरांच्या घरच्या टेबला-वर एकमेकांशी सुखसंवाद करू लागले. खेकाळे व पाथरकर या मंडळींनी घेतलेल्या फोटोंचे आल्बम आमचे पाव्हणे कौतुकाने बघत असताना मी त्यांच्याकडच्या बशा चवदार असल्याचे सर्वांना सांगू लागलो. फराळानंतर चहा घेऊन आम्ही

चिखलीकडे निघालो.

यावेळी गाडीमध्ये गर्दी छानच होती. त्यामुळे काही वेळा तिच्यात दत्तक-विधान पद्धतीने बसायलाही मिळत होते. या सुंदर सकाळी मामासाहेब खूपच खूष होते. आम्हांला आमच्या वयाचे विनोद ते करू देत होते; आणि स्वतःही विनोद करीत होते. कारमधल्या गर्दीला पाहून त्यांनी या प्रदेशाचे महान वैशिष्ट्य ठरलेल्या ' लंदफंद ' गाड्यांचे वर्णन सुरू केले. हा नादमधुर शब्द गडकऱ्यांना नवा होता.

" अहो, लंदफंद हा शब्द इकडे इतका प्रसिद्ध आहे की शेंबडा पोरगाही कधी त्याचा अर्थ विचारणार नाही. ' तरुण भारत ' सारख्या इकडच्या प्रमुख पत्रात लंदफंद कंपनीच्या मोटारीवर खास बातम्या येतात. "

' लंदफंद ' ! खरेच लंदफंद म्हणजे काय ? तो शब्द आमच्या इतका परिचित झाला आहे की त्याचा अर्थच आम्ही कधी शोधला नाही. ' देव ' सर्वांना माहीत आहे. पण त्याचा अर्थ व व्याख्या ? ती मात्र पंचाईत आहे. ' लंदफंद ' या शब्दाला अर्थ कदाचित नसेलही. नादमधुरता मात्र निश्चित आहे. शिवाय त्या शब्दाच्या उच्चारामध्ये अनेक घटनांच्या आठवणींना आकार देण्याचे बळ आहे. तो शब्द नुसता कानावर येऊ द्या— एकदम एका लहानशा मोटारीचे चित्र समोर उभे राहते. तिच्यावर ' सद्गुरु कृपा मोटार सर्वीस ' ' टाकरखेडा संभू ते बोरगाव मंजू ' अशी किंवा ' हाजी अब्दुल हाजी करीम ट्रैफीक कंपनी ' वगैरे प्रकारची एक पाटी असते. त्या मोटारीत पॅसेन्जरांना बसण्यासाठी निरुंद फळ्या असतात. त्यांवर हजामतीला आलेल्या केसांसारख्या चिंध्या झेपावणाऱ्या गाद्या असतात. तेवढ्या कारणाने त्यांना बेंच म्हणायचे. त्या गाड्यांमध्ये अधिक उतारूंच्या सोयीसाठी फळीवरच्या उतारूंच्या पायाजवळ काही पोकळ जागा राखलेली असते. त्या अभिनव जागेला ' बगिच्या ' असे म्हणतात. मग दहा सिटांच्या गाडीमध्ये सद्गुरुकृपेने किमान पंचवीस माणसे बसण्याचा चमत्कार घडतो. घरी चहा न मिळाल्यामुळे बेकायदेशीरतेवर अत्यंत रागावलेला एखादा पोलिस ही लंदफंद मोटार अडवतो. पोलिस जात ही प्रेमळ आहे. ती उतारूंचा फार वेळ खोळंबा करीत नाही.

एकदा काय झाले की नागपूरचे कलेक्टर दिनकरराव देशमुख त्यांच्या गावी म्हणजे काटोलला गेले. का कोणास ठाऊक पण त्या दिवशी त्यांनी लंदफंद

कंपनीच्या मोटारने प्रवास केला. त्यांना कलेक्टर म्हणून ओळखण्याचे भानच कोणाला राहले नाही. ते त्या मोटारीत फळीवर बसले की बगिच्यात ते माहीत नाही. पण गर्दी त्याही दिवशी आपली पूर्वपरंपरा राखीत होती. काटोलला पोचल्यावर त्यांना ओळखणाऱ्या मोठमोठ्या ऑफिसरांनी त्यांना सॅल्यूट ठोकल्यावर 'लंदफंद' मंडळीस एकंदर घटनेचा पत्ता लागला.

या मोटारींना बंदी करून S. T. का सुरू करीत नाही हा पाव्हण्यांचा प्रश्न. तो अर्थातच अप्रस्तुत. येथल्या राजकारणाचे पूर्ण ज्ञान नसल्यामुळे, त्यांना निवडणुकीत या मोटार कंपनीवाल्यांच्या भरंवशांवर निवडून यायचे नसल्यामुळे, त्या मुंबईकरांनी हा अनावश्यक प्रश्न येथे उपस्थित केला होता. S. T. ही विदर्भात काही ठिकाणी आहेच. पण नॅशनलायझेशन हे एकदम कसे होणार? कोणतीही गोष्ट हळूहळू केल्याने तिचे परिणाम टिकावू होतात. लॅंड शिलींग वगैरे बिले येथे फार रेंगाळली, प्रायव्हेट मोटार कंपन्यांचे येथे फार लाड होतात वगैरे गाऱ्हाणी करणारे लोक भावी इलेक्शनसाठी लागणाऱ्या पैशांचा व पाठिंब्याचा विचारच करीत नाहीत. मुंबईत येवढ्यात असेच बँक लॉकर उघडून पैसे जप्त करण्याची एक घाईची मोहीम निघाली म्हणे. करा म्हणावे हे उपद्व्याप. मग ऐनवेळी इलेक्शनचे फंड गोळा झाले नाहीत म्हणून बोंबा तरी मारू नका. एक करतो व साऱ्या उमेदवारांना ते भरावे लागते. अर्थात विदर्भाच्या पुढाऱ्यांना तेवढा सेन्स असल्याबद्दल मला तरी त्यांचा अभिमान वाटतो. लंदफंद कंपनी जिंदाबाद!

चिखलीकडची आमची सडक भरघोस पिकांच्या शेतांमधून मोठ्या दिमाखाने धावत होती. मधूनच उसाचे मळे व त्यावरचे रंगदार तुरे दिसत होते. या बाजूने उसाची लागवड कारखान्यास हव्या असलेल्या एकरांच्या दुप्पट आहे म्हणून इकडे साखरेचा कारखाना काढायला सरकार संमत आहे ते कळले. आजवर त्यासाठी संमत का नव्हते ते अर्थातच कळले नाही. तेच इलेक्शन वगैरेचे कारण असेल. या लोकशाहीत निवडणुका वगैरेची उगीचच भानगड असल्यामुळे, निष्कारण अनेक अवधाने पाळावी लागतात.

मधूनच ज्वारीची शेते लागत होती. आमच्याकडच्यापेक्षा ही वेगळी जात. वऱ्हाडात नाही म्हटले तरी ज्वारीच्या पन्नास जाती असतील. तांदळाचे सारे प्रकार मुखोद्गत असतात. चिनोर, काली कमोद, हिरानखी—अशी सुबक

नावे ! कारण तो तांदूळ. द्राक्ष हेही या भारतात भूक भागवणाऱ्या ज्वारीपेक्षा महत्त्वाचे. द्राक्षांचा मळा लावला तर त्या मालकाचा त्याच्या मळ्यासह फोटो येतो. ज्वारीच्या वाट्याला हा सन्मान येत नाही. अन्न-समस्या शमवण्यापलीकडे ते धान्य महत्त्वाचे असे काहीच करीत नाही. मंत्र्यांनी समारंभपूर्वक भेट द्यावी अशी त्या ज्वारीच्या पिकवण्यात थोडी तरी शोभा असते काय ? शिवाय द्राक्षाच्या मळ्यासारखे त्यासाठी हजारो रुपयांचे खत, लोखंडी कमानी वगैरेही लागत नाही. म्हणजे काय की ज्वारीचे पीक हे एकदम फडतूस !

खरा सन्मान हा द्राक्षवाल्यांऐवजी ज्वारी पिकवणारांचा व्हावा असे मामासाहेब लोंढे एका बैठकीत परवा म्हणाले. आपण बुवा काहीच बोललो नाही. म्हटले एखाद्या तज्ज्ञाने ऐकले तर उगीच ब्रालंट यायचे. गरिबांना स्वस्त ज्वारी द्यावी म्हणून नारायणदास राठी आजकाल धावपळ करीत असतात. तोटा सहन करणाऱ्या व्यापाऱ्यांची एक संघटना त्यांनी चालवली आहे. अस्सल मारवाडी रक्ताला मुळीच न शोभणाऱ्या त्या उठाठेवीपासून मी नेहमीच दूर राहात आलो.

ज्वारीच्या बाकी जाती आठवो न आठवो; पण पुसदकडे पिकणारी एक ज्वारी मला नेहमीच आठवते. तिचे नाव आहे — उभा धिंगाणा ! इतका सुंदर प्रकार कवींनी अजून काव्यात उपयोगू नये ! अख्ख्या यवतमाळ जिल्ह्यातील राजकारणाच्या उभ्या धिंगाण्यापेक्षा हा पुसदचा ' उभा धिंगाणा ' रुचकर आहे.

पाव्हण्यांना हे ज्वारी प्रकरण फार आवडले नसावे अशी शंका मामासाहेबांना आली. माझी वटवट बंद करण्यासाठी त्यांनी एकदम म्हटले, " अरे, ते बघ रस्त्यावर काय आहे... "

...नितळ डांबरी रस्त्यावर वाढते ऊन्ह चकाकत होते व त्यावर काही टपोर फळे सांडली होती. जांभळासारखी काळी अन् तुकतुकीत कांतीची. नुसती झळकत होती ! जांभळे का ? छे ! या डिसेंबरात कुठली आली जांभळे ! नावात काय आहे ? ती फळे चवदार असतील यात शंकाच नव्हती. अहो, नुसत्या ब्राह्य रंगावरून व मोहक आकारावरून मी फळांची चव ओळखतो. उगीच नाही मला मोठमोठे लोक...मामासाहेबांनी गाडी थांबवून मला धक्का देऊन खाली उतरवले. मी त्या गोड धक्क्यासरसा पुढे झेपावून ती फळे हाताने उचलू लागलो. इतकी देखणी फळे ! आणि अशी बेवारस पडलेली. ईश्वर दयाळू

आहे. आणि गाडी थांबवणारे मामासाहेब तर...मी अत्यंत कृतज्ञतेने त्यांच्या-कडे पाहिले. तो दयासिंधू व त्याचे यात्रेकरू सोबती माझ्याकडे पाहून हासत होते. आमची नजरानजर झाल्यावर त्या स्मितरूप अशा दर्शनक्षम हासण्याला श्राव्यता आली. त्या प्रचंड खो खो हासण्यामुळे सृष्टिदेवताही रागावली असावी व कोपभराने तिने शाप दिल्यामुळे समोरच्या सुंदर फळांचे अक्षरश : ' शेण ' झाले. माझेही ' शिणलेले हेतू शेण झाले ! ' समोरचे शेण गाईंचे नसल्यामुळे मी फसलो होतो. त्याचा आकार असा छोट्या पण टपोऱ्या फळांसारखा होता. त्या आकाराचे स्पष्टीकरण करण्यासाठी त्या रस्त्याने पुढे आम्हांला उंटांचा काफलाही दिसला. या सर्व प्रकारात ही सोबती मंडळी का हासत होती तेच कळेना. हो, आणि पुन्हा हसायचे म्हणजे काय ? जाऊ द्या चिखली आली. तेथल्या ब्लॉक डेव्हलपमेन्टच्या प्रमुख कर्मचाऱ्यांकडे चहा घेतला.

या B. D. O. बाई सौ. मामींच्या मैत्रीण. त्या कारणाने मामासाहेब त्यांना पाहुण्यांच्या स्नानापासून जेवणापर्यंत व्यवस्था करण्याबद्दल विनंती करण्या-ऐवजी सरळ सरळ ऑर्डर्स सोडू लागले. आपली सख्खी बहीण या माणसाच्या घरात नांदते आहे; म्हणून त्या बाईंनीही ती सारी मिजास सहन केली. दादाला अर्थातच मायपेक्षा मावशी गोड व मलाही प्रवासातल्या इतर कोणापेक्षाही मावस-मामी गोड असा प्रत्यय आला. आम्हीही मग त्याच अधिकाराने आमच्या खाण्यापिण्याच्या स्पेशल फर्माइशी बाईच्या म्हाताऱ्या आईजवळ रुजू केल्या. आम्ही लोणारहून परत येईपर्यंत ते सर्व पदार्थ तयार होणार होते. शिवाजी संस्थेचे कोणी काही लागो न लागो; त्याबाहेरचा एक गोतावळा पंजाबरावांनी मिळवला आहे. कळत नकळत त्या सर्व मित्रपरिवाराचा उपयोग त्यांच्या संस्थेला होतोच.

स्नाने व चहा आटोपून पुन्हा एकेक चहा घेण्यासाठी आम्ही चिखलीच्या शिवाजी शाळेत जाऊन थडकलो. शाळेने बांधलेले नाट्यगृह ( ही संस्था काय वाटेल ते बांधील; आणि काय वाटेल ते करील ! आजीला परवा शाळेच्या स्नेहसंमेलनाला घेऊन गेलो तो तेथे विद्यार्थ्यांबरोबरच कृषक समाजाचे आणि पालकांचेही संमेलन ! असो ), सायन्स हॉल, भव्य वसतिगृह वगैरे पाहल्यानंतर आम्ही लोणारकडे निघालो.

या माधवरावांच्या निमित्ताने मला हे लोणार आज प्रथमच दिसणार होते.

जाणार, येणार, खाणार या शब्दांच्या जातीतले हे लोणार मला लहानपणापासूनच कुतूहलाचे. हे काय गावाचे नाव झाले ? विदर्भात हा बुलढाणा जिल्हा स्वभावाने जरा विचित्रच आहे. हा जिल्हा पूर्वी नव्हता म्हणतात. कोण्या हौशी इंग्रज गव्हर्नराने नव्या इमारती, निदान पायाचे दगड इ. चा नाद धरण्याऐवजी एक दिवस हा नवा जिल्हाच निर्माण केला. आता हे खरे आहे की नव्या इमारती-सारख्या नव्या जिल्ह्यासाठी काही दगडविटांचा किंवा चुनासिमेंटाचा खर्च येत नाही. प्रदेशाची पुनर्रचना आजकाल मात्र थोडीशी खर्चाची पडते. वंगभंगाचा खर्च बराच आला म्हणतात. नाही कुठला तरी सरहद्दसत्याग्रहींच्या बंदोबस्ताचा पोलीस खर्च होतोच. तर सारांश काय की हा नवा जिल्हा मात्र त्या पांढऱ्या साहेबाने बिनबोभाट जन्माला घातला. त्याच्या राजधानीने म्हणजे त्या बुलढाण्याने मात्र अजून म्हणावे तसे अंग धरले नाही. शिवाजी संस्थेने आता तेथे कॉलेजच काढले तेव्हा त्याचा मान राखण्यासाठी थोडीशी वस्ती वाढलीही असेल; पण म्हणून काही त्याला अमरावतीचे राजतेज आले नाही. या देशात लोकसंख्या वाढणे ही काही आजकाल मोठ्या खास कर्तबगारीची गोष्ट राहली नाही. बुल-ढाण्याची हवा मात्र याही संदर्भात थंडच म्हणावी काय ? अर्थात एखाद्या खेड्याला जिल्ह्याची राजधानी म्हटल्याने काही त्याची कळा पालटणार नाही. म्हणतात ना की आधी होती दासी। पट्टराणी केले तिसी। तरी तिचा मूळ स्वभाव जाईना. आणि आमच्या वऱ्हाडात पुन्हा एक गोम आहे. राणीला घालून पाडून बोलण्याने काही तिचा रुबाब जात नाही. नागपूरचीच गोष्ट घ्या. नसेल राहले ते राजधानी; पण डामडौल वाढताच आहे की नाही ?

तर काय की या काल बारसे झालेल्या जिल्ह्यात विचित्रपणा बहू ! समुद्राचा आसपास शंभर कोसही मागमूस नसताना येथे मात्र लोणारचे खारे सरोवर. समुद्र दूर असल्यानंतर मिठाचे डोंगर असणे मी समजू शकतो. पण सरोवराचे पाणीच खारे म्हणजे जुलूमच की नाही ? आणि गावाची नावे ? बुल्ढाणा ! लावीत बसा अर्थ ! ढाण्या बैल ? बहुलधान्या ? बल धन ? बालधनी ? बलधन्या ? जाऊ दे.

आणि त्याहून सरस कोडे या लोणारचे. तिसरीत असताना लोणार शब्द भूगोलात वाचला तेव्हा 'होणार ते होणार अन् शंकर सोनार' ही आमची गावम्हण आठवली होती. त्या गावी म्हणे विष्णूने एक लवणासुर नावाचा राक्षस

मारला होता. राक्षसांना मारण्याचा हा त्या देवाचा प्रमुख छंद मला माझ्या आत्येने सांगितला होता. त्यामुळे ती बिचारी जमातच नष्ट झाली म्हणतात. लोपू पाहणारे अनेक प्राणी म्हणजे क्रूर वाघ-सिंहदेखील आणि ग्रीक लॅटिन नावाचे बॉयालॉजीतले इतर यच्चयावत प्राणीही आजकाल रक्षिले जातात. नाही जिवंत तर निदान त्यांचे उत्खननातले अवशेषदेखील हाडकांच्या लायब्ररींनी जपले आहेत. गिरनारच्या की कुठल्यातरी जंगलात म्हणे नष्ट होऊ पाहणाऱ्या सिंहांची मुद्दाम लागवड केली गेली. आणि फ्रेंचांपासून मुसलमानांपर्यंत अनेक संस्कृती जपणाऱ्या आमच्या लोकशाहीने राक्षस संस्कृतीची व तिच्या पुनरुद्धाराची काहीही दखल घेऊ नये म्हणजे काय ? भगवान विष्णूचा तो मारका छंद या विदर्भातही उताला आला.

बाकी या विदर्भभूमीचे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल. कृष्णाचा हात धरून पळून गेलेल्या पोरीपासून तर विष्णूने पिटून काढलेल्या लवणासुरापर्यंत सर्वांचे कौतुक येथे झाले. कुस्ती जिंकणाऱ्या पैलवानाचे नाव एखाद्या हॉलला देणे ठीक आहे. हरक्युलस वगैरे अजिंक्य पैलवानांची नावे सायकलीला देण्यातही फारसा विनोद नाही; पण कुस्ती हारलेल्या लवणासुराचे नाव ! आणि तेही एखाद्या मामुली सभागृहाला किंवा खिडकी दरवाजाला नव्हे ! पूर्ण गावाला त्या राक्षसाचे नाव ! याला म्हणतात कौतुक ! आणि ते जवळचेच मेहकर ? तीही एका मेघासुर नावाच्या राक्षसाचीच आठवण. त्यालाही त्या विष्णूनेच मारले म्हणतात. छंद एकेकाचा !

लोणारला खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे ही काही मोठी गोड बातमी नव्हे. त्या पाण्यात समुद्रासारखी रत्नेही सापडत नाहीत. पण पन्नासच्या वर प्रकारांचे तेजाब त्या पाण्यावर तरंगते अशी माहिती मला मिळाली होती. ते तेजाब काढण्यासाठी मुद्दाम काही रासायनिक क्रिया कराव्या लागत नाहीत. वऱ्हाडला एक देणगी निसर्गाने दिली आहे. फारसे श्रम न करता येथे अमाप पिकते. तसेच ते तेजाबही आयतेच वर येते म्हणे. तेजाब व सौंदर्यदृष्टी किंवा खारे पाणी व सौंदर्यदृष्टी या काही जुळणाऱ्या गोष्टी नाहीत. पण आजच्या मॉडर्न आर्टमध्ये कालपरवापर्यंत कुरूप ठरलेल्या गोष्टींचा सौंदर्यात समावेश होत असतो. तद्वतच कसल्यातरी द्रव्यांचा मुळ्यांवर परिणाम होऊन इथली झाडे विचित्र आकाराने वाढली आहेत. पण तेजाबाने झाडे वाढतात का ? नेमही नाही. विषकन्येसारखा हा

प्रकार असेल. ते विचित्र आकार क्युबिझमच्यासारखे अनिलांना वाटतात. अनिल कवी आहेत. आजकाल बऱ्याच कवींचे मॉडर्न आर्टशी पटते. नाकाच्या ठिकाणी कान, व पायाच्या ठिकाणी पोट दाखवणाऱ्या त्या क्युबिझममध्ये दुसरी कसली नाही तरी रेषांना वेड लागलेले पाहण्याची गंमत असते. रंग व रेघा यांना भ्रमिष्टपणा आला म्हणजे त्या अक्षरासारख्या आकृत्या काढू लागतात. लवणासुर मेला. त्याने क्युबिझममध्ये व लोणारच्या त्या विचित्र झाडांच्या आकारात तर अवतार घेतला नसेल ना?

आम्ही लोणारला पोचलो व आश्चर्य हे की एक शाळा समोर मूर्तिमंत दिसत असूनही मामासाहेबांनी कार पुढे नेली. ही त्या विष्णूची कृपा म्हणावी की त्या लोणारचे अथांग अफाट जलाशय! बाजूला विष्णुमंदिर. पण विष्णूच्या स्मृतीपेक्षा लवणासुराची स्मृती अतिशय मोहक. लवणासुराच्या नावावर असलेल्या या तळ्याला जो एक देखणा अफाटपणा आहे तो खास त्याचा आहे. निसर्गाने त्याला सजवले आहे. विष्णूचे मंदिर अर्थातच या किंवा काही शतकांपूर्वीच्या माणसांनी बांधलेले. माणसालाच भव्यपणा नाही तर त्याच्या कृतीला कोठून येणार तो? तेथे एक संतत धार पडत आहे. ही पूर्वीची पाणी-योजना. पाणी रुचकर आहे. सार्वजनिक प्रयत्नांना ‘ म्युनिसिपालिटी ’ हे नाव येण्यापूर्वीचा हा उपक्रम म्हणून तो अजूनही शाबूत आहे. त्या जोरदार धारेतून एक पाय उंचावून त्या आधारावर कळशी भरणाऱ्या बाया जेव्हा बाजूची कडी एका हाताने धरतात व झर्रकन गिरकी घेऊन ती जलपूर्ण कळशी बाजूला घेतात तेव्हा त्या हालचालीला एक कलात्मक आकार येतो. तेच पाहत उभे राहावेसे वाटते. त्या मंदिरात बाकी पाहण्यासारखे फारसे काही नाही. काही लोक तेथे स्नान करतात. कारण ते एक पवित्र तीर्थस्थान मानले जाते. स्नान केलेला माणूस ठीक आहे; पण स्नान करणारा—आणि तोही तीर्थाच्या ठिकाणी!

मंदिरात बाकी काहीच पाहण्यासारखे नाही म्हटले खरे; पण तेथे वाचण्यासारखे पुष्कळच आहे. तेथे यात्रा भरते तेव्हा यात्रेकरूंना ते देऊळ स्वच्छ ठेवण्याबाबतच्या काही सूचना तेथे भदाड्या अक्षरात लिहिल्या आहेत. अक्षरांच्या आकृत्यांवर त्या क्युबिझमचा काही तेजाब परिणाम झाला की काय न कळे. लेखनातली अशुद्धीही त्या ठिकाणी क्षम्य समजावी.

तलावाच्या काठी उगवलेली झाडे! त्यांचे दृश्य म्हणजे खट्याळ पण लोभस

पोरीने लाडे लाडे थट्टा करीत घातलेली हिरव्या करड्या रंगांची रांगोळी वाटते. ती एक नेहमीच्या सौंदर्यदृष्टीला फसवणारी मयसभा आहे. एखादा लहान बालक बोबडे बोलत बोलत व्याकरणाचे नियम तुडवू लागला तरी त्याचे कौतुकच होणार. तशी त्या लवणासुराच्या जलाची सुरावली त्या उन्हात थबकत थबकत फिरत होती. मंदिरातली अक्षरे मात्र कॉपी करून मराठीत M. A. झालेल्यांचा उच्चार-विलास !

सरोवराच्या वरच्या काठाला बेंच ठेवल्यासारखा बांध घातला आहे. त्यावर बसून समोरच्या पाण्याची व हिरव्या वृक्षांच्या रंगावलीची मौज आम्ही लुटली. चार कदमांवर डाकबंगला होता. त्या डाक बंगल्याच्या ओसरीतूनही सरोवराची शोभा दिसते. देऊळ पुरातन होते की नाही हे मी विचारण्याच्या भानगडीत पडलो नाही; पण डाक बंगला काही येवढ्यातला नव्हे हे मी पक्के समजलो. तो निश्चित आपल्या रसिकपणाने साम्राज्य भोगणाऱ्या इंग्रजांनी बांधला असेल. त्यासाठी हे ठिकाण निवडणारा माणूस हा नक्कीच आजकालच्या विकास योजना आखणारा नव्हे. निदान त्या विकास योजनेच्या खुरट कोंबडीसारख्या दिसणाऱ्या इमारती बांधणाऱ्या जमातीतला तर तो मुळीच नव्हे. मुसलमान सम्राटांनी आपल्या शिल्पकलेच्या हौसेने देश मढवला. सुंदर मूर्तींचे भंजन करणाऱ्या त्या अधर्मी जेत्यांनी निदान स्वतःसाठी तरी सुंदर इमारती बांधल्या. पण निधर्मी सरकारने ? विकास करण्याची गर्जना ठोकीत नेमक्या त्या योजनेच्या इमारती तरी सुंदर——

लोणारच्या डाक बंगल्यात चहा फार चवदार लागतो हा गडकरींचा शोध. त्यासोबत चिवडाही निदान चिवड्यासारखा लागावा; पण माझ्याकडे फारसे कोणाचे लक्षच नव्हते. सर्वच लोक खेकाळयांच्या रंगीत कॅमेऱ्याकडे आशेने बघत होते. लोणारचे सौंदर्य आधाशी नजरेने टिपून झाल्यावर त्याची मेहेरनजर आता आमच्याकडे वळली होती. रंगीत फोटोसाठी नॅचरल पोझ देण्याची कल्पना राऊतांनी काढली. पण सहजपणाने कसे बसायचे यावर मतैक्य होईना. सहजपणा येण्यासाठी आम्ही तऱ्हतऱ्हेने बसून पाहिले. आपल्याला वाटणारी सहज पोझ इतरांना मुद्दाम घेतलेली वाटत होती. कल्पनेचे जनक राऊत यांनी त्या सहजपणासाठी म्हणून तेवढ्यातल्या तेवढ्यात एक कुत्र्याचे पिलू कोठून तरी मिळवले; पण ते बेटे तेथे सहज बसायला तयारच होईना. कुत्र्याला कॅमेऱ्याची

चव कळत नाही हेच खरे. त्या कुत्र्याला एखाद्या उद्घाटन समारंभाचे आमंत्रण त्याच्या बापजन्मीही मिळू नये असा शाप देण्याइतके त्याने आमच्या कॅमेऱ्यास नाराज केले. फोटोत कुत्रा वगैरे ठेवण्याबाबत मामासाहेब अत्यंत प्रतिकूल. आम्हांला न कळवता खेकाळ्यांनी एक स्नॅप घेतला. पण त्यात आपली सहज पोज आली असेल की नाही याबद्दल सर्वांनाच संशय निर्माण झाला. मग सर्वांना सावध म्हणजे रेडी म्हणून एक स्नॅप पुन्हा घेण्याचे ठरले. प्रयत्नपूर्वक सहज-पणा आणण्याची जबाबदारी मग गडकरींनी घेतली. त्यांच्या मुंबईत म्हणे डोक्यावरच्या बटांचा अरेन्ज्ड दुर्लक्षितपणा फारच छान सांभाळतात. माधव-रावांनी आताच्या या 'वेल प्लॅन्ड ॲज इट इज' साठी माझ्या कवितांचा आधार घेतला. खेकाळ्यांना खूण करून ते सभोवतीच्या मंडळींस म्हणाले, "तुम्हीच सांगा या माणसाच्या कवितांमध्ये काही दम असतो काय?"

त्यावर मग सर्वजण हसायला लागले. मी सोडून सर्वांचे फोटो छान निघण्याचा संभव निर्माण झाला. 'गडकरी हे विद्वान टीकाकारच नाहीत' असे ओरडून मीही हसलो. तोपर्यंत सेल्फवर लावलेल्या कॅमेऱ्याची क्लिक सुरू करून स्वत: चित्रांकित होण्यासाठी खेकाळेही धावत आले व आमच्या सहज गर्दीत मिसळले. कॅमेरा कॉन्शस दिसू नये म्हणून कोणीही त्याच्या भिंगाकडे पाहू नका असा त्यांनी आदेश दिला होता. त्यामुळे व माझ्या कवितेवरील त्या उनाड चर्चेमुळे सेल्फ कधी दबला तेच कळले नाही. नेहमीच्या दहाबारा सेकंदांचा अवधी केव्हाचाच संपून गेला होता. पण कॅमेऱ्यात काहीच हालचाल दिसेना. शेवटी खेकाळे त्याच्या जवळ गेले. फोटो कधी तरी म्हणजे मघाच्या कल्लोळात निघून गेला होता.

कोणत्याही प्रेक्षणीय ठिकाणी आपला फोटो घेऊन झाल्यानंतर बघण्यासारखे काहीच उरत नाही. त्यामुळे आम्ही तेथून निघालो; गावातल्या एका हेमाडपंती देवालयात गेलो. तेथले दगडांवरचे कोरीव काम पाहून डोळ्यांचे पारणे फिटले. काही पडझड झाली ती पुन्हा जोडणे कठीण आहे. याही देवळात विष्णूची मूर्ती आहे. या देवळाच्या मालकीबद्दल हिंदू-मुसलमान झगडा झाला होता म्हणे.

लोणार सोडून आमची गाडी मेहेकरकडे धावू लागली. मेहेकरला सावजी मंडळी फार श्रीमंत. त्यांची जुन्या पठडीची घरे लाकडांचा सढळ वापर करून मढवली आहेत. एखाद्या मध्ययुगीत गावात शिरल्यासारखे वाटले. आमच्या

खामगावच्या फोटोग्राफरचे बालपण या गावात गेले होते. त्यांना इथल्या बालाजीच्या दर्शनाइतकाच गावकऱ्यांच्या भेटीचाही आनंद होत होता. इथला पुरातन इतिहास सांगण्यात ते रंगले, आणि बालपणीच्या आठवणी सांगतानाही तितकेच. ज्याचे त्याचे एक जग असते. त्या जगातली धूळही त्याला प्रिय असते. परवा विश्राम बेडेकर अमरावतीस आले. अनगळांच्या गॅलरीतून मला ते रस्ता दाखवू लागले. येथून आम्ही शाळेत जात होतो आणि तेथे आम्ही खेळत होतो वगैरे आठवणीत ते रंगले. त्यांना मी म्हटले, "काका, तुम्ही हे सर्व लिहीत का नाही ?"

त्याबाबत मात्र ते फारसे अनुकूल नव्हते. या रस्त्यावरून हजार लोक गेले असतील. कोठेही बालपण गेले असले तरी त्या ठिकाणच्या रस्त्यावरून आपण फिरलोच असतो. त्याचे एवढे काय ? असा बुद्धिवादी विचार काकांना आला. मग ते आपल्याशीच हसून म्हणाले, "मी तर साऱ्या ललित वाङ्मयालाच अशामुळे बंदी करतोय ! स्मृती चिकटलेल्या स्थळांबद्दल हे विचार आले तर खरोखरच मग काय लिहावे, का लिहावे यांची मोठी पंचाईत होईल. म्हणूनच खेकाळे असो की बेडेकर, मला सर्वांच्या आठवणी प्रिय आहेत. तुम्ही एखाद्या माणसाशी समरस व्हा. त्याच्या डोळ्यातून त्या स्थळांकडे, रस्त्यांकडे पाहा. तुम्हांला ते सर्व रंगीत, ओले आणि आपले वाटेल." खामगावला धंद्यात रमलेले हे गृहस्थ खूप दिवसांनी मनाचे बालपण अनुभवीत होते. बालाजीच्या मंदिरात शिरलो. फारच प्रसन्न वाटले. एकदम मूर्तीकडे आत जाण्याची घाई केली नाही. त्या गढीसारख्या जागेवरून गावाबाहेरची शेती दिसत होती. तेथे उंच व पडझड झालेल्या महालाचा एक आकार दुरूनही आपली भव्यता सांगत होता. या गावच्या एका जुन्या राणीला येथून लोणार तीर्थाचे दर्शन घ्यायची इच्छा झाली. म्हणून राजाने तिला तो उंच महाल बांधून दिला होता म्हणे.

बालाजीचीच नव्हे तर देवळाच्या सभोवताली ठेवलेल्या सर्वच मूर्ती शिल्पकलेचा कळस आहेत. अत्यंत रेखीव, अत्यंत कमनीय ! एका पाटलाच्या नोकरांनी गढीची जागा एक दिवस सहज खणली. त्यांना पूजासाहित्यासह मूर्ती सापडली. कधीतरी परचक्राच्या व फोडझोडीच्या भयाने ती तेथे लपवली गेली होती. हिंदू मूर्तींना फोडझोडीचे व देवळांना पडझडीचे भय फार. मूर्ती पुन्हा सापडली व इतकी सुंदर, रेखीव हा अत्यंत आनंदाचा क्षण. त्या गावाने तो क्षण

जेव्हा प्रत्यक्ष अनुभवला असेल तेव्हा त्याच्या भाग्याला सीमाच नसेल. शिवाय मुद्दाम गाडलेली ती मूर्ती काहीही पडझड न होता जशाच्या तशा स्वरूपात सापडली हा कलाकारांच्या भाग्याचा क्षण. पण त्याहीपेक्षा भावनेने ओथंबलेला क्षण त्या मूर्तीने पाहिला असेल. आज तिची पूजा-अर्चा चालते. दूरदूरचे भक्त जसे येतात तसेच तिचे सौंदर्य बघण्यासाठी महान कलाकारही येतात. ती परचक्राच्या भयाने गाडली जाण्यापूर्वीही तिने हे धर्माचे व कलेचे वैभव, ती पूजा व प्रियता भोगली असेलच. पण तिला वाचवण्यासाठी ज्या कोणी ती लपवली तिच्या आदराचा क्षण त्या मूर्तीने अनुभवला तो किती महत्त्वाचा असेल. त्या माणसाने ही प्रिय पूजामूर्ती त्या दिवशी शेवटची न्हाणली असेल. खूप अंतःकरणपूर्वक तिची पूजा केली असेल. एकेक फूल तिच्यावर ठेवताना त्याला जाणवले असेल की हा शेवटचा सोहळा. हा शेवटचा टिळा. आता उद्यापासून हा आनंद नाही. त्या भक्ताने मग शत्रूपासून आपल्या कोवळ्या मुलाला दडवावे तशी ती मूर्ती दडवली असेल. वैऱ्याने राज्य घेतल्यानंतर तो आपल्या सोन्यासारख्या मुलाला ठेचून ठार मारील म्हणून इतिहासातल्या कितीतरी राजमातांनी आपली मुले दूर दूर लपवायला पाठवली असतील. त्या वेळी त्यांना शेवटचे न्हाऊमाखू घातले असेल. त्यांच्या स्तनांतून त्या दिवशी ते शेवटचे दूध पिताना ते शेवटचे, ते शेवटचे ही जाणीव प्रत्येक स्पर्शात नुसती कासावीस झाली असेल. आपल्या स्तनात आज रोजपेक्षा जास्त दूध का नाही म्हणून त्या हळहळल्या असतील. आणि आपल्या पिलांना आज एवढीशीच भूक का म्हणून त्या पिशासारख्या दुखावल्या असतील. शेवटचे शेवटचे म्हणून किती किती पापे घेतले असतील. शेवटचेच म्हणून त्या भक्तानेही त्या मूर्तीला किती किती नमस्कार केले असतील. ती मूर्ती खोल दडवून त्यावर माती लोटताना किती किती वेळा त्याने तिच्याकडे शेवटचे पाहिले असेल. इजिप्तमध्ये प्रेतांच्या पुढच्या प्रवासासाठी म्हणून धान्य, फळे, हिरे वगैरे ममीसोबत ठेवीत. त्या प्रेतांचे कोणीच न लागणाऱ्या आजच्या जगाला ती कल्पनाच वेडगळ वाटते. पण मेल्याने माणूस संपतो ही कल्पनाच त्या प्रिय व्यक्तीच्या बाबतीत त्या काळात येत नव्हती. आज तरी ती येते काय ? राजमातेने आपल्या लेकरासोबत जर उद्या-परवासाठी काही खाऊ बांधून दिला तर ते जितके वास्तव वाटेल तितकेच त्या ममींबद्दल त्या त्या अंतःकरणांना वाटत असेल. हा सोहळाच मुळी उराने पाहायचा असतो.

तर्कांच्या डोळ्यांनी नव्हे. जिवंत मुलासाठी दिलेली शिदोरी व प्रेताच्या पेटीत ठेवलेले धान्य या दोहोमागची भावना एकच. तर्कशास्त्राच्या सांगण्याला तेथे वावच नाही. जिवंत तान्ह्याबद्दल जे खरे आणि ममीबद्दल जे समर्थनीय तेच त्या भक्ताला त्या मूर्तीबद्दल नैसर्गिक वाटले असेल. त्याने त्या दिवशी शेवटची पूजा केली आणि उद्याच्या पूजेसाठी त्याने काही साहित्याची शिदोरीही त्या मूर्तीसोबत ठेवून दिली होती. पाटलाच्या नोकरांना मूर्ती सापडली तिच्यासोबत ते साहित्यही सापडले. त्यासोबतच त्या शेवटच्या पूजेच्या वेळचे अश्रू सापडले असतील काय? 'तू जपलेल्या मूर्तीची मी ही पूजा करतो; तू निर्धास्त राहा.' असे त्या निनावी भक्ताच्या आत्म्यास सांगून मी त्या मूर्तीस नमस्कार केला. या संपूर्ण प्रवासात इतक्या जिवाभावाने मी पहिल्यांदाच देवतेस नमस्कार करीत होतो. मूर्तीवर माझी श्रद्धा नव्हती. तिचे सौंदर्य मला पुरेसे होते. तिच्या देवपणाची मला गरज नव्हती. पण माझा नमस्कार त्या जुन्या भक्ताच्या श्रद्धेला होता; त्याच्या शेवटच्या वेळच्या अश्रूंना होता. माझ्या दादाजीजवळ पैसे कमी असले म्हणजे एखाद्या माणसाला खायला देण्याऐवजी ते त्याच्या मुलाला खाऊ देत. त्या उपाशी माणसाला त्यात सर्व काही मिळे. पूजेची भूक राहिलेल्या त्या कासावीस भक्ताच्या आत्म्याला माझ्या त्या मूर्तिपूजनामुळे काही मिळावे म्हणून माझी थिटी श्रद्धा त्या मूर्तीवर ओतली. पुन्हा पुन्हा नमस्कार केला.

ही मूर्ती व येथल्या सर्वच मूर्ती सौंदर्यपिपासूंना वेड लावणाऱ्या आहेत. इंग्रज अधिकाऱ्यांना त्यांचा मोह पडला होता म्हणे. त्यांना त्या लंडनच्या म्युझियममध्ये न्यायच्या होत्या. कोणाचे तरी प्रिय लेकरू सुंदर म्हणून मखरात ठेवण्यासाठी एका श्रीमंत माणसाला हवे होते. आणि त्याला आपल्याच कुशीशी ठेवण्यासाठी त्याच्या आप्तांचा हट्ट होता. त्यांना जगाने केलेल्या त्याच्या सौंदर्याची स्तुती नको होती. त्यासाठी ते त्याच्या विरहाची किंमत द्यायला तयार नव्हते. गावकऱ्यांनी लगबगीने त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून टाकली. तशी मग तिच्यावरची लंडनची स्वारी चुकली. निराधार सुंदर स्त्रीवर येऊ शकणारी सर्व संकटे या मूर्तीने भोगली आहेत. प्राणप्रतिष्ठा होण्याआधी तेथल्या मामलतदाराने ती मूर्ती वरिष्ठांच्या ताब्यात दिली नाही म्हणून त्या बिचाऱ्यावर ब्रिटिशांचा खप राग झाला म्हणतात.

मूर्तिपूजेचे स्तोम मला पसंत नाही; पण ती मूर्ती जमिनीत गाडून ठेवणाऱ्या

त्या जुन्या भक्ताने मला नवे ऊर दिले.

मेहेकर सोडतानाही तो निनावी भक्त ओल्या डोळ्यांनी माझ्याकडे बघत होता.

चिखलीस येऊन जेवण आटोपले व पुढच्या प्रवासास निघालो. देऊळगाव राजा या गावी शाळा व देऊळ यापैकी काहीतरी एक बघायचे होते. कारण वेळ थोडा. शेवटी देवळावर मतैक्य झाले. त्या दर्शनात लक्षात राहिले फक्त तेथल्या लादीवरचे रुपये. भक्तांनी तेथे चांदीचे रुपये ठोकले होते. आल्यागेल्याच्या पायांनी ती चांदी झिजत होती. त्यापेक्षा त्यांनी तेवढी रक्कम देवळाला दिली असती तर; चलनामुळे देवळाचे व्यवहार त्यामुळे साधले असते. पण बरेचदा दानामध्ये देवळाचे काही चांगले वाईट घडावे हा उद्देशच गौण असतो. भक्ताला काहीतरी द्यायचे असते. ते द्यायचे म्हणजे अमक्यातमक्या गोष्टी ' घडायला मदत व्हावी म्हणून नव्हे. ते द्यायचे असते म्हणून तो देतो. त्यात ' देण्याची ' भावना प्रधान; त्यामुळे काही ' होण्याची ' नव्हे. मूर्तीला नैवेद्य देणे ही भावना प्रधान; तिने तो खावा हा हेतू अर्थातच त्यात नाही. कर्मयोगाच्या फलनिरपेक्षतेशी ही दानक्रिया जुळते.

मी त्या ठोकलेल्या नाण्यांकडे पाहिले. काहींवर मुद्रा कायम होत्या. तऱ्हेतऱ्हेच्या जुन्या, नव्या, इथल्या आणि हैद्राबादच्याही त्या मुद्रा. नाण्यांचा अनायासेच झालेला तो संग्रह होता.

देवळाची भव्यता, श्रीमंती, कलासौंदर्य आणि ऐकलेल्या उत्सवाची चित्रे मनात साठवीत आम्ही पुढे निघालो. शिंदखेड राजा या गावी यायचे होते.

आजचा अपुरा वेळ अगदी क्रूरपणाने अपुरा वाटत होता. महाराष्ट्राची आई जिजाऊ जेथे जन्मली, वाढली त्या शिंदखेड राजाला आम्ही पहिल्यांदा जात होतो. प्रिय आईला असे उतावळीने भेटायचे आणि नुसते ' कसे काय ठीक आहे ना ? ' पद्धतीने निरोप घ्यायचा हे मनाला कोठेच पटत नव्हते. विदर्भाची खरी ओळख होण्याची संधी या प्रवासामुळे आली होती. ही जिजामाता, ती रुक्मिणी, गुलाबराव महाराज, रिद्धपूरचे गोविंदप्रभू, गांधीजी, विनोबा या सर्वांची ओळख होण्याची ही संधी अशी पहिल्यांदा आली होती. त्याआधी अजंठा, वेरुळ अन् ताजमहाल यांच्या गर्दीत माझ्याच घरची ही ओली स्थळे मी पाहायला विसरलो होतो. आज ही ओळख पटत होती आणि दुर्दैवाने त्याच क्षणाला त्या सर्वांचा अत्यंत घाईने निरोप घ्यावा लागत होता.

शिंदखेडला बघण्यासारखे काय आहे ? एक जुना वाडा. त्यातले तळघर. काही पडके वाडे. पण जिजाऊमुळे तेथल्या धुळीलाही अर्थ आला होता. तेथल्या ग्रामपंचायतीने आम्हांला चहा दिला. आम्ही सर्व वास्तू डोळा भरून पाहली. आजवर माझा स्वतंत्र देशाच्या नेत्यांवरचा राग वेगळा होता. मला व माझ्या बांधवांना पुरेसे रेशन मिळत नाही, अंगभर कपडा घेता येत नाही अशी ती तक्रार होती. आज एक भव्य व्यथा मिळाली. अरे, मला ठेवा आणखी वर्षभर उपाशी. नका देऊ कपडा. पण माझ्या जिजाऊचे घर तरी सांभाळा. जिजाऊला कोणी विचारले असते, " बये, ही भाकर तुला देऊ की तुझ्या लेकरांना ? " तिने काय उत्तर दिले असते ? त्या मेहेकरच्या इतिहासात दडलेल्या भक्ताला जर वैऱ्यांनी विचारले असते, " बोल, तुला फोडू की त्या तुझ्या प्रिय मूर्तीला ? " त्याने काय उत्तर दिले असते ? आणि आज कोणी आम्हांला विचारले, " या पैशात तुला धान्य देऊ की जिजाऊचे स्मारक बांधू ? " मी काय उत्तर द्यावे ? आयुष्यात आलेल्या सर्व संधींनी पंजाबरावांना विचारले, " सांगा, तुमच्यासाठी भव्य महाल बांधू की विदर्भासाठी कॉलेज ? " गाडगेबाबांना कोणी विचारले, " हे अन्न तुमच्या उपाशी पत्नीस देऊ की अपंग भिकाऱ्यांना ? " त्या सर्व प्रश्नांची उत्तरे त्या दोघाही परमपुरुषांनी ठिकठिकाणच्या कॉलेजांच्या व धर्मशाळांच्या रूपाने देऊन ठेवली आहेत.

सारे लोक स्वतःसाठी अन्न व कपडा मागत असताना एक कन्नमवार नावाचा वेडा माणूस जिजाऊचे स्मारक उभारण्याचे स्वप्न रचण्यात गुंतला होता. दरम्यान नेहरू इकडे आले. धनवंत्यांच्या घरावर शिवाजीचा पुतळा समारंभला; पन्हाळगडाला जाऊन छत्रपतींचा पुतळा पूजला. आणि त्या शक्तीची गंगोत्री मात्र या शिंदखेडच्या धुळीला आपली व्यथा सांगत दर क्षणी खचत आहे. मुख्य मंत्री कन्नमवार मेला म्हणून सारेच मेले काय ? तेथल्या एका वाड्याची तर अत्यंत करुण कहाणी आहे. त्याच्या बाहेरच्या भिंती शाबूत आहेत. आतली रचना साफ गेली. त्या शाबूत भिंतींच्या आतल्या आवारात एक ज्वारीचे शेत आहे. ही कल्पनाच मोठी विलक्षण आहे. आई म्हणत आहे; " माझे बाह्यांग कायम ठेवा. आतला सर्व देह कोरा व माझ्या लेकरांसाठी तेथे अन्न पिकवा. " आज्ञाधारक लेकरे ते सर्व करीत आहेत ! मी आजवर शेतातली घरे खूप पाहली. पण जिजाऊच्या घरातले शेत नव्हते पाहले. गाविलगढाच्या आंगणात

निबिड रान दिसले तेव्हा त्या उदात्त दर्शनाने डोळे निवले होते. नरनाळ्याच्या आंगणात सागबन नाचले तेव्हा मी आनंदाने भारावलो. पण येथे या घरात शेत पाहून मला माणसाच्या उरातला शेतखाना दिसला. मग ताजमहालाला पाहून त्याच्या तटबंदीच्या आड एखादा द्राक्षाचा मळा लावायला काय हरकत आहे ?

विदर्भ प्रदेशाचे हे शेवटचे दर्शन असे भयानक होते. हे सर्व बघायला येथे आलोच नसतो तर किती बरे झाले असते ! या यात्रेचे हे अंतिम क्षण होते. महाराष्ट्राची आई जिजाऊ आम्ही बघत होतो. माधवरावांना आता आम्ही सोडणार होतो. गाडी जालना येथे जाण्यास निघाली. प्रवासाचा सर्व थकवा व सर्व गमती आता जालन्याकडे निघाल्या. तेथे त्या संपणार होत्या. कोणीच काही बोलत नव्हते. कुठले कोण माधवराव ! पण ते या धावत्या घरात आमच्या सोबत हप्ताभर राहले व कायमचे आमचे झाले. पण हे संपायलाच हवे होते. नेहमीचे जग हे नव्हते. प्रत्येकाला स्वतंत्र जग होते. ते एकमेकाशी जुळत नव्हते. कोणास ऑफिस, कोणाला शेती, कोणाला व्यवसाय सांभाळायचा होता. मला उद्यापासून माझे कॉलेज होते. माधवरावांना मुंबईत रात्रपाळी होती. आमचे नित्याचे खरे स्वरूप हे होते. त्या जगाची बंधने ही या प्रवासातल्या आयुष्या-पेक्षा अधिक बळकट होती. त्यात जिजाऊचे स्मारक करण्याच्या आग्रहाला स्थान नव्हते. राज कॉलेजात पोरे शिकवताना पवनार, पाबळ आणि रिद्धपूर यांच्या फार तर आठवणी शक्य होत्या. खरेच ही धावती गाडी, हे गतिमान भटके कुटुंब नेहमीसाठी असेच राहिले तर ? आम्ही वंदे मातरम् म्हणतो. पण ते म्हणताना आम्ही कोठे असतो ? आपापल्या खुराड्यातून आम्ही देशाच्या वार्ता ऐकतो. काश्मीर ते कन्याकुमारी अशी आमची इस्टेट. पण ती आम्हांला नकाशातून कळू शकते. गरीब माणसाने आपल्या श्रीमंतीबद्दल बोलावे तसे आम्ही देशवैभवाच्या कल्पनेत रमतो. खुराड्यात जन्मलेले आम्ही त्याच खुरा-ड्यात एक दिवस कुत्र्यासारखे मरणार असतो. मिळवलेल्या पैशाने लेकरा-बाळांच्या तोंडात घास भरवण्याच्या घाईत आम्ही देश देश हा शब्द ऐकतो. त्या प्रचंड वैभवाला डोळे भरून पाहण्याची उत्सुकता एक दिवस तिरडीवर जाते व तिच्यावर काही दिवसांनी हरळी उगवते.

स्वप्न स्वप्न तरी किती रचायचे ? या भटक्या, निष्काळजी, व मुंबईचा पाव्हणा वागवणाऱ्या कुटुंबाचे प्रमुख मामासाहेब, आपले नित्याचे जग सोडून

आलेले आम्ही – हे सर्व आता लवकरच मोडणार होते. मोडणे वाईट होते. मोडणे अटळ होते. जेवढे मिळाले तेवढे खूप होते. आम्ही कधी नव्हे ते वेगळ्या जगात शिरलो होतो. एकमेकांना पाहले होते. या स्वतःच्या प्रदेशाला डोळ्यांनी पाहले होते. खूप आनंद आला.

जालन्याकडे जाताना रस्त्याने आम्ही हसण्याचा प्रयत्न करीत होतो. एकमेकांना पत्रे पाठवायला सांगत होतो. जालना आल्यावर तिथल्या पेठेचे, नगराचे वर्णन एकमेकांना सांगत होतो. पण हे मनापासून नव्हते हे प्रत्येकजण जाणून होता. जीवनाच्या या नव्या दालनात पाय ठेवला न ठेवला तोच आम्ही काढूनही घेत होतो.

जालन्याच्या स्टेशनावर माधवरावांनी माझा हात दाबला. खूप वेळ आम्ही मूकपणाने एकमेकांकडे पाहले. जिभेला बोलणे जमत नव्हते तसे डोळ्यांनाही पाहणे जमत नव्हते. माधवराव म्हणाले, " मी तुम्हांला सोडून चाललो हे खरेच नाही वाटत. आपण एकमेकांसोबत राहणार नाही यावर विश्वासच नाही बसत. "

" आपण एकमेकांसोबत होतो यावरच विश्वास नाही माझा. "

माधवरावांच्या हाताचा स्पर्श तेवढा त्यावेळी खरा होता. बाकीचे बोलणे वगैरे व्यर्थ होते. हवाभर भटकलेल्या स्वच्छंद पाखरांची प्रेते त्या स्टेशनावर थोडा वेळ पडून होती. त्या प्रेतांनी शेवटचा चहा सोबत घेतला. मग त्या निर्जीव देहांना संपादक, प्राध्यापक, इ. आकार आले व आपापला वेगळेपणा सिद्ध करण्यासाठी ते एकमेकांना सोडून निघून गेले.

गाडी स्टेशनाच्या आवारात उभी होती. ती अमरावतीकडे चालू लागली. नेहमीच्या जगाकडे आमची मने व शरीरे धावू लागली. त्या गाडीमध्ये माधवराव नावाचे एक जीवन दिसत नव्हते.

## असे परतलो –

गाढ झोपेत कधीतरी पडलेल्या स्वप्नाची आठवण मी घेत होतो. कोण्या माधवराव नावाच्या माणसाला आम्ही वऱ्हाडचे काय दाखवले होते ? महाराष्ट्राचे आणि संपूर्ण भारताचे विनोबा, पंजाबराव यांच्यासारखे नातेवाईक की जिजाऊ, रुक्मिणी यांच्या आठवणी ? येथले किल्ले, येथला निसर्ग की येथले आश्रम,

मंदिरे व शाळा ?

माधवरावांना येथले लोक भेटले होते. ते आपल्या सेवाकार्याबद्दल त्यांना सांगत होते. त्यांचे शाळा, कॉलेजांच्या रूपातले पुरावे दाखवीत होते. पंजाबरावांच्या कर्तबगारीस ते मान्यता मागत होते. त्यात काही मार्गदर्शन करता का म्हणून विचारीत होते. काही चुका काढायला सांगत होते. विदर्भाला कॅबिनेटमध्ये मानाची जागा दिली म्हणजे सारे काही दिले काय ? याचे उत्तर मागत होते. भेटलेल्यात असे इमानाने तहानलेले काही होते. खोट्या तहानी जपणारेही काही लोक होते. इथल्या दरिद्री अपेक्षित लोकांची जबाबदारी पांघरलेले काही लांडगेही त्यात होते. त्यांना त्या संपादकाकडून आपल्या प्रतिष्ठेची जाहिरात हवी होती. काहींना आपल्या लहानसहान उत्सवांच्या वार्ता छापून येण्याची शाळकरी गरज होती. काही नवोदित लेखकही अधूनमधून या मुद्रणेश्वरापुढे नत झाले. त्यांनाही काही हवे होते. काहींना शिवाजी संस्थेची बिंगे उघडी पडायला हवी होती. काहींना मुंबईच्या सर्व वृत्तपत्रांनी फॅसिझमला अनुकूल अग्रलेख लिहावे असे वाटत होते.

हे झाले माणसांचे; पण गाविलगढ, कौंडण्यपूर व शिंदखेड या स्थळांनाही काही न्याय हवा होता. येथल्या काही रूढींना मान्यता हवी होती. येथल्या ज्वारीच्या कणसांना द्राक्षाच्या नशिबातली प्रतिष्ठा हवी होती. आम्हांला अडचणी वगैरे समजू नका असे म्हणणाऱ्या काही उणिवा येथे त्यांना भेटल्या होत्या. संपूर्ण वऱ्हाड मात्र या पाहुण्याला सांगत होता, “ शिक्षणाच्या बाबतीत मी खडबडून जागा होत आहे. माझ्यात जे पिकते ते भूक भागविणारे आहे. देखावा वाढवणारे ते नसले तरी त्याचे खरे मोल जाणा. मी उद्योगप्रधान व्हायला तयार आहे. येथे कारखाने पाठवा. आणि माझी सेवा करणारी इथली जी मंडळी त्यांची माहिती जगाला द्या. सरकारी उजेडात झळकणारे काही थोर नाहीत; झोपडीतल्या अंधारातही माणसे आहेत. मी श्रीमंत होतो. आज ओसरत आहे. पण लक्ष द्याल तर अजूनही मुठी भरभरून दान करायला तयार आहे. ”

गाडीने चिखली ओलांडले. तिकडे माधवरावांनीही मुंबईच्या रस्त्यावरचे कुठलेतरी ठिकाण सोडले असेल. चिखलीला पंढरीनाथ पाटलाकडच्या चहामुळे ताजेतवाने झालो होतो. तेथे पाथरकर उतरले. पुन्हा एक पक्षी पळाला. खामगाव आले. खेकाळ्यांनी निरोपाचा चहा दिला. आता सर्वजण अमरावतीकरच उरले

होते. गाडी भरधाव धावत होती. शुक्रवार कधीतरी संपला. शनिवारी आरंभ केला होता तो प्रवास शनिवारीच संपत आला होता. रस्ता शांत होता. चतुर्दशीचे चांदणे सभोवार खुलले होते. आमच्या या प्रवासासारखे गोड गोड चांदणे !

आजवर उत्सुकतेने पाहिलेला वऱ्हाड जेथल्या तेथेच होता. आम्ही मात्र घराच्या ओढीने दादाला वेग वाढवायला सांगत होतो. काच फुटलेल्या बाजूकडून मोटारीत थंड हवा शिरत होती आणि गमतीने विचारीत होती, " ठीक आहे ना ? कशी काय आहे वऱ्हाडची P. W. D. ? रस्त्यावर अशी गिट्टी पसरून दिली म्हणजे छान मजा येते की नाही ? " आम्हांला खरोखरच वरूडचा तो खट्याळ गोटा आवडला होता.

' माधवरावांनी उन्हाळ्यात इकडे यायला हवे ! ' पण कशाला ? या वऱ्हाडला ही एक अत्यंत विचित्र सवय आहे. ज्याला त्याला तो उन्हाळ्यात आमंत्रण देईल. आंब्यांची घात ना ? सासुरवासीणीला त्या निमित्ताने माहेरचा आंबा गोड लागतो. जावयालाही जरा दोन दिवस पाहुणचार झोडता येतो. पण हे एवढे कारण सोडले तर वऱ्हाडच्या आंब्याला काय हापूस-पायरीची चव आहे ? हां, आंब्यांची नुसती आंबेपणाची गोडी पहायची नसेल आणि त्याच्या भरीला इकडच्या रस ओरपून घामाघूम झालेल्या पंगतींचीही आठवण त्यात घालायची असेल तर मात्र मग इथल्या आंब्याची सर कुठल्याच फळाला नाही. आणि पँटीच्या इस्त्रीची कदर न करता मातीच्या ढिवळांवर बसायची तयारी असेल तर मग मळणीचा बोकडही मोठाच चवदार असतो. कोवळ्या हुरड्यापेक्षाही त्या नव्या ज्वारीचे पाणगे मस्त लागतील.

रात्रीचे तीन वाजले होते. गाडी गाडगे महाराजांच्या समाधीजवळ उभी झाली. माझी सूटकेस हाती धरून मी मामांचा निरोप घेतला.

झोपेभरल्या डोळ्यांनी दार ठोठावत मी हाका मारल्या, " माय वो !
[illegible] "

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
[illegible] ... दि ... [illegible]
... २०८३६ [illegible]